म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ५६६०

REFBK-0004617

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

[ कु. मा. प. ]

. ग्रं. सं. ठाणें
/नोंदणी
५९८०
ठाणे
सं. नि. ५९८०
१८/७/३३

शत्रु

"Man interbreeds with all his varieties and yet deludes himself that there are races of out-standing purity! These are the phantoms of the imagination"

—H. G. Wells.

लेखकः—
माधवराव खंडेराव बागल, कोल्हापूर.

किंमत ६ आणे.

या आवृत्तीचा सर्व फायदा शाहूसेवक सोसायटी पुणें, या संस्थेस देण्यांत येईल.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं.
ठाणे,

# स्वराज्याचा शत्रु.

लेखक—

…ाधव खंडेराव बागल.

REFBK-0004617

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 4617

किंमत ६ आणे.

प्रकाशक—
माधव खंडेराव बागल.
कोल्हापूर.

मुद्रक—
वासुदेव नारायण ठकार.
श्रीसिद्धेश्वर प्रेस, कोल्हापूर.



**अस्पृश्योद्धारक राजर्षि श्रीशाहू महाराज छत्रपति**

[ शिल्पकार—माधव खंडेराव बागल व अयंगार.

## स्वराज्याविषयीं 'श्रीशाहूमहाराजांचे उद्गार.'

"आम्हाला स्वराज्य मिळावें अशी खरोखरीच आमची इच्छा आहे. याच्यायोगें आम्हाला जीवन-रक्त मिळेल. परंतु याबरोबरच माझा ठाम सिद्धांत म्हणून हेंही सांगावेंसें वाटतें कीं, हल्लींची जातिभेदाची शृंखला तोडल्यावाचून आपलें चालावयाचें नाहीं. आमच्या सामान्य नैतिक व आधिभौतिक प्रगतीच्या दृष्टीनें माझें लक्ष या गोष्टीकडे लागून राहिलें आहे. जोपर्यंत आम्हांमध्यें जातिभेदाच्या भावना आहेत, तोपर्यंत आमचें कार्य कमकुवतच राहणार. आम्हांमधील बखेडे नाहींसे होऊन आम्ही स्वराज्याला पात्र होण्यासाठीं जातिभेदाचे दोष नष्ट करण्यास आम्ही शक्य ते ते प्रयत्न केले पाहिजेत.

अस्पृश्य वर्गांना निदान माणसाप्रमाणें आम्ही जर वागवलें नाहीं, तर आमचें राजकारण बरोबर रीतीनें कसें चालेल. ज्यांना राजकारणांत भाग घ्यावयाचा असेल त्यांनीं इतर देशाप्रमाणें याही देशांत प्रत्येक मनुष्याला मनुष्यत्वाचे सर्व अधिकार दिले पाहिजेत."

# अर्पणपत्रिका.

देश असून ज्यांना तेथें हक्काची जागा नाहीं,
धर्म ज्यांना आपला म्हणत नाहीं,
समाज ज्यांना माणुसकीचे हक्क देत नाहीं,

असा

धार्मिक, सामाजिक व आर्थिक गुलामगिरींत

जो पुरा बुडला आहे

त्या पीडित, अस्पृश्य मानलेल्या

वर्गास

हें पुस्तक कृतज्ञतापूर्वक अर्पण करीत आहें.

नम्र,

माधव खंडेराव बागल.

कोल्हापूर.

## माधव खंडेराव बागल यांचीं पुस्तकें

१ नव्या पिढीचें राजकारण.

२ महात्माजींची कामधेनू.

३ लग्नबंधन कीं तुरुंगवास.


४ स्वराज्याचा शत्रु.

मिळण्याचा पत्ताः-

माधवराव खंडेराव बागल,

कोल्हापूर सिटी.

# लेखकाचे चार शब्द



स्वराज्यानें सर्वांना जागें केलें आहे. जो तो आपल्या हक्कासाठीं झटूं लागला आहे. पारतंत्र्यांत किड्यां-प्रमाणें लोळणारे, बहुसंख्य वर्ग स्वराज्यप्राप्तीनंतर आपल्याला चिरडेल काय, आपले हाल होतील काय, म्हणून घाबरून धडपडूं लागले आहेत. या स्वातंत्र्याच्या उज्ज्वल प्रकाशांत आपण कदा-चित् होरपळून जाऊं, म्हणून या उघड्या उन्नतीच्या खुल्या प्रदेशांत येण्यापेक्षां आपली पूर्वीची अंधारकोठडीच बरी, जेलरनें उदार मनानें घातलेला तुरुंगातला तुकडाच बरा म्हणून, स्वतःचें नाक कापून, हिंदूंचा जातिभेद, जगाला आपलें हिडिस स्वरूप दाखवत आहे. ताठ उभें राहून स्वतःच्या हिंमतीनें स्वावलंबनाचा मार्ग पतकरण्याऐवजीं, दुसऱ्यांनीं टाकलेल्या तुकड्यावर संतुष्ट राहण्याची मनोवृत्ति अनेक समाजाची होऊं लागली आहे! प्राचीन हिंदुधर्माच्या अफाट विस्ताराला हीं द्वैताचीं फळें आलेलीं पाहून गुलामवृत्तीची पेरणी करणाऱ्यांना किती आनंद वाटत असेल.

पुढारलेल्या व सुशिक्षित वर्गापैकीं कांहीं स्वार्थी लोक स्वराज्याचा लोण्याचा गोळा हातांत पडणार म्हणून मिटक्या मारूं लागले आहेत. इंग्रज गेले कीं व्हाइसरायापासून ते कारकुनापर्यंत सर्व नोकऱ्यांत आपल्या जातीची वर्णी लागणार म्हणून कांहीं, तर कांहीं भांडवलवाले आपल्या मोठ्या धंद्यास संरक्षण मिळेल व आपली बरकत अमर्याद वाढेल म्हणून मनोराज्यांत गर्क आहेत.

निर्भेळ स्वातंत्र्यांत असा कोता स्वार्थ येऊं शकत नाहीं. स्वातंत्र्य स्वतःच्या उन्नतीस तसें दुसऱ्याचें उन्नतीसही पोषक आहे. म्हणून स्वातंत्र्याची इच्छा करणारा दुसऱ्या बांधवासही पारतंत्र्यांत ठेवूं इच्छिणार नाहीं. आपण ज्या स्वातंत्र्यासाठीं झटतों त्या स्वातंत्र्यासाठीं दुसरे बांधव खटपट करीत असतांना त्यांची निर्भत्सना करणार नाहीं.

स्वातंत्र्यासाठीं घरादारावर तुळशीपत्र ठेवणाऱ्यांनीं, वाटेल तो स्वार्थत्याग करूं असें यज्ञकंकण बांधलेल्यांनीं, अल्पसंख्यांक वर्गांना "जें मागाल तें देऊं" असें अभिवचन देऊन कां मोकळे होऊं नये ? सर्वांप्रमाणें आपल्याला हक्क असावेत, सर्वांबरोबरचा आपला दर्जा असावा हेंच ते मागणार. त्यांना थोडें जास्त हक्क, थोड्या अधिक सवलती मिळाल्या तरी काय बिघडलें? परक्यांच्या सत्तेपेक्षां अल्पसंख्यांचा वरचष्मा राहिला तर काय बिघडलें? परक्यांचा अधिकार बरा कीं खालच्यांची कृतज्ञता बरी? स्वतःचें व देशाचें वाटोळें करून इतर समाजाची खोड काढणें बरें, कीं स्वार्थत्यागाच्या दिलदारपणानें त्याना नम्र करणें बरें ? लेखकानें मराठा सर्वसंग्राहक म्हणून त्याच्या स्वार्थत्यागाला प्रोत्साहन दिलें आहे; पण प्रत्येक जातच सर्वसंग्राहक झाली पाहिजे. अशी ती झाली म्हणजे हा जातिभेदच नाहींसा होईल. जातिभेदाची कल्पना नष्ट झाली पाहिजे. ती झाल्याशिवाय हें वैमनस्य कमी होणार नाहीं.

बिचारा अस्पृश्यवर्ग, त्याला कुणाचाच आधार नाहीं ! ख्रिश्चन व मुसलमान गिधाडाप्रमाणें त्याच्यावर झडप घालून आकाशांतील बापाची व त्यांची गांठ घालून देण्यास पुढें होतात. या कुतरओढीनें खरोखरच त्याला स्वर्गाची वाट दिसूं लागत असेल ! हिंदुधर्माभिमानी 'अरे धर्मभ्रष्ट होऊं नका, हजारों वर्षें थांबलांत, आणखी थांबा, काल अनंत आहे' म्हणून आश्वासन देत पुढें धांवतात.

अस्पृश्यांची अवस्था मात्र त्रिशंकुवत् झाली आहे. हजारों वर्षें पायांखालीं तुडवून पुनः त्यांनाच घाई करूं नका म्हणून उपदेश करण्यास आम्हास खंती वाटत नाहीं !

स्वराज्याचें फल ओढून घेतांना आपले पाय मजबूत आहेत काय, खालची जमीन निसरडी आहे कीं काय तें पहा. जें स्वराज्य व स्वातंत्र्य आम्ही स्वतःच्या बांधवांना देऊं इच्छित नाहीं तें मिळवण्यास व टिकवण्यास आपण समर्थ होऊं काय याचा विचार करा.

हा जातिभेद नष्ट व्हावा. याच हेतूनें पुढील प्रकरणें लिहिलीं आहेत. तरुण पिढी तरी धैर्यानें पुढें होऊन ही विषमता गाडून टाकील अशी बळकट आशा आहे.

" देव भंगी, देव मांग, देव महार श्रीरंग ।
भंगी हिंदु, मांग हिंदू, तैसे महारही हिंदू ।
भंगी मांग म्हार सारे, देवभक्ताचे सोइरे ।
माझ्या हरीचीं लेंकरें, त्यांचें करावें हो बरें । "

कोल्हापूर,
ता० १८।५।३२

माधव खंडेराव बागल.

# श्री. बागल यांचे पुस्तकांवरील अभिप्राय.

( सारांशानें )

—:०:—

## " महात्माजींची कामधेनू "

**नवाकाळ मुंबई.**— ' स्वदेशीची ज्योत जास्त जोरानें पेटावी म्हणून प्राचीन भारताचें वैभव आपल्याला थोडक्यांत समजलें पाहिजे म्हणजे वैभवशाली इतिहासानें आपला स्वाभिमान जागा होईल; हें वैभव नष्ट कसें झालें व आज आपण कोठें आहोंत, हें महाराष्ट्रांतील जनतेला दिसावें आणि तिनें कार्यप्रवृत्त व्हावें, या सद्धेतूनें श्री. माधवराव बागल यांची जी लेखमाला ज्ञानप्रकाश पत्रांतून प्रसिद्ध करण्यांत आली तीच ' कामधेनु' या छोटेखानी पुस्तकाच्या स्वरूपांत श्री. बागल यांनीं मराठी वाचकांच्या पुढें ठेविली आहे. स्वदेशीनेंच स्वराज्य कां व कसें विळवावें या बाबतच्या थोर पुरुषांच्या उक्तिरूपी लेण्यांनीं ही कामधेनू नटली असून मराठी लेखक, वाचक आणि वक्ते यांना मधुर दुग्धरसाचा खुराक पुरवून स्वदेशी—प्रसारविषयक वाङ्मयसेवेला पुष्टि आणण्यास या कामधेनूची भक्ति फलदायी होईल.

**तरुण भारत**—बेळगांव—भाषा सोपी आहे. विवेचन मनाला पटेल असें आहे. प्रसिद्ध लेखकांचीं अवतरणें विखुरलेलीं आहेत. असलें सुंदर पुस्तक लिहिल्याबद्दल श्री. बागल यांचें आम्हीं अभिनंदन करतों.

**कर्मयोगी सोलापूर**—खादीवरील हा एक थोडक्यांत साधार सोपपत्तिक सुटसुटीत असा निबंध होय. पुस्तकांतील विचारसरणी प्रत्येक माणसास पटण्यासारखी आहे.

**दीनबंधु पुणें**—आजपर्यंत महात्मा गांधींच्या खादीबद्दल जितके आक्षेप आले आहेत तितके यांत सप्रमाण खोडून काढले आहेत.

**सुबोधपत्रिका**—चरख्याच्या उपयुक्ततेसंबंधीं कोणाचा कसाही मतभेद असला तरी हें पुस्तक वाचलें म्हणजे तो नष्ट होऊन चरखा चालविणें व वापरणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे अशी खात्री झाल्याशिवाय रहात नाहीं.

६७८६
सं. नि. ८००
२६।८।३३

# स्वराज्याचा शत्रु

## प्रकरण १ लें.

६६१७

### आधुनिक पूतना राक्षसीण.

पुरुष वर्गाला मालकीच्या कल्पनेची शिकवण स्त्रीच्या मालकींतून मिळाली. या विषाचें बीजारोपण प्रथम येथें झालें. नंतर त्या वृक्षाला सहस्र फाटे फुटून देवाघरच्या उदार दौलतीची दाणादाण झाली. जगन्मातेचीं सरखीं भांवडें आपण एकाच मातेचीं मुलें आहोंत हें विसरून 'हें माझें हें माझें' म्हणून आपल्या-सहोदर भावांना दूर करूं लागलीं. सर्वांची सारखी मिळकत वळ-जवरीच्या जोरावर आपल्याच वांट्यास अधिक घेऊं लागलीं. याच वारुळांतून मनुष्यमनुष्यांमध्यें 'मी थोर तूं नीच' असा भेद पाडणारा जातिभेदाचा काळसर्प बाहेर पडला. सर्वांना पोसणाऱ्या जगवणाऱ्या व थारा देणाऱ्या भूमातेच्या देहाचीं शकलें करणारी जमीनदारी ही मालकीच्याच पोटची वीण होय. कष्ट करून पोट भरणाऱ्या शेतकऱ्याला, मदतीचा हात पुढें करून, त्याचे हातपाय मोडणारी सावकारशाहीची सख्खी आई हीच! गरीब प्रजेच्या छाताडावर तांडवनृत्य करणारी बेबंदबादशाही ही तिचीच लेक! आणि ईश्वराच्या पवित्र समतेला पायांखालीं तुडवून साम्राज्याच्या पाशवी तृष्णेनें जगभर रक्ताचा सडा पसरून रक्तगंगेचा पूर वाहवणारी महाकाली हीच!

यांपैकींच एका बयेच्या, जिनें हिंदुस्थानच्या पवित्र वेदांताचीं

पानें फाडून टाकलीं, "हिंदुधर्माची अब्रु काढली, स्वातंत्र्यरवीच्या आड उभें राहून जिनें सर्वत्र काळाकुट्ट अंधार पसरला, जिनें हिंदुस्थानच्या वीरपुरुषांना लज्जेनें खालीं पहाण्यास लावलें, व जिनें राष्ट्रसंघट्टना अशक्य करून सोडली, त्या जातिविषमतेला पाताळांत गाडून टाकण्याकरितांच आपण यापुढें पाय टाकणार आहोंत. तिला पायांखालीं इतक्या ताकतीनें चिरडलें पाहिजे कीं, पुनः तिला डोकें वर काढतांच येणार नाहीं. बुटाच्या टाचेनेंच तिला ठेचलें पाहिजे. नाहीं तर पुनः उघड्या पायांचा ती चावा घेईल." या जातिविशिष्ट हक्काचा कपाळमोक्षच केला पाहिजे." —विवेकानंद.

## जातिभेदाचा उगम.

"पुरलेल्या हाडाचे कालांतरानें ज्याप्रमाणें दगड बनतात त्याप्रमाणें या लवचिक वर्णव्यवस्थेचे घट्ट दगड बनले. प्रत्येक वर्णाला आपली उन्नति करून घेण्याविषयी जी मोकळीक व सवड होती ती नाहींशी होऊन तिच्या ठिकाणीं अधिक ताठपणा मात्र आला. त्यामुळें सध्याचा अस्वाभाविक जातिभेद जन्मास आला असून त्यानें द्वेषभाव आणि मत्सर उत्पन्न केला आहे." —स्वामी रामतीर्थ.

आतांपर्यंत स्त्रियांच्या गुलामगिरीची वाढ होत होत ती कोणत्या स्वरूपांत आली तें "लग्नबंधन कीं तुरुंगवास" या पुस्तकांत दाखवलें आहे. मुळांत आर्थिक प्रश्नच आहे ; त्यानें अनेक रूपें धारण केलीं आहेत एवढेंच.

स्त्रियांना गुलाम करण्यांत, सामाजिकदृष्ट्या नीच लेखण्यांत जो हेतू दिसून येतो तोच जातीभेदांतहि दिसून येतो. दुसरीं कारणेंहि असतील पण आर्थिक प्रश्न महत्वानें दिसून येत आहे.

स्त्रीच्या देहावर मालकी सांगायची, तिच्यावर सत्ता गाजवायची व तिनें मिळवलेल्या धनावरहि आपला हक्क ठेवायचा तर तिची

माणुसकी काढून तिचा अभिमान नष्ट करणें भागच आहे. तिचा दर्जा कमी ठरला तरच ती पुरुषास मान देणार!

जातीभेदाचें मूळहि पण याच मनोवृत्तींत आहे. क्षत्रियांनीं दंडुक्याच्या जोरावर कष्टाळू वर्गाकडून पैसे लुटले. श्रम न करतां निव्वळ भीति दाखवून आपल्या पोटाची सोय करून घेतली. प्रतिकार करण्यांत वेळ घालावी तर शेताचे कष्ट बंद पडते व पोटाचा आधार तुटतो ह्मणून क्षत्रियांना बसल्या जागीं खंडणी पुरवण्याखेरीज दुसरा मार्गच नव्हता.

## क्षत्रियांचा बडगा व ब्राह्मणांची लेखणी.

क्षत्रियांनीं बडगा उगारून शेतकऱ्याला गुलाम बनवलें. ब्राह्मण वर्ग डोकेबाज. त्यानें लेखणी उगारून शेतकऱ्याची बुद्धि बोथट बनवली. लेखणीच्या पात्याचा उपयोग करून बुद्धीच्या रक्तवाहिन्या छाटून टाकल्या.

कष्टाळू वर्गाला शारीरिक युद्ध लढण्याला वेळ नव्हता; तसेंच ब्राह्मणवर्गाबरोबर वाग्युद्ध लढण्यालाहि वेळ नव्हता. हा नुसता होयबा वर्ग! त्याच्या अज्ञानाचा फायदा ब्राह्मणवर्गानें भरपूर घेतला.

देहानें गुलाम व डोक्यानें बथ्थड अशापुढें दगडाचा देव उभा करणें अत्यंत सोपें झालें. "कमी शक्तीच्या पण जास्त बुद्धीच्या धूर्तांनीं आपल्यापेक्षां जास्त शक्तीच्या पण अज्ञान लोकांपासून त्रास होऊं नये म्हणून त्यांना बिचकवण्यासाठीं ईश्वर हें एक बुजगावणें करून ठेवलें आहे" शेतकरी मुळांतच भाविक. यांत्रिक सुधारणेनें निसर्गशक्तीवर ह्मणजे ऊन, थंडी, वारा यांवर ताबा बसवला आहे. पण हिंदुस्थानचा शेतकरी अद्याप या सुधारणेपासून दूर आहे. पावसासाठीं, पिकासाठीं तो अजूनहि देवाचा धावा करीतच असतो. म्हणून त्याला स्वर्ग नरकाची भीति सहज दाखवत

आली. संकट जावें म्हणून देवाचा धांवा करणाऱ्यापुढें डोकेबाज वर्गानें दगडाचा देव समोर उभा केला. त्या देवाचे दलाल ब्राह्मण बनले. देव त्यांच्या मुखांतून बोलूं लागला. त्याच देवांनीं ग्रंथ लिहून ठेवले व तो कायदा झाला. त्याच कायद्यानें धर्माचें स्वरूप घेतलें. त्यांतून जातिभेदाची व्यवस्था झाली.

## हुकमी देव.

या हुकमी देवाची मान्यता वाढवण्याकरितां त्यांचे गांवोगांवीं, घरोघरीं देव्हारे बसविले. त्यांचीं कुठेंकुठें भव्य मंदिरें झालीं. आशा दाखवणारा देव सुंदर स्वरूपाचा, गोजिरवाणा झाला तर अज्ञजनांवर जरब बसवण्याकरितां त्यानें अक्राळविक्राळ स्वरूप धारण केलें. त्या देवांच्या मिरवणुकी निघूं लागल्या. राजसत्तेचा वचक बसावा म्हणून उगाच इनफंट्रीची परेड होत असते. तोफा बंदुकांचें प्रदर्शन भरतें. त्याचप्रमाणें लोकांच्या मनावर छाप बसवण्याकरितां देवांच्या, देव अंगात आलेल्या लोकांच्या, मिरवणुकी निघूं लागल्या. या देवांच्या गुणवर्णनाच्या भाकडकथा रचल्या. त्यांचीं पारायणें सुरू झालीं. कारण अशीं सार्वत्रिक व्याख्यानें सुरू झाल्याखेरीज त्या ग्रंथांची व देवाची महती कशी वाढणार? असा हा पुराणांचा 'क्लोरोफार्म' देऊन गुंगी आणल्यानंतर समाजाची घडी इच्छेप्रमाणें बसवणें ही अत्यंत सोपी गोष्ट झाली. पैसा आपल्या पाटाखालीं, श्रम न करतां कसा चालून येईल, याचा विचार करून नियम बसविले. त्या त्या जातींचा दर्जा ठरवून आपला दर्जा सर्वांत श्रेष्ठ ठरवला.

ब्राह्मण सर्वांत श्रेष्ठ, नंतर क्षत्रिय, नंतर वैश्य व शूद्र अशी उतरती पायरी ठरवली. क्षत्रियांनीं रक्षण करणें, वैश्यांनीं पैशांची सवलत देणें व शूद्रांनीं सेवा करणें ही कामांची वांटणी केली.

“राजाचें सामाजिक महत्व बऱ्याच अंशीं त्याच्या क्षत्रियत्वावर, त्याचें क्षत्रियत्व त्याच्या संस्कारांवर व त्याची संस्कारार्हता ब्राह्मणांच्या इच्छेवर अशी परिस्थिति उत्पन्न केली. अनेक जातींचे अस्तित्वांत ब्राह्मण जातीनें प्राधान्य पटकवलें.” (ज्ञानकोश) पोटासाठीं अनुकूल ग्रंथ निर्माण केले, त्यांत वाटेल तीं विधानें घुसडून दिलीं, स्वार्थी लोकांनीं ते ग्रंथ पोटाशीं धरून स्वतःचा उदरनिर्वाह चालवला.

जयासि जैसें भासलें। तैसें त्यानें कवित्व केलें॥
शास्त्रामाजि घुसडूनि दिलें। उदर भरायाकारणें॥ —रामदास.

## शूद्राची धार्मिक खंडणी.

शूद्राच्या धर्माबद्दल मनुस्मृतिकार कशी आज्ञा करतात पहा. “शूद्र हा ब्राह्मणाच्या दास्याकारितां निर्माण केला आहे. दास्याच्या स्वामीनें शूद्रास जरी आपल्या दास्यांतून मुक्त केलें तरी तो ब्राह्मणाच्या दास्यांतून मुक्त होत नाहीं. कारण दास्य हें शूद्राचें सहजकर्म आहे.”

मनुष्यजात ईश्वरानें सर्व सारखी एका अवयवाची, एकसारख्या आकाराची निर्माण केली असतां एखाद्या मनुष्यास दुसऱ्याचा उपजत गुलाम ठरवणें हे ईश्वरी न्यायाविरुद्ध नव्हे काय? पण या अन्यायाला धर्माचें स्वरूप आलें आहे. “ज्याच्या शारीरिक श्रमाच्या बळावर ब्राह्मणांची विद्या, क्षत्रियांचा पराक्रम आणि वैश्यांची संपत्ति अवलंबून आहे. त्या शूद्रवर्गाची स्थिति काय आहे? शूद्र वर्ग हा समाजाचा मोठा भाग आहे. समाजाचा खरा देह तोच. तथापि त्याल तुच्छ दृष्टीनें पाहण्याची संवय आपणांस पुरातन कालापासून लागली आहे.” —विवेकानंद.

शेतकरीवर्ग म्हणजे सर्वांना जगवणारा वर्ग. म्हणून अत्यंत महत्वाचा व आवश्यक वर्ग. यानें कष्ट केले, जमीन नांगरली भांगलण करून स्वच्छ केली, तरच चांगलें पीक येणार. पण आश्चर्याची गोष्ट कीं, या नांगररूपी भांगलणीला पाप ठरवलें. पाप कसें! तर ह्मणे भूमि नांगरतांना व झाडेंझुडपें उपटून काढतांना हिंसा होत असते. या हिंसेला प्रायश्चित्त काय? तर ब्राह्मणाला शेतीच्या उत्पन्नापैकीं एक तृतीयांश भाग घरीं आणून देणें.

वृक्षं छित्वा महीं भित्वा हत्वा च कृमिकीटकान् ।
कर्षकः खलयज्ञेन सर्वपापैः प्रमुच्यते ॥

पापांतून मुक्त होण्याचा किती शास्त्रशुद्ध सरळ उपाय हा! असें पाप काय एकट्या शेतकऱ्यांचेंच हातून होतें? प्रत्येक मनुष्य पावलागणिक हत्या करीतच असतो. नुसत्या श्वासोच्छ्वासाबरोबरही असंख्य कृमि मरत आहेत. हिंसेची कल्पना सारासार विचार सोडून ताणली तर हत्या घडत नाहीं असा एक पळही निघणार नाहीं. पण हिंसेच्या पातकांत शेतकरी तेवढा बिचारा सांपडतो व ब्राह्मणाला लांच दिली म्हणजे देवाच्या कोपांतून तो सुटतो. स्वार्थाखेरीज वरील श्लोकाला कोणता आधार दाखवतां येईल काय? तरवारीच्या जोरावर क्षत्रियांनीं खंडणी मिळविणें व लेखणीच्या फटकाऱ्यानें पैसा उकळणें यांत उपाय भिन्न दिसले, तरी तीच वृत्ति नाहीं काय? स्वार्थाचाच हा प्रभाव नव्हे काय?

## सावकाराकडून सवलत.

वैश्यवर्गाकडूनहि अशाच प्रकारची सोय ब्राह्मण वर्गानें करून घेतली आहे. वैश्यानें व्यापार करावा, पैसे मिळवावे, श्रीमंत व्हावें पण ब्राह्मणाला पैसा लागल्यास इतर वर्गापेक्षां कमी व्याजानें द्यावा.

" वसिष्ठस्मृतींत व्याजाचे योगानें दामदुप्पट किंवा धान्य तिप्पट द्यावें, अशा अर्थाचे नियम सांपडतात. त्याचें प्रमाण ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांस, व्याजाचे निरनिराळे व क्रमशः वाढते दर असावेत, असाहि निर्बंध आढळतो." (मध्ययुगीन भारत.)

म्हणजे सर्व वर्णापेक्षा ब्राह्मणाला कमी व्याज व कष्ट करून निढळाच्या घामानें पोट भरणाऱ्या शूद्राला अधिक व्याज! कां आहे कां नाहीं न्याय!!

आणखी धन कुठें ही कां असेना तें म्हणे ब्राह्मणाचें! मनुस्मृति-अध्याय १ श्लोक ९९-१००. " या जगामध्यें जेवढें म्हणून धन आहे तें जणु सर्व ब्राह्मणांचेंच आहे. ब्राह्मण जें कांहीं दुसऱ्याचेंही खातो तें तो वस्तुतः आपलेंच खातो. वस्त्र दुसऱ्याकडून घेऊन नेसतो तें तो आपलेंच नेसतो. .... ...." अशा प्रकारें सर्व वर्णांवर चरण्याचा प्रयत्न ब्राह्मण वर्गानें केला आहे. दुसऱ्याचें धन घेऊनही उपकार न मानतां तो हक्कच आहे असें प्रतिपादन करणें म्हणजे केवढा चोमडेपणा हा! पण ब्राह्मणाच्या संपत्तीस हात लावणें हें महापातकांत घातलें आहे. दुसऱ्यावर सत्ता व आपला अडका शाबूत ठेवण्याची शक्कल नांवाजण्याजोगी आहे खरी!

## शूद्राहून नीच.

धंद्याची जात आज पूर्ण नामशेष झाली आहे. इंग्रजांनीं सर्वांनाच शूद्रापेक्षांहि हीनवृत्तींत टाकलें आहे. सर्वत्र आज परक्यांचे गुलाम झालों आहोंत. अशी स्थिति असतां मी उच्च, तूं नीच हा कल्पनेचा डोलारा घेऊन जो तो नाचत आहे. या जातिमत्सरामुळें आपण आज जगाच्या उपहासास कारणीभूत झालों आहोंत.

धंद्याची जात नाहींशी तर झालीच आहे आणि तशी ठराविक जात यापुढें ठरवणेंहि शक्य नाहीं. एकाच घरांत एक मुलगा इंजिनियर होतो, एक कवि उत्पन्न होतो, तर दुसरा डॉक्टर होतो, तर तिसरा नट होऊं शकतो. या व्यक्तीच्या आवडीनिवडीच्या गोष्टी आहेत. बापाचा धंदा मुलांनीं केलाच पाहिजे असा निर्बंध घालतां येणार नाहीं. आपल्या ऐपतीप्रमाणें जो तो धंदा करणार. बिनशिकलेला बथ्थड डोक्याचा ब्राह्मण, खानावळींत शेणाचा गोळा घेऊन सारवत बसेल, तर विद्वान अस्पृश्य, नवी स्मृति लिहूं शकेल. कडव्या जातीचा पिढीजात अस्सल क्षत्रिय इंग्रजाच्या बुटाच्या ठोकरा खाण्यांतच धन्य समजेल, तर शामळूभाई वाणी महान रण-गाजी सत्याग्रही होऊन साम्राज्यप्रभूला नमवूं शकेल. धंद्याची जात जन्मतः राहणें आतां शक्य नाहीं. महात्माजी म्हणतात—

"पिढीजात धंद्याच्या जातीची कल्पना मला मान्य नाहीं." आज तरी ती कुणाला मान्य होणार नाहींच नाहीं.

# प्रकरण २ रें.

## जन्मजात श्रेष्ठपणा.



गेल्या धर्माचें हें भूत पाहुनि बसला कां रे भीत.
नव्या मताचें भालाईत घोडे अपुले या उडवीत —गडकरी.

आतांपर्यंत धंद्यावरून पडलेल्या किंवा समजले गेलेल्या वर्णभेदाचा बोजवारा कसा उडाला आहे हें थोडक्यांत दाखवलें आहे. आतां जन्मजात श्रेष्ठपणाचा, जन्मजात उच्चपणाचा व शुद्ध जातीचा विचार करूं.

या जातिसंरक्षणाकारितां पुष्कळ लोक रूढींचा ह्मणजे परंपरेचा आधार दाखवतात. ही रूढी मोडणें त्यांच्या जिवावर येतें. तेंव्हां या परंपरेचा आतां विचार करूं.

हा रूढीचा आधार मुळींच टिकण्याजोगा नाहीं. तो धागा अनेक वेळां तुटला आहे. लग्नसंबंध परस्पर जातींत सारखे होत गेले आहेत. स्त्रीपुरुष संबंधावर घातलेले निर्बंध जगांत कुठेंच टिकलेले नाहींत. प्रमाणापेक्षां जास्त अपेक्षा करणें केंव्हांहि चुकीचें आहे व तसें तें ठरलें आहे. जातिभेदाच्या तटानें स्त्री--पुरुष मनोविकाराला बांध घातला जात नाहीं. शुद्ध बीजाची कल्पना ही केवळ मनाची समजूत आहे. हा आभास आहे. वस्तुस्थिति पाहिली असतां हें म्हणणें सहज पटण्याजोगें आहे.

ब्राह्मण जातींत आज शिरलेला सोंवळेपणा पूर्वीं नव्हता. आपल्या जातीपुरतेच संबंध असावेत अशी त्यांची इच्छा दिसून येत नाहीं. निदान इतर वर्गांतल्या स्त्रिया करण्याचा अधिकार त्यांनीं राखून ठेवलेला दिसतो. आपल्या मुली मात्र नीच समजलेल्या जातींनीं करूं नयेत असा निर्बंध घालण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. "इतर वर्णीयांतील कोणी ब्राह्मणस्त्रीशीं व्यभिचार केल्यास त्याचें पौरुषत्व नष्ट करावें व ब्राह्मणानें हाच गुन्हा केल्यास मात्र १००० रुपये दंडावर भागवून घ्यावे." हा कोण पक्षपात ! पण हा निर्बंध कांहीं टिकलेला नाहीं. ब्राह्मणांनीं शूद्रस्त्रीला पावन केली आहे तर उलट खालच्या वर्गांतील पुरुषाचा ब्राह्मण स्त्रीनें स्वीकार केला आहे. कांहीं ठळक उदाहरणें दाखवलीं म्हणजे हे दिसून येणार आहे.

## रक्ताची भेसळ.

"श्रेष्ठवर्ण ब्राह्मणाचा संग न सुटे शूद्रीचा ॥" (तुकाराम)

ब्राह्मण लोक स्वतःला ज्या गोत्रांतले म्हणवून घेतात त्या मूळ ऋषींचाच विचार करूं, हे ऋषी ७ आहेत. अंगिरा, भृगु, विश्वामित्र (कौशिक), काश्यप, वसिष्ठ, अत्री व आगस्ति हे ते सात होत. पैकीं विश्वामित्र क्षत्रिय, हे स्वतः मेनका-अप्सरेवर बहाल झाले होते. वसिष्ठ म्हणे कलावंतिणीचा. असें असूनहि या सातीं गोत्रांत लग्नसंबंध झाले आहेत. अगस्ती ऋषींनें विदर्भराजाची कन्या, ऋष्यश्रृंग ऋषीनें लोमपादराजाची कन्या, पुलस्ती ऋषीनें तृणबंधुराजाची कन्या, कौत्स्य ऋषीनें भगीरथ राजाची कन्या, च्यवन ऋषीनें शर्याती राजाची कन्या, केली आहे. द्रोणाचार्य, कृपाचार्य यांचींही कुळें संशयास्पद आहेत. कृपाचा बाप ब्राह्मण. आई देववर्गांतील. द्रोणाचा बाप ब्राह्मण. आई घृताची, अप्सरा वर्गांतील, अशी ही मालिका लागली आहे.

स.मा. ७५१३३

आतां जे क्षत्रिय आपल्या जातीचा टेंभा मिरवत असतील त्यांनीं खालील उदाहरणें मनन करावींत:—अगदीं प्रभू श्रीकृष्ण-जींचीं गोष्ट घ्या. त्यांनीं अनार्य जांबवतीशीं लग्न केलें. धृतराष्ट्र व पंडु नियोगपद्धतीनें झालेले व्यासाचे मुलगे आहेत. नियोगाच्या अशाच मार्गानें धर्म भीम वगैरे पांच पुत्र झाले असें महाभारतांत वर्णन आहे. भीमानें हिडिंबेशीं लग्न केलें. कर्ण हा लग्नापूर्वीं कुंतीस झाला होता. सारथीपुत्र म्हणूनच तो ओळखला जात होता. भीष्माचे वडील शंतनू यांनीं मत्स्यगंधा नांवाच्या कोळ्याचे मुलीबरोबर, ययाती राजानें शुक्राचार्यांची ( ब्राह्मणकन्या ) देवयानी इजबरोबर, ब्राह्मण जरत्कारूनें नागवंशी स्त्रीबरोबर लग्नें केलीं. नारदाची आई व बाप बेपत्ता होता.

चितपावनाचें कुलदैवत परशुराम. बाप जमदग्नी. जातीचा ब्राह्मण. आई रेणुका क्षत्रिय, जमदग्नीची आई ही क्षत्रिय विश्वामित्राची बहीण. ही झाली चितपावनांच्या कुलदैवताची गोष्ट. पुनः स्त्रीला वेदोक्ताचे अधिकार नाहींत. तिची मुंज होत नसते. म्हणून ब्राह्मणांच्या सर्व स्त्रिया शूद्र.

## ब्राह्मण क्षत्रियांची लठ्ठालठ्ठी.

अंगदेशचा राजा वेन यानें ब्राह्मणांचें वर्चस्व कमी करण्याचा प्रयत्न केला म्हणून ऋषींनीं त्यास ठार मारलें. परशुरामानें निःक्षत्रिय पृथ्वी करण्याचा प्रयत्न केला. अशी ही परस्पर चुरस शिव छत्रपति, प्रतापसिंह व शाहूमहाराजांपर्यंत येऊन थडकली आहे. ब्राह्मण-ब्राह्मणेतरद्वेषही तेंच दाखवतें

क्षत्रियवर्गाच्या बाबतींत मात्र ब्राह्मणवर्गाला आपलें वर्चस्व सारखें कायम राखतां आलेलें नाहीं. क्षत्रियवर्गाच्या हातांत तरवार सारखी तळपत असल्यामुळें ब्राह्मणवर्गाला भिऊन वागावें लागलें

आहे. "ना विष्णुः पृथिवीपतिः" म्हणून राजालाहि देवाची तेव्हां द्यावी लागली आहे. क्षत्रिय राजे शक्तीनें श्रेष्ठ तर होतेच पुष्कळ वेळां ते बुद्धीनेंहि श्रेष्ठ ठरले आहेत. "मूळग्रंथ वेद ांचा शांनीं क्षत्रियांनींच लिहिले. वैदिक धर्मांचे संस्थापक क्षत्रियच हीं. आज हिंदुधर्मांचा सार असलेल्या जगन्मान्य गीताग्रंथ क्षोत श्रीकृष्णप्रभूनींच सांगितला. बुद्धधर्मसंस्थापक गौतमबुद्ध क्षत्रियच, जैन धर्मांचे प्रवर्तक महावीर क्षत्रियच. कर्मयोगी जनकराजा आत्मिक शक्तीवर जीवन्मुक्ताचे कोटींत गेला तो क्षत्रियच. विश्वामित्रांनीं आपले योग्यतेच्या बलावर ब्राह्मणत्व मिळवलें. रामानें परशुरामाची कान-उघाडणी केली. अशाप्रकारें या दोन्ही वर्गांत जरी चढाओढ असली तरी परस्परांत. खालच्या शेतकरी वर्गाला दोघांनींहि नाडलेंच आहे.

## वर्णसंकर.

पूर्वीचा आर्थिक हेतू आज पूर्वीसारखा तडीस जाणें शक्य नाहीं. पूर्वीचे चार वर्ण आज आपआपले धंदे करीत नाहींत. खालचा वर्ग हळूहळू शाहणा होत आहे. हिंसेच्या पापक्षालनार्थ ब्राह्मणाला तो आज धान्य देणार नाहीं व आज देतहि नाहीं. इंग्रज सरकारनें क्षत्रियांची क्षात्रवृत्ति पूर्ण नष्ट करून त्यांना निरुपद्रवी मेंढरें बनवलीं आहेत. तसेंच लोकसत्तेचा उदयकाल होऊं लागल्यानें विशिष्ट वर्गाच्या बेजबाबदार दंडुकेशाहीला आळा बसूं लागला आहे. आज बहुतेक दोनच वर्ग दिसतात. व्यापार करणारे व सेवावृत्ति पतकरणारे, हे दोनच वर्ग आज उरले आहेत.

"मनूनें सांगितल्याप्रमाणें राज्याचा अधिकार फक्त क्षत्रियांनाच होता. पण या मर्यादेचें उल्लंघन प्रथमतः चाणक्याच्याच सहाय्यानें झालें आहे. फायद्यासाठीं वर्णांच्या धंद्यांना सोडावें लागलें आहे.

वर्णभेदांत आर्थिक प्रश्न कसा गुंतला आहे तें खालील उदाहरणां-वरून पटण्याजोगें आहे:—

एकनाथ महाराज भागवत धर्माचा प्रसार करूं लागले. त्यावेळीं ब्राह्मणवर्ग त्यांच्यावर फार संतापला. ते एकनाथांच्याबद्दल म्हण-तात—‘ एकनाथ चार प्राकृत अक्षरें मिळवून बोलतो व लोकांचें अंतर मोहित करतो. भागवत धर्म ऐकून आमची यजमान मंडळी निष्काम होत चाऽली आहेत. आमची प्रपंच–उपजीविका चाल-वितनासे झाले आहेत. आतां ब्राह्मणांचें व्हावें कसें ? ’ ( माधव कृष्ण देशमुखकृत एकनाथचारित्र. )

ही पूर्वींची आर्थिक घडी आज विस्कटली आहे. त्या त्या वर्णाचे लोक आज ते ते धंदे करीत नाहींत. डॉ. अंबेडकरासारखा अस्पृश्य म्हणून समजला गेलेला मनुष्यहि त्यांच्याच धंद्यांत म्हणजे विद्वत्तेंत ब्राह्मणांचा पाडाव सहजीं करूं शकतो. दुसऱ्या धंद्यांत अधिक पैसे मिळतात हें दिसून येतांच, ब्राह्मण चांभाराचें दुकान काढण्यास मुळींच पुढेंमागें बघत नाहीं. क्षत्रियांनीं तशीच ब्राह्म-णांनीं आपआपली वृत्ति टाकून दिली. “तुका म्हणे ब्रह्म जाणे तो ब्राह्मण इतरांतें नमन नाहीं माझें।” असे ब्राह्मण हल्लीं किती निघतील ?

मनुस्मृतिकाराच्या म्हणण्याप्रमाणें सुद्धां आज वर्णसंकर झाला आहे. ते म्हणतात “ जो द्विज वेदांचें अध्ययन न कारितां दुसऱ्या शास्त्रामध्यें श्रम कारितो तो जिवंतपणींच पुत्रपौत्रादिकां सहवर्तमान तात्काळ शूद्रत्वास प्राप्त होतो. ” (अध्याय २ श्लोक ६८) या नियमाला धरून किती ब्राह्मण आज सांपडतील ? असे स्पष्ट असूनही आज ब्राह्मणवर्ग स्वतःचें श्रेष्ठत्व सोडूं इच्छित नाहीं. वृथाभिमान टाकत नाहीं. जपानमधील वरच्या वर्गानें आपलें श्रेष्ठत्व

सोडल्याबरोबर जपान एकदम पुढें आला, त्याप्रमाणें ब्राह्मण व क्षत्रिय या वर्णांनीं आपलें जातिमहात्म्य सोडून हिंदूंतील इतर जातींशीं बेटी-व्यवहार सुरू केल्यास देश कितीतरी संघटित होईल. पण वरच्या वर्गांना हें अद्याप वळत नाहीं. कळत नाहीं असें मात्र म्हणतां येणार नाहीं. रामदासांनीं सुद्धां ब्राह्मणवर्गाची चांगलीच कान-उघाडणी केली आहे. ते म्हणतात.

॥ ब्राह्मण बुद्धीपासून चेवले । आचारापासून भ्रष्टले । गुरुत्व सांडून झाले । शिष्य शिष्यांचे ॥ हे ब्राह्मणांस कळेना मिथ्या अभिमान गळेना मूर्खपणाचा ॥

असा हा "भिक्षुकवर्ग या हिंदुस्थानांत जिवंत तरी राहील कीं नाहीं याची शंकाच आहे. भिक्षुकवर्ग आपली चिता आपल्याच हातांनीं रचत आहे. भिक्षुकवर्गाचें श्रेष्ठत्व नष्ट होत आहे आणि असें व्हावें हें परिस्थितीला अनुरूपच आहे."—विवेकानंद.

धंद्याचे बाबतींत तरी सबगोलंकार झाला आहे. धंद्यावरून जात ओळखणें आतां शक्य नाहीं. मग पूर्वीच्याच प्रेताला चिकटून राहण्यांत आणि मी अमक्याच एका जातीचा म्हणण्यांत काय अर्थ आहे? आज या धंद्याच्या जाती मोडल्या असूनहि पुनः जात न सोडण्याचा हेका धरणें विचित्र नाहीं काय?

आतां मोठमोठ्या ग्रंथकारांकडे पाहूं. रामायण अत्यंत पूज्य ग्रंथ. लिहिणारा वाल्मिकी—वाल्या कोळी. जातीनें पंचम. दुसरा त्याहूनहि मोठा. ज्ञानभांडाराचा ग्रंथ महाभारत. तो व्यासांनीं लिहिला. व्यास बिनलग्नाचे. प्रसिद्ध कादंबरीकार बाणभट्ट याची बायको पाराशव जातीची. ब्राह्मण व शूद्र संयोगापासूनची. प्रख्यात कवि राजशेखराची बायको चाहमान क्षत्रियाची. विदुर नीति

गारा शूद्र स्त्रीचा. आजचे सर्वश्रुत पंडित ज्ञानकोशकार डॉ. ...र यांची बायको म्हणे जर्मन.

क...आजच्या कित्येक क्षत्रिय राजांनींही व अन्य जातीयांनीं परधर्मीय-पर...रराष्ट्रांतील स्त्रियांशीं लग्नें केलीं आहेत.

च... कुचबिहार राजघराण्यांत युरोपियन स्त्रीशीं लग्नें झालीं आहेत, ...ा घराण्यावरोबर बडोद्याचे राजघराण्याचे संबंध आहेत. यांच्या मूळपुरुषाचे कुळांत पाटाची चाल असल्याचें समजतें. इंदूरच्या धनगर जातीच्या राजघराण्याशीं—भोसले घराण्याचा संबंध झाला आहे. कागलकर हे छत्रपतींचे भाऊबंद आहेत. पुनः तुकोजीराव महाराजांनीं अमेरिकन स्त्रीबरोबर लग्न लावून ते सुखानें कालक्रमण करीत आहेत. तेव्हा जातिशुद्धतेला कोठपासून सुरवात झाली व कोठें थांवली व कुठें थांवणार आहे याचें निश्चित विधान कोणाला करतां येईल काय ?

हीं डोळ्यादेखतचीं ठळक उदाहरणें झालीं आणि लग्नसंबंधानें सर्टिफिकिट मिळालेल्या दांपत्यांचें खासगी वर्तन कुणी पाहिलें आहे ? पडद्याआडच्या गोष्टींचें कुणी संशोधन केलें आहे ? मुलाच्या जन्मापूर्वी मातेच्या वर्तणुकीवर मुलाला टेहळणी कांहीं करतां येत नसते. गोषाआडील कृष्णकारस्थानें प्रकाशांत आल्यानंतर पावित्र्याचा आभास नाहींसा होतच असतो. मनुष्यस्वभाव हा येथूनतेथून सारखा आहे. तो बदलतां येणार नाहीं, "घरोघरीं मातीच्याच चुली" असतात. शुद्ध बीजाची कल्पना ही फक्त मनोराज्यांत बाळगावी. सत्यसृष्टींत ती अक्षरशः उतरणें व बळजबरीनें उतरवण्याचा प्रयत्न करणें म्हणजे निसर्गाविरुद्ध आकाशाला गवसणी घालण्यासारखी गोष्ट आहे. महाभारतकालींहि ही गोष्ट धर्मराजांना कबूल करावी लागली आहे. वनपर्वांत युधिष्ठिर—नहुषसंवाद आहे. त्यांत

नहुषानें धर्मराजाला विचारलें ब्राह्मण कोणाला म्हणावें? धर्मराज म्हणतात.

" हल्लीं मनुष्य ही एकच जात आहे. कारण सर्व वर्ण संकर झाल्यामुळें, निरनिराळ्या जातीची परीक्षा करितां येत नाहीं. सर्व वर्णांचे लोक सर्व जातींच्या ठिकाणीं अपत्य उत्पन्न करतात अशी स्थिति आहे. " आजहि त्याच गोष्टी चालल्या आहेत व पुढेंहि तशाच चालणार आहेत. मनुष्यस्वभाव आहे तसाच या बाबतींत राहणार आहे.

माझ्या लिखाणाचा हेतू अनीतीचें समर्थन करण्याचा नाहीं किंवा लग्नबंधन टाका असाही नाहीं. मनुष्य स्वभावाविरुद्ध व योग्य वधूवराआड येणारीं जातिभेदाची भिंत पाडून स्वखुषीनें एकमेकांचीं लग्नें होऊं द्या हेंच म्हणणें आहे.

## कच्चा पाया.

धंद्यासाठीं जातिभेद पडले म्हणावें तर आतां धंद्याची सगळी उलथापालथ झाली आहे. जातिभेदाचा पावित्र्याचा पाया मुळांतून तर कच्चा आहेच आहे. पुढेंहि ती उभारलेली भिंत सारखी भंगत चालली आहे. पण याच कोसळणाऱ्या भिंतीला रंगवून खुलवण्याची हौस मात्र आमची कमी होत नाहीं ! पुनः पायाशुद्ध इमारत बांधल्याखेरीज आमच्या हिंदुस्थानची धडगत नाहीं. वृथाभिमान टाकून निर्मळ बुद्धीनें परस्परांकडे पहा " वर्णाभिमानानें कोण झाला पावन, ऐसें द्या सांगून मजपाशीं "–तुका. आपण जातीनें सर्व एक आहोंत; आपली सर्वांची जात एक आहे. ती म्हणजे माणसाची. आवडीप्रमाणें त्यांचीं लग्नें होऊं द्या, माणसामाणसांचीं लग्नें होणें कांहीं भयंकर गोष्ट नाहीं, अस्वाभाविक नाहीं, त्याला एवढें कांहीं भिण्याचें कारण नाहीं.

सारासार विचार करून जातिभेदाकडे पहा. रूढीनें बनलेल्या कल्पनेला थोडा वेळ टाकून स्वच्छ निर्मळ मनानें आपल्या बांधवांकडे पहा. म्हणजे या जातिभेदाचा फोलपणा तुम्हांलाच दिसून येईल. चार वर्णांच्या, चक्रव्याढव्याजानें 'चार हजारवर जाती' बनल्या आहेत. पुन: त्या त्या जातींत असंख्य पोटभेद झाले आहेत. ब्राह्मण जातींतच ८०० पोटजाती आहेत. त्या पोटजातींत लग्नें होत नाहींत. या जातिविषमतेचा, धर्मभेदाचा परिणाम राउंडटेबलमध्यें अत्यंत गलिच्छपणें दिसला आहे !! जातिस्वार्थापुढें देशाच्या स्वातंत्र्याला लाथाडून जगाच्या हास्याला आपण कारण झालों आहों. ही जात अशीच वाढत गेली तर ती कुटुंबांत येऊन त्या त्या घराण्याचा प्रतिनिधि कायदेमंडळांत निवडून येण्याबद्दल भांडणें सुरू होतील. या जातिभेदानें आपण देशाला काळोखी लावली आहे, जगांत आपली छी:थू: झाली आहे. पण आम्ही केव्हां शाहाणे होणार ?

## वर्णभेद.

आर्यधर्म व वैदिकधर्म या कालीं जातिभेदाचें आस्तित्व दिसून येत नाहीं. प्रभू कृष्णजींनीं गीताधर्मांत "गुणकर्मविभागश:" भेद मान्य केले आहेत. जन्मत: श्रेष्ठपणाला मान्यता दिलेली नाहीं. जातीचें कर्म पाहून क्षत्रिय–वैश्यादिवर्णांत घालणें ही वर्गीकरणाची 'जुनी पद्धत' आज आस्तित्वांत नाहीं.

कुलीनमकुलीनं वा वीरं पुरुषमानिनम् ।
चारित्र्यमेव व्याख्याति शुचिं वा यदि वाशुचिम् ॥

—श्रीसार्थरामायण.

"पुरुष चांगल्या कुलांतील आहे कीं वाईट कुलांतील आहे. वीर आहे किंवा अधीर आहे, आणि पवित्र आहे कीं अपवित्र आहे, हें सर्व त्याच्या वर्तनावरून समजून येतें."

बरें, चार वर्णांच्या गुणांचाच विचार केला तर ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चार वर्णांचे गुण त्या त्या वर्णांच्या मनुष्यांत पूर्णांशानें असतातच असें नाहीं. प्रत्येक मनुष्याचे अंगीं प्रत्येक वर्णाचे गुण थोड्याबहुत अंशानें असतातच. सकाळीं उठल्यापासून तें संध्याकाळपर्यंत आपण प्रत्येक वर्णाचें काम थोडेंबहुत करीत असतोंच. ज्या वर्णाचे गुण मनुष्यामध्यें अधिक, त्याचा त्या गुणाच्या वर्णांत पूर्वीं समावेश होत असे. आजच्यासारखे जातिव्यवस्थेचें स्वरूप त्यावेळीं नव्हतें. स्वतःच्या कर्तबगारीला त्यावेळीं पूर्ण वाव होता. शूद्रवर्णाच्या पोटीं जन्मलेला मुलगा गुणाच्या जोरावर ब्राह्मण वर्गांत गेला आहे. त्यानें ब्राह्मणवर्णाला पूज्य असे धर्मग्रंथ लिहिले आहेत. कवष ऐलूष जातीचा शूद्र पण गुणानें ब्राह्मणपद मिळवून त्यानें ऋग्वेदांतील कांहीं मंत्र लिहिले आहेत. " अभक्त ब्राह्मण जळो त्याचें तोंड, । काय त्यासि रांड प्रसवली॥" जन्मजात अशा या श्रेष्ठपणावर तुकाराम महाराजांनीं गदा घातली आहे, याच अनुरोधानें ते पुढें म्हणतात.

वैष्णव चांभार धन्य त्याची माता । शुद्ध उभयतां कुळ याती ॥ "

सात्विक गोष्टींकडे मन लावलें, ग्रंथाध्ययन सुरू केलें. ईश्वरभक्तींत आपण तल्लीन झालों सत्याची कांस धरली म्हणजे आपण ब्राह्मण होऊं शकतों. विश्वामित्र आपल्या गुणानें क्षत्रियाचे ब्राह्मण झाले आहेत. सत्यकाम जाबाल खरें बोलणारा म्हणून ब्राह्मण गणला गेला आहे. व हाही धर्मग्रंथ लिहणारा झाला. मग गुणानें कोणालाहि ब्राह्मण होणें अशक्य नाहीं. क्षात्रवृत्तिहि प्रत्येकाचे अंगीं कमीअधिक प्रमाणानें असते. स्वसंरक्षण करतांना किंवा दुसऱ्यासाठीं लढतांना, शिकार करतांना ब्राह्मण किंवा शूद्र क्षात्रवृत्तींत जातो. व्यापार, व्यवहार, सावकारी करतांना वैश्यवृत्ति

स्वीकारतो. हलकें काम करतांना किंवा सेवावृत्ति पत्करतांना शूद्रवर्णांत जातो. या दृष्टीनें सर्व वर्ण आज शूद्रच ठरतात.
" ज्याचा संग चित्तीं । तुका म्हणे तो त्या याती "

जातिभेदाचें समर्थन करणें म्हणजे जीव नसलेल्या देहाला चिकटून बसण्यासारखें नाहीं काय? या जातीभेदाच्या प्रेताला जाळून आतां नव्या जोमदार तरुणपिढीची विश्वकुटुंबी जात बनवली पाहिजे.

## विघातक संघटना.

या पोटजातींनें ती ती ठराविक जातहि मोडून त्यांच्यांत दुही उत्पन्न झाली आहे. जातिभेद हिंदुधर्म संघटनेला आड येत आहे. धर्माभिमान राष्ट्राभिमानाला घातक होत आहे. व राष्ट्राभिमान विश्वबंधुत्वाआड येत आहे. तेव्हां कसलीहि संघटना करतांना आपल्याला विश्वबंधुत्वाकडे जायचें आहे, आपलें तें ध्येय आहे, हें विसरतां कामा नये. हें ध्येय शाबूत ठेवून—तें ध्येय समोर ठेवून मग तुम्ही संघटना केली तरी हरकत नाहीं. पण पुष्कळ वेळां हें ध्येय विसरून आपण संघटना करूं लागलों म्हणजे आपली अधोगति होते. तशी ती आज होत आहे.

## फाटकें पांघरूण फेंकून द्या.

नव्या पिढीनें आतां हें जातिभेदाचें फाटकें पांघरूण फेकून देऊन आपली खरी जात कोणती ती पाहिली पाहिजे. आपली जात माणसाची आहे. त्या जातींत वितुष्ट उत्पन्न करणाऱ्या ग्रंथाना, संस्थांना, धर्मांना व मनुष्यांना बाजूस सारून छातीठोकपणें पुढें झालें पाहिजे.

या जातिभेदामुळें पुढची पिढी देहानें, मनानें व बुद्धीनें खची होत आहे. इच्छित वधूवरांचीं लग्नें होणें अशक्य झालें आहे.

आपल्या मुलीला सुस्वरूप, सुशील, सुशिक्षित, सशक्त व सुखवस्तु कर्तबगार नवरा पाहण्याऐवजीं, आपल्या धाग्यादोऱ्याचा व पदराचा मिळाला म्हणजे तो बेअकली, बदफैली, नंदीबैल मिळाला तरी तो, बाप आपल्या मुलीला नवरा पसंत करतो. अशा पदराचा नवरा मिळाला नाहीं तर उपवर मुलगीचें वांकडें पाऊल त्याला खपतें पण कमी समजलेल्या जातीचा सर्वगुणसंपन्न मुलगा मात्र खपत नाहीं. कुंकवाचा धनी चांगला घराण्यांतला असला म्हणजे तो " अवघा पाऊणशें " वयाचाहि चालतो. या जातिभेदामुळें नक्षत्रासारखी मुलगी खापराच्या गळ्यांत, शिकलेली चाणाक्ष मुलगी नंदीबैलाच्या गळ्यांत, परस्परविरोधी स्वभावांचीं, रोगी देहाचीं जोडपीं या जातिभेदानें जन्माचीं जखडून टाकलीं आहेत. अशा भिन्न, प्रकृतींच्या जोडप्यांचीं मुलें राष्ट्राला व समाजाला पोषक कशीं होतील?

### परिस्थितीचा परिणाम.

आईबापांच्या शरीरप्रकृतींचा, त्यांच्या मनोवृत्तीचा, मताचा व परिस्थितीचा परिणाम त्यांच्या मुलांवर होत असतो. जातिभेदाचे अनिष्ट परिणाम पुढच्या पिढीवर होऊन ती पुढची पिढी सर्व बाजूंनीं कमकुवत होत आहे. ती कूपमंडूकवृत्तीची बनत आहे. लहानपणीं मुलांना जी शिकवण मिळते तशीं तीं बनतात. आई-बाप ज्या मताचे असतील व ते ज्या कल्पना मुलाचे मनांत घालतील तशीं तीं बनतात. याचीं उदाहरणें हरघडीं आपल्याला दिसतात. छोटींछोटीं कोवळ्या मनाचीं व पवित्र अंतःकरणाचीं मुलें आनंदानें खेळत असतांना " शूद्राच्या मुलाबरोबर कसा खेळतोस तूं! " म्हणून आईनें ' ख्यास् ' मारल्यावर त्या शुद्ध मनाच्या, गोजिर-वाण्या मुलाच्या तोंडावर उमटलेले मनोविकार पाहून आपण किती

पाप करीत आहोंत याची कल्पना येईल! समभावानें खेळणाऱ्या बालपिढींत विषमतेचें बीजारोपण करून राष्ट्रवृक्षाच्या कोवळ्या रोपालाच आपण कीड लावत आहोंत. राष्ट्रांतील वैमनस्याला कायमची बळकटी आणीत आहोंत. आपला जन्म तर या घाणींत गेला आहेच, पण आपलीं मुलें तरी या घाणांतून बाहेर काढूंया असें आपल्या गांवींहीं येत नाहीं. तुमच्या प्रौढ मुलाचें प्रेम पूर्ण विचारांतीं जर एखाद्या स्त्रीवर बसलें तर त्यांच्या प्रेमांत जातीचें वीष कालवून जन्माचें मातेरें करूं नका. सबगोलंकार म्हणून उगाच कल्पनेचा डोंगर उभा करूं नका. सबगोलंकार, वर्णाचा झाला आहे, जातीचा झाला आहे, होत आहे, होणार आहे व तो होणें भाग आहे.

"The husband and wife must meet as man and women. The passport to union is not caste or creed"

—Tagore.

"नवरा बायको, मनुष्य व स्त्री एवढ्याच नात्यानें दांपत्यें एक झालीं पाहिजेत. जात अगर पंथ यांच्या परवान्याची त्याला जरूरी असतां कामा नये," मनुष्याचे जातींत जन्माला आलें आहोंत. आवडी-प्रमाणें त्यांचीं लग्नें व्हायचींच. यांत भयंकर पाप तें काय झालें? कोणची देवाची आज्ञा मोडली? आतां यापुढें बेटीबंदीच्या लाडक्या मुलीचा विचार करूं.

---

४६१७

## प्रकरण ३ रें.

### रोटीभेद व अन्नाच्या जाती.

जातिभेदाच्याच आजच्या विकृत स्वरूपांतून रोटीबंदीची वीण बाहेर पडली आहे. जातिभेदानें रक्तसंबंधांत विषमतेचें म्हणजे जन्मजात उच्चनीचपणाचें 'इंजेकशन' दिलें व त्या बधिर झालेल्या

मेंदूनें अन्नव्यवहारांत वीष घातलें! एकाच जातीच्या धान्यांत, अन्नांत, भाजीपाल्यांत जात निर्माण केली. शूद्राघरीं शिजवलेला तोच तांदूळ ब्राह्मणाघरीं अशुद्ध ठरला. मराठ्याच्या जोंधळ्याच्या भाकरीचा, ब्राह्मणाघरीं शिजलेल्या अन्नाशीं लग्नसंबंध होत नाहीं. ब्राह्मणाची आमटी कुरवाड्याच्या रोटीशीं संबंध ठेवूं इच्छित नाहीं. निसर्गनिर्मित जलाशयांत, एकाच मेघांतून पडणाऱ्या पाण्यांत जातिभेद पडले आहेत. ब्राह्मणाचा घाट, मराठ्याचा घाट व अस्पृश्याचा घाट असे, वाहणाऱ्या पवित्र गंगेंत भेद पडले आहेत. मद्रासकडे या विषमतेचा अतिरेक होऊन रस्त्याच्या जाती पडल्या आहेत. ब्राह्मणाच्या पवित्र रस्त्यावर अस्पृश्याला फिरकतां येत नाहीं म्हणे. बा भारता, तुझी कोण विटंबना ही? तुझ्या देहाचे किती तुकडे हे? तुझ्याच वारसपुत्रांनीं तुझ्या देहाचे किती धिंडवडे काढायचे? तुझींच मुलें परस्परांना परकीं समजून एकमेकांचा द्वेष करतांना, मी अमक्या धर्माचा, मी तमक्या धर्माचा म्हणून भांडतांना पाहून, तुला काय वाटत असेल? असो!

रोटीबंदीचा कडवेपणा पूर्वीं होता काय आणि आज वाटतो तसा उरला आहे काय याचा आतां विचार करूं.

## सहभोजनाला आधार.

एकत्र भोजनाला पूर्वीं प्रतिबंध नव्हता. जेवण्यानें जात बाटते ही कल्पना पूर्वीं नव्हती. उघडाउघड सहभोजनें होत होतीं.

महाभारतकालीं ब्राह्मण लोक क्षत्रिय, वैश्य यांच्याकडे भोजन करीत. युधिष्ठिराच्या अश्वमेधप्रसंगीं हजारो ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य यांनीं एकत्र भोजन केल्याचें वर्णन आढळून येतें. धर्मराज वनवासास निघाल्यावेळीं सर्वांबरोबर भेदाभेद न मानतां उघड सहभोजन झालें आहे. दुर्वासऋषि मोठ्या प्रेमानें द्रौपदीच्या

हातचें जेवीत असत. रामानें तर भक्तिभावानें पुढें केलेली भिल्ली-णीचीं उष्टीं बोरें चाखलीं आहेत. विश्वामित्रानें आपली अत्यंतिक भूक चांभाराचे घरीं शमवली आहे. हरिश्चंद्रानें डोंबाघरीं सेवावृत्ति पतकरली आहे. ऋषि वामदेव व भारद्वाज यांनीं परान्नग्रहण केलें आहे. श्रीरामानुजाचार्य विशिष्टाद्वैतपंथाचे आद्यप्रवर्तक यांचे गुरु कांचीपूर्ण हे खालच्या वर्णांतील होते. ते रामानुजार्यांचे घरीं जेवल्यानंतर ती जागा त्यांचे बायकोनें शुद्ध करून घेतली हें पाहून ते बायकोवर भयंकर संतापले व त्यांनीं तिचा त्याग केला. बुद्धांनीं पंक्तिभेद काढून टाकलाच होता. श्रीकृष्णाच्या सुप्रसिद्ध गोपाळकाल्यानें तर सबगोलंकार केला आहे.

“ नवव्या व दहाव्या शतकांत आजच्या सारखी रोटीबंदी, बेटीबंदी नव्हती; इतकेंच नव्हे तर, धर्म हाहि एक व्यक्तिविषयक प्रश्न समजला जात होता. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य यांच्या अन्नपा-नादि व्यवहारांत कसलाच फरक नव्हता. एवढेंच काय, तर विशिष्ट शूद्रासमवेतहि भोजन करण्यास त्यांस प्रत्यवाय वाटत नसे. हर्षाच्या काळीं एकाच घरीं एका माणसाच्या बायका निरनिराळ्या धर्माच्या जैन, लिंगायत, बुद्ध असूनहि त्या सर्वांचें एकत्र भोजन होत असे. आजची रोटीबंदी, बेटीबंदी त्या वेळीं नव्हती. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांनीं एकत्र भोजन करूं नये असें निषेधपर स्मृति-वचन सांपडत नाहीं, तर अशा भोजनास संमतिदर्शक अशींच वचनें सांपडतात. नापित आपल्या कुलाचा मित्र, चाकर गुराखी हे शूद्रवर्णाचे असले तरी त्यांच्यांशीं अन्नोदकव्यवहार करण्यास हरकत नाहीं, अशा अर्थाचें वसिष्ठस्मृतींत वचन आहे. अनुलोम-विवाहाप्रमाणेंच एकत्रभोजनाच्या प्रघातानें समाजांत एकजीवपणा व जोम उत्पन्न होई यांत शंका नाहीं. हल्लीं शूद्राच्या सावलीसहि

सोवळा ब्राह्मण उभा रहात नाहीं. मग अन्नपानादिकाचें भाषणच नको"

( मध्ययुगीन भारत. )

## ढोंगी सोवळेपणा.

तथापि पाश्चिमात्य संस्कृतीचा थोडाबहुत परिणाम होत आहे. मोठ्या शहरांतील खानावळी, हॉटेलांत नाइलाजानें व शाळेंत व कॉलेजमध्यें दरवर्षीं कोठेकोठें होणाऱ्या गॅदरिंगमध्यें ही रोटीबंदी मोडत चालली आहे. पण दुःखाची गोष्ट, ही कीं शाळा कॉलेजांतील मुलें घरीं पुनः त्याच 'सोवळ्यांच्या' अशुद्ध वातावरणांत पडतात. कित्येक वेळां तर या सोंवळ्याला निव्वळ ढोंगी स्वरूप आलें आहे. लेखकाला मुंबईंत हा देखावा डोळ्याला दिसला आहे. लेखक इराणी हॉटेलांत एकदां चहा घेत असतां बाजूस त्याचेच गांवचा एक सोवळा ब्राह्मण, ब्राह्मणाला निषिद्ध अशा गोष्टीवर ताव मारत होता. लेखकाकडे त्यानें पाहिलें नव्हतें. पुढें तोच मनुष्य संध्याकाळीं 'सखूबाईचे' खानावळींत उघडाबंब होऊन सोवळें नेसून 'शिवाल शिवाल' करीत अगदी अलग जागीं 'शुचिर्भूत' असा पण अस्पृश्यासारखा लांब बसलेला आढळला. 'वेदाचे पाठक सेविताति मद्य' हा तुकोबांचा आरोप आज कितीतरी ब्राह्मणांना लागूं पडेल. कित्येक ब्राह्मण इतर वर्णीयांचे घरीं जेवायला कबूल असतात. पण त्यांना ती गोष्ट प्रसिद्धपणें करण्याचें धाडस होत नाहीं. व्यभिचारी चोरट्या व्यवहाराप्रमाणें या गोष्टींचा बभ्रा होणें त्यांना पाप वाटतें.

## प्रेमांत वीष.

ही रोटीबंदी आम्हांमध्यें असलेल्या बंधुभावाला विघातक आहे. एका जमखान्यावर बरोबरच्या नात्यानें प्रेमानें बोलत असलेली मंडळी जेवयाच्या वेळीं निराळी व्हावीत, त्यांच्यांत चारचार

हातांचें अंतर पडावें व एका ताटांत जवळून अन्न पडावें व दुसऱ्याच्या ताटांत दोन हात उंचीवरून पडावें! अशा वेळीं त्या पंक्तींत बसलेल्या जातीचे ब्राह्मण नसलेल्या माणसांच्या मनोविकाराचा, अपमानाचा विचार करायला नको काय? नको या मेजवान्या, नको हा ढोंगीपणा! महाराघरची प्रेमाची भाजीभाकर हजारोपटीनें बरी असें लेखकाला निदान मनांतून तरी त्यावेळीं वाटलें आहे. तेंच अस्पृश्याघरीं भाजीभाकर खाल्ल्यानंतर त्याचे मनावर उमटणाऱ्या कृतज्ञतेच्या व आनंदाच्या चेहऱ्याकडे पाहतांना जो आनंद वाटतो, त्याची कल्पना करवत नाहीं. या रोटीबंदी व बेटीबंदींत आपण मानवतेचा किती अपमान करीत आहोंत? या उच्चनीच भेदांत देशाचें तसेंच स्वतःचें अधःपतन नाहीं काय? हिंदुधर्माचीं पवित्र तत्वें नष्ट होऊन आतां हिंदुधर्म म्हणजे स्पृश्यास्पृश्य धर्म असें झालें आहे.

## नंबुद्रींचें गलिच्छ सोंवळें.

मद्रासकडे ही गोष्ट किती विकृत स्वरूपाला गेली आहे ती खालील गोष्टीवरून समजून येईल. एका विद्वान् वक्त्यांनीं ही गोष्ट सांगितली होती. गोष्ट गलिच्छ आहे पण जातिभेद हा त्यापेक्षां गलिच्छ आहे म्हणून संकोच बाळगण्याचें प्रयोजन नाहीं.

" नायर व नंबुद्री जातींतील गोष्ट. नंबुद्री ब्राह्मण व नायर या जातींत लग्नसंबंध होत असतो. पण त्या जोडप्यांत म्हणे सहपान व सहभोजनास बंदी आहे. होणारीं मुलें शूद्र समजलीं जातात. वडील मुलानें नंबुद्री जातीचीच मुलगी करायची व धाकट्यांनीं नायर जातीशीं ' संबंध--विवाह ' करायचा.

श्रीमंत घराणांतल्या कॉलेजमध्यें शिकत असलेल्या धाकट्या मुलाचें लग्न झालें. मुलगीचें घर लांब २-३ मैलांवर होतें. मुलगा

दिवसांतली बरीच वेळ तिकडे घालवी. बापास शंका आली कीं, हा तेथें जेवणखाण करीत असावा. निषिद्ध भांड्यांतून पाणी पीत असावा. त्यानें पाळत राखली. तिच्या घरीं दडून बसला. मुलग्याला तहान लागली. पाणी घरांतलें चालतें पण जुन्या भांड्यांतून चालत नाहीं असा तिकडे रिवाज आहे म्हणतात. मुलग्यानें आपल्या बायकोजवळ पाणी मागितलें. पण नवीन भांडें मिळालें नाहीं. तहान भयंकर लागलेली! परीक्षेची वेळ आली! आपला मुलगा 'भ्रष्ट' होतो कीं काय म्हणून बाप मोठ्या आतुरतेनें त्या छपून बसलेल्या ठिकाणाहून पहात बसला. तहानेनें मुलगा तर व्याकूळ झालेला. घरीं जावें तर घर २ ३ मैल लांब, मुलग्याला कल्पना सुचली. बायकोला पाणी प्यायला सांगून तें पाणी परत आपल्या तोंडांत सोडण्यास सांगितलें. बापाला आनंद झाला कीं अडचणीच्या वेळींहि प्रसंगावधान राखून मुलानें 'धर्म' न सोडतां वागणूक केली. बापानें पुढें होऊन मुलग्याला पोटाशीं धरलें. आपल्या कुलाचें नांव राखलें म्हणून प्रेमभरानें पाठीवर थाप मारली."

गोष्ट गलिच्छ आहेच आहे पण रोटीबंदीची ओढाताण कुठपर्यंत करतां येते याचें हें एक उदाहरण आहे. हौद शूद्रानें भरून आणायाचा पण नंतर घरच्या घागरीला शूद्रानें हात लावायचा नाहीं, अशीं उदाहरणें महाराष्ट्रांत पाहण्यास मिळतात. ब्राह्मणाला रखेली मुसलमानाची चालते पण मराठ्याच्या हातचें पाणी चालत नाहीं. असो. ही गटाराची घाण रस्त्यावर टाकण्याचा उद्देश तिचें खरें स्वरूप जनतेसमोर ठेवावें हाच आहे.

आतांपर्यंत वाचकासमोर ठेवलेल्या गोष्टींवरून रोटीबेटीबंदीचा कसा बोजवारा उडाला आहे हें दाखवलें आहे. आतां याहि खालीं आपल्याला जायचें आहे.

# प्रकरण ४ थें

## अस्पृश्यता.

" The thousand headed monster "

समुद्रमंथनांतून जसें जगाला जाळणारें हलाहल बाहेर पडलें त्याप्रमाणें विषमतारूपी जातिभेदाच्या समुद्रांतून अस्पृश्यतेचें हलाहल बाहेर पडलें आहे व त्यानें हिंदुधर्माच्या अधःपतनाचा अखेरचा पल्ला गांठला आहे. हिंदुधर्म नामशेष होणार कीं पुनः आपलें अस्तित्व जगाला जाहीर करणार या गोष्टीचा निर्णय अस्पृश्यता राहणार कीं नष्ट होणार यावर आतां अवलंबून आहे. परिस्थितीप्रमाणें बदलून नव्या जोमानें डोकें वर काढणार कीं प्रेताप्रमाणें दुर्गंधी सुटून अखेर किड्यांच्या भक्ष्यस्थानीं पडणार? अस्पृश्यतेनें हिंदुधर्माचा पाय सडूं लागला आहे. तो निर्बल होत आहे.

आज अस्तित्वांत असलेल्या अस्पृश्यतेचा विचार करण्यापूर्वीं तिच्या पूर्व इतिहासाकडे थोडीशी दृष्टि टाकूं. त्याची जरूरच आहे असेंही नाहीं. कारण अस्पृश्यतेला शास्त्राधार असला किंवा नसला तरी भूतदयेला सुटून असलेल्या वागणुकीला आधार केव्हांच दाखवतां येणार नाहीं. तसा ग्रंथाचा आधार दाखवून अस्पृश्यतेचें प्रतिपादन केल्यास तसले ग्रंथ बेलाशक फाडून जाळून बुडवून टाकावेत. असो–

अस्पृश्यता उत्पन्न होण्याला प्रथम आर्य–अनार्यांचा द्वेष कारणीभूत झाला असावा असें अनुमान निघूं शकतें. ( जर्मन युद्धाचे वेळीं त्या राष्ट्राशी लग्नसंबंध घडूं नये अशी प्रवृत्ति झालेली दिसून आलेली आहे ) आपले संबंध अनार्यांशीं होऊं नयेत, आपल्या

मुलींचा संबंध परक्या लोकांशीं होऊं नये म्हणून त्यांनीं बहिष्कार घातला असावा. बुरुड, कैवर्त, मेघ, भिल्ल वगैरे अस्पृश्यांचीं नांवें अनार्यांचीं आहेत. याचप्रकारें परप्रांतावरही बहिष्कार घातल्याचें वैदेहक, व मगध या देशांवरून पडलेल्या नांवावरून दिसतें; तथापि हा प्रतिबंध टिकलेला दिसत नाहीं. कारण तसें असतें तर विदुर, कर्ण, रोमहर्षण, जनक, व दिलीपाची बायको सुदक्षिणा हे अस्पृश्य ठरायला पाहिजेत. चांडालांना अस्पृश्य ठरवण्याचें कारणही ते अनार्य हेंच असावें. चंड म्हणजे–प्रचंड भयंकर–क्रूर लोकांना हें नांव मिळालें असावें असें त्यांच्या नांवावरून अनुमान काढतां येईल. आर्य–अनार्यांचा संबंध होऊं नये म्हणून निर्बंध घातला तरी स्त्री–पुरुषांच्या गांठी ह्या पडायच्याच. न पडणेंच मनुष्यस्वभावाला सुटून झालें असतें.

हरापा, मोहन-जो-दारो वगैरेंच्या नवीन लागलेल्या शोधानें आर्य–अनार्यांच्या संबंधावर आतां नवीन प्रकाश पडूं लागला आहे. त्यांतील खोदकामावर व वस्तूंवर आर्य–अनार्य या दोन्ही संस्कृतींचा परिणाम झालेला दिसतो. तज्ज्ञांच्या मतें दोन्ही संस्कृतींचें ऐक्य झालें आहे. इतकेंच नाहीं तर रक्तांचीही भेसळ झाली आहे. (माडर्न रिव्हयू जून १९३०). "Self segregation for any society is no longer practical in this age". Tagore. आज कोणत्याही समाजाला कूपमंडूकवृत्तीनें राहून चालणार नाहीं. पूर्वीपेक्षां जगाचे संबंध सुधारणेमुळें जवळ येत आहेत. जग विश्वबंधुत्वाकडे आपोआप जात आहे. म्हणून ही एकलकोंडी वृत्ति यापुढें टिकणें अशक्य आहे.

मनुस्मृतिकारांनीं अस्पृश्याची व्याख्या निराळी केली आहे. त्यांत वर्णावर्णाची भेसळ होऊं नये विशेषतः वरच्या वर्णांतील

स्त्रीशीं खालच्या वर्णांतील पुरुषाचा संबंध घडूं नये याबद्दल आग्रह दिसतो. अनुलोम विवाहावर कटाक्ष नाहीं. ब्राह्मणानें खालच्या वर्गाच्या स्त्रीबरोबर लग्न लावलें व तिला कन्या झाली. पुनः त्या कन्येनें ब्राह्मणपुरुषाशीं लग्न लावलें, अशाच सात पिढ्या गेल्या म्हणजे त्या अनुलोम संततीचा समावेश ब्राह्मण वर्गांत केला आहे. अनुलोम विवाहांत पुरुषाच्या वर्णाचीच संतति समजली जाते. यांत उच्च वर्णीयांचा शुद्ध पक्षपात दिसतो. प्रतिलोमविवाह हा वर्णसंकरकारक असून ब्राह्मणस्त्री व शूद्र संबंध भयंकर पापमूलक असा त्याच्यावर स्मृतिकारांनीं शिक्का मारला आहे. "शूद्राज्जातस्तु चांडालः सर्वधर्मविवर्जितः।" अशी संतति सर्व धर्मापासून च्युत व बहिष्कृत मानली आहे. अनुलोम व प्रतिलोम विवाहांत, हिंदुसमाजाची सुधारणा होण्याला प्रतिलोम म्हणजे वरच्या वर्गांतील स्त्रीचा खालच्या वर्गांतील पुरुषांचीं लग्नसंबंध होणें अधिक फायदेशीर होईल अशी लेखकाची समजूत आहे. खालच्या वर्गांत वरील वर्गाची संस्कृति शिरायची तर ती स्त्रियांकडूनच शिरणार. मुलाला बापापेक्षां आईचाच सहवास अधिक मिळतो. मुलाची सुधारणा बापापेक्षां आईवर अधिक अवलंबून आहे. मातेच्या संस्कृतीचाच मुलावर अधिक परिणाम होणार असल्यानें खालच्या वर्णाची पिढी वरच्या वर्णांतील स्त्रीमुळें सुधारणें सोपें जाईल. या दृष्टीनें प्रतिलोम विवाहच श्रेष्ठ ठरेल. स्मृतिकाराची दृष्टि आपल्या विशिष्ट वर्गापुरतीच असल्यानें व्यापक दृष्टि ठेवून विचार करण्याची गरज त्यांना भासली नसावी. ब्राह्मणवर्गांतील संस्कृति इतर वर्गांत जाऊं नये अशीच खबरदारी त्यांनीं घेतली आहे. मनुस्मृतिकारांनीं मानलेली संकर प्रजा म्हणजेच अस्पृश्य प्रजा होय. या प्रजेवर त्यांनीं कमालीचा सूड उगवला आहे. "यांनीं ग्रामाच्या

बाहेर घरें करून रहावें", त्यालाही हेंच कारण दिसतें. "यांनीं ज्या पात्रांत कांहीं खाल्लें असेल त्यास अग्नीचा संस्कार करूनही द्विजांनीं घेऊं नये. कुत्रे व गर्दभ हें त्यांचें धन होय. मृत मनुष्यांचीं वस्त्रें त्यांनीं वापरावीं. शंखादि फुटक्या भांड्यांत यांनीं भोजन करावें. लोखंडाचे कंकणादि अलंकार घालावे व सतत फिरत असावें. यांचें अन्न पराधीन असावें. धर्मानुष्ठानसमयीं यांसह भाषण, दर्शन, व्यवहार करूं नये."

मुलीचा मुलगा अस्पृश्य, कारण तिनें हलक्या वर्णांतील पुरुषावर प्रेम केलें म्हणून आणि मुलाचा मुलगा त्यानें हलक्या वर्णांतील स्त्रीशीं लग्न केलें तरी अस्पृश्य नव्हे. हा न्याय पुरुषांचाच ना? आपल्याच लेकी बाळींच्या संततीवर असा सूड उगवणें हें माणुसकीला धरून आहे काय? अस्पृश्यांवर बहिष्कार घालून पुनः ते अशिक्षित आहेत अमंगळ आहेत, अभक्ष्यभक्षण करणारे आहेत, असा आरोप करणें म्हणजे डोळ्यांत बोटें घालून आंधळे केल्या नंतर तुला दिसत कां नाहीं म्हणून विचारण्याजोगेंच नाहीं काय?

## सर्व संग्राहक मराठावर्ग.

आज अस्पृश्याकडे पाहिलें तर बहुतेकांचीं आडनांवें क्षत्रिय व मराठे घराण्यांतील आहेत. अस्पृश्य हे मराठ्यांपैकींच असल्यानें त्यांनीं त्याना लवकर वरती काढण्याची खटपट करावी. हिंदुधर्मांत मराठा हीच जात सर्वसंग्राहक होऊं लागली आहे. कोणत्याही जातीचा मनुष्य एक दोन पिढ्या गेल्या कीं, त्या समाजांत येऊं शकतो. पाटाच्या व बिनपाटाच्या चालीचीं मोठमोठीं घराणीं एक होऊं लागलीं आहेत. लेखकाची खात्री आहे कीं, जातिभेद काढून टाकणें जर कोणच्या जातीला लवकर शक्य होईल तर तें मराठा जातीलाच होईल. ही गोष्ट राजे लोकांनीं मनावर घेतली तर फारच

लवकर होईल. मराठा पोट जातींला नेहमीं आपला धागाधोरा कुठल्यातरी राजकुळीस चिकटवण्याची फार हांव असते. तोच आधार नाहींसा झाला तर त्याचा परिणाम आपोआपच सर्वत्र होणार आहे. शाहूमहाराजांनीं धनगर व क्षत्रिय उच्च घराण्यांचा संबंध घडवून आणून व अशाच प्रकारचीं लग्नें आपलें वजन खर्च करून घडवून आणल्यानें फारच चांगला झाला आहे. इतर सर्व जातींना मराठावर्गानें धडाडीनें निश्चयानें पुढें होऊन आपल्यांत घेतल्यास ब्राह्मणवर्गाला आपोआपच नमतें घ्यावें लागेल. मराठावर्गाला गडकऱ्यांनीं स्फूर्तिदायी संदेश दिलाच आहे हा 'मानवधर्माचा दसरा' मराठावर्ग धडाडीनें साजरा करू शकेल. गडकरी म्हणतात." जरिपटका ह्या सुधारणेचा। भगवा झेंडा नव्या मताचा। नव्या दमानें फडकविण्याचा। मानवधर्माचा हा दसरा।

लेखकाचे वडिलांनीं हंटर पत्रामध्यें 'महाराष्ट्राचा मध्यबिंदू मराठा' या मथळ्याखालीं एक अग्रलेख लिहिला होता. त्यांचे विचार लेखकाच्या विचाराला जुळत असल्यानें ते थोडक्यांत देत आहे.



"मराठा संग्राहक आहे. त्याची संस्कृति जिवंत आहे. मराठ्याला आज कोणाच्याही हातचें पाणी चालतें. ब्राह्मण, जैन, लिंगायत, कुणबी, साळी, लोहार, कुंभार, सुतार, कोळी धनगर अशांपैकीं कोणाच्याही हातचें अन्नपाणी मराठ्याला चालतें. अस्पृश्य वर्गाला पोटी घेण्यास, अन्नापाण्यांत समावेश करण्यांत त्याला भीति वाटत नाहीं. ( तो लवकर अनुकूल होतो. )"

मराठा बंधूंनो तुमचें पूर्वीचें वैभव लक्षांत घ्या. तुमची उज्वल

परंपरा लक्षांत आणा, तुम्ही राज्य केलें आहे. समाजाचें धुरीणत्व तुम्ही अनेक वेळां पत्करलें आहे, रामकृष्णाचीं तुम्ही मुलें आहांत. ज्या रामकृष्णांनीं आपल्या चारित्र्यानें सात्विक गुणाची तुम्हाला ओळख पटवून दिली आहे, सनातन भागवत धर्माची शिकवण तुम्हाला दिली आहे. त्या थोर विभूतींचे तुम्ही वंशज आहांत दुसऱ्या कोणाची वाट न पाहतां शीलास आणि व्रीदास जागून गांजलेल्या निकृष्ट वर्गाला पोटीं घ्या. ”

अस्पृश्यतेला शास्त्राधार नाहीं. अस्पृश्यतेला वर्णांत जागा नाहीं. भूतदयेला ती सुटून आहे ती शब्दाच्या अर्थाला सुटून आहे. अस्पृश्यतेवर कांहीं ठराविक आरोप आहेत. त्याची आतां येथें छाननी करूं.

## आक्षेप.

जातिभेद अर्थात् अस्पृश्यताहि जन्मतः मनुष्याचे मागें लागली आहे. म्हणून ज्या त्या जातींतच त्यानें राहिलें पाहिजे. अस्पृश्य स्वच्छ नसतात, अमंगळ राहतात, म्हणून त्यांना जवळ घेतां येत नाहीं. अस्पृश्य मृतमांस खातात, निषिद्ध पदार्थ खातात, म्हणून त्याना पंक्तींत घेतां येत नाहीं. त्यांची संस्कृति वाईट आहे म्हणून त्यांच्याशीं सहवास ठेवणें बरें वाटत नाहीं, असे कांहीं आक्षेप बहुधा विचार न करतांच स्पृश्य लोक करीत असतात व अडाणी वर्गहि हेंच म्हणणें पुढें करतो; म्हणून मध्यम वर्गाच्या समजुतीकरितां खालील गोष्टींचें निरसन करावें लागत आहे. वाईट गोष्ट समजूनहि जे जाणते लोक अस्पृश्यता ठेवूं इच्छित असतील त्या शाहण्यांची—कानउघाडणी करणें ही ब्रह्मदेवाच्याहि हातची गोष्ट नाहीं. असो.

## शब्दाचा अर्थ व अर्थाचा विसंगतपणा.

अस्पृश्यतेचा विचार करतांना त्या शब्दाचाच विचार करूं. जी गोष्ट घाण आहे, ज्या वस्तूला दुर्गंधि येत आहे, शेण, मूत, सडलेलें मांस, रोगी मनुष्य, महारोगी, प्लेगदूषित मनुष्य वगैरे संसर्गजन्य रोगी यांना अस्पृश्य म्हणतां येईल. या गोष्टी सदैव अस्पृश्य राहतील. आरोग्यासाठीं त्या तशा राहायलाच पाहिजेत. पण ६।७ कोटी मनुष्यांची सर्व जातच्या जात एकाच वेळीं अस्पृश्य कशीं होऊं शकेल?

शंभर माणसांचें स्नान होईल एवढा मोठा हंडा तापवला. पाण्यांत टाकतांच किडा मुंगी मरेल इतकें पाणी तापवलें. अंगाला चार पिअर्स सोपच्या (साबणाच्या) वड्या घासल्या, सुगंधित तेलाचें मर्दन केलें व घा-घासून सालटें निघेपर्यंत चोळून आंघोळ घातली व नंतर भट्टीचे करकरीत परीटघडीचे कपडे चढवले. त्यावर लव्हेंडरच्या बाटल्या ओतल्या, बटनहोलमध्यें सुंदर सुवासिक गुलाबाचें फूल लटकवलें, तर अशा मनुष्याला अस्पृश्याच्याच यादींत टाकणार काय? पण याहि मनुष्याला—धोतराला तेलाची पुटेंच्या पुटें चढलेला, आंगभर खरूज उठलेला व हातीं शेणगोळा घेतलेला भांडीघाशा ब्राह्मण किंवा कोंकणचा बाळू—शिवून घेत नाहीं. असा दुर्गंधींत दिवस काढणारा मनुष्यच वरच्यास अस्पृश्य समजतो. यांतील खरा अस्पृश्य कोण तें वाचकांनींच ठरवावें.

अस्पृश्य अस्पृश्य म्हणण्यानें, शिवाल शिवाल म्हणण्यानें, म्हणणाराच मनानें पतित होत असतो. याचा उच्चवर्णीयांनीं विचार करायला पाहिजे. तुकोबा म्हणतात—' महारासी शिवे। कोपें, ब्राह्मण तो नव्हे । तया प्रायश्चित्त कांहीं। देहत्याग करितां नाहीं ॥ नातळे

चांडाळ । त्याचा अंतरीं विटाळ । ज्याचा संग चित्तीं । तुका म्हणे तो त्या यातीं ॥" हिना—मरव्याचीं अत्तरें लावून अंगाला घमघमाट सुटलेला आहे पण मन मात्र हीनवृत्तीनें भरलेलें आहे तर त्याची खरी जात अस्पृश्य हीच होय. 'उत्तम कुळीं जन्म क्रिया अमंगळ" असेल तर तोच अमंगळ जातीचा होय. बेरड मांगासारखी कृति करणारा ब्राह्मण खरोखरी त्या जातीचाच होय. "आसुरी स्वभाव निर्दय अंतर । मानसीं निष्टुर अतिवादी । याति कुळ येथें असे अप्रमाण । गुणाचें कारण वसें अंगीं ॥" गुणानें उच्चवर्णांत गेलेल्यांचीं उदाहरणें मागें दिलींच आहेत "अंत्यजादि योनी तरल्या हरिभजनें । तयांचीं पुराणें भाट झालीं ॥" चोखा, नंद, रायदास असे साधुसंत सर्व वर्गाला पूज्य असे या वर्गात प्रतिकूल परिस्थितींतही निर्माण झाले आहेत.

## अस्पृश्य घाण काम करतात.

अस्पृश्य अमंगळ राहातात म्हणून शिवणें बरें वाटत नाहीं. ते घाण काम करतात.

घरोघरीं काय प्रकार चाललेला असतो तें पहा, सकाळीं उठल्याबरोबर घरची मालकीण सडासारवण करते. पोतेरा घेऊन चूल सारवते. जनावराचा गोठा, परडें साफसूफ करून, लहान मुलाची घाण वगैरे काढून, त्याला स्वच्छ करते. याच् कामाकरितां जनता मातेला देवाप्रमाणें भजते. देवापेक्षां पूज्य मानते. आईचें वर्णन करतांना, माते तूं मला लहानाचें मोठें केलेंस, तूं माझी घाण काढलीस, सेवा केलीस असें म्हणून तिचा गौरव करतों. पण तेंच काम करणाऱ्या, गांवाची घाण काढणाऱ्या, गटारें साफसूफ ठेवणाऱ्या, रस्ते साफसूफ ठेवणाऱ्या, अस्पृश्यांस मान देण्याऐवजी त्याचा

तिटकारा करतों. 'हिडिताछिडित' करून जनावरांपलीकडे लेखतों. जर शहराची घाण काढली नाहीं, संडास वेळच्यावेळीं साफ झाले नाहींत; रस्त्यांत केरकचरा तसाच राहिला; तर प्लेग, महामारीचा सपाटा येऊन गांवच्या लोकांचा निकाल लागला असता; पण या संकटापासून वांचवणाऱ्या पवित्र लोकांचे आभार मानून, त्यांना पूज्य मानण्याऐवजीं आपण त्यांना कमी लेखतों, हा किती कृतघ्नपणा आहे?

घाण काम, घाण काम म्हणणाऱ्यांना रोज स्वतःला घाण काम करावें लागतें याची आठवण रहात नाहीं. आपल्या मांडीवर घाण केलेल्या मुलाचा तुम्ही द्वेष करीत नाहीं, त्याला धुवून मांडीवर घेतांच ना! आणि मुलानें ओलें केलेलें धोतर बाहेर जातांना बदलतांच असें तरी कुठें आहे? डॉक्टरसाहेब फर्लांगवर घाण सुटलेलें प्रेत फाडून आले तरी मानाची खुर्ची त्यांना देतांच. मग घाण कामाची पुढें केलेली सबब कुठें टिकली आहे? त्याला तुम्हीच हरताळ फांसला आहे. मात्र हा भेद व हें तत्व अस्पृश्य जातीपुरतें पाळण्यांत मात्र मनाची चाड आपण बाळगत नसतों. उघडाउघड पक्षपात करतांना तुम्हांस कांहीं खंती वाटत नाहीं. या शिवाशिवीला रामानुजाचार्यांनीं प्रत्यक्ष कृतीनेंच उत्तर दिलें आहे. त्यांचे दोन शिष्य होते. एक ब्राह्मण व एक अस्पृश्य होता. ते स्नानाला जातेवेळीं ब्राह्मण शिष्याचा हात धरून जात व स्नाना-नंतर परत येतांना अस्पृश्याच्या खांद्यावर हात टाकून येत. एकनाथ महाराज म्हणतात 'आम्हां सोवळें ओवळें नाहीं । विटाळ न देखो कवणें ठायीं ॥' पण अशुद्ध मनाच्या लोकांनीच हें सोव-ळ्याचें अवडंबर माजवून माणुसकी सोडली आहे. "शिवाशिवीचा विटाळ याचा फारच सुकाळ । यानें किती केलें पाप, त्याचें नाहींच हो माप ।" या सोवळ्यानें मनाचा मलीनपणा अधिकच वाढला आहे.

## घाण पदार्थ खातात.

अस्पृश्य मांसासारखे निषिद्ध पदार्थ खातात. म्हणून त्यांना पंक्तींत घेतां येत नाहीं ! !

मांसाशनच म्हणावें तर ब्राह्मणवर्ग पूर्वी मांस खातच होता. श्राद्धाला मांस अमक्या जनावराचें घेतलें तर अमके दिवस पितर तृप्त होतात, अशा चढउतर पायऱ्या मनुस्मृतिकालीं सांगितल्या आहेत. मत्स्यांच्या मांसानें २ महिने पितर तृप्त होतात, हरिणाच्या मांसानें तीन महिने, मेंढ्याच्यानें चार महिने, द्विजास भक्षण करण्यास योग्य असलेल्या पक्ष्यांच्या मांसानें ५ महिने, बकऱ्याच्यानें ६, चित्रमृगाच्यानें ७, रानडुक्कर, रानरेडा यानें १०, वगैरे वगैरे....” मनुस्मृति अध्याय ३—श्राद्धास निमंत्रण केलेल्या ब्राह्मणानें मांसाशन करावें असें व्यासस्मृतींत सांगितलें आहे. अद्यापही उत्तर हिंदुस्थानात कांहीं ब्राह्मण मांस वर्ज्य मानीत नाहींत.

बंगाल व काश्मीरकडील ब्राह्मण उघडपणें मांसाहार करितात. आणि स्पृश्यास्पृश्यतेला मांसाहार आड येत नाहीं. मराठे मांसाहार करतात. त्यांची शिवाशिव चालते. मग अस्पृश्यापुरती ही सबब पुढें करतां येणारच नाहीं. महात्माजी म्हणतात, “ हिंसा या शब्दाचा अर्थच पुष्कळजण चुकीचा करतात. केवळ मांसाहार करणें एवढीच हिंसा नव्हे. आपला काल्पनिक पवित्रपणा वाखाणण्यासाठीं आपले लक्षावधि बांधवांना पद्धतशीर चिरडून टाकणें ही केवढी राक्षसी हिंसा आहे. धान्याहारी ब्राह्मणांना मी कळवतों कीं आपण सुरक्षित रहावें म्हणून दुसऱ्यांना बहिष्कृत ठरवून त्यांना पशु कोटींत घालणें हें जर पवित्र काम असेल तर असला पवित्रपणा आतां नको आहे. असला खोटा पावित्र्याचा फुगा वाऱ्याच्या

झुळकेबरोबर फूटून जाईल." एकनाथ महाराजांनीं ही रोटीबंदी मोठ्या धैर्यानें मोडून टाकली आहे. "एकनाथ महाराजांनीं आपल्या पितरांच्या श्राद्धाच्या वेळीं महार मांगास आधीं जेऊं घातलें आणि ब्रह्मवृंद रागावला तरी त्याची पर्वा केली नाहीं." नाथमहाराज म्हणतात 'चोखियाचे घरीं शुद्ध होय अमृत ॥ एका जनार्दनी मात काय सांगू ॥'

आतां चालू परिस्थितीकडे पाहूं. आपला लाडका कुत्रा, वाघ्या किंवा मोगऱ्या, टॉम किंवा जॅक गल्लींतील गटारें धुंडून आल्यावर मालकाचे तोंडाजवळ जाऊन, लडिवाळपणानें त्याचें चुंबन घेतो व मालक त्याला अंगावरून हात फिरवून कवटाळत असतो. हें दृश्य तुम्हाला हजारों ठिकाणीं पहायला मिळेल. 'इश्श मेलं' करणारी काकू आपल्या लाडक्या मनीनें दुधांत तोंड घातलें तरी कांकू करीत नाहीं; मग त्या मांजरानें कुजलेला उंदीर दांतडलेला असो कीं हाडूक गट्ट केलेलें असो. 'शिवाल शिवाल' करून सोवळें आवरत निघालेले भटजी म्हशीला पहाटें सोडली नाहीं म्हणून इकडे रागावत असतात, तर इकडे महार निषिद्ध पदार्थ खातात म्हणून त्यांना गलिच्छ व अस्पृश्य मानतात! महार मांग निषिद्ध खातात म्हणून पंक्तींत विटाळ होतो पण दूध पितांना इतर कोणत्याहि गोष्टींची आठवण येत नाहीं. यापेक्षां वागणुकीचा विसंगतपणा कोठें आढळेल?

## जात देवानें दिली.

कांहीं लोक जातीचें खापर देवावर आदळतात. संस्कृतीचा व जन्माचा संबंध लावतात.

जात देवानें पाडली हें कुणालाहि पटण्याजोगें आहे. लेखकाचाहि या गोष्टीला विरोध नाहीं. निसर्गानें पडलेल्या जाती बदलणें

ही कांहीं मानवांच्या हातची गोष्ट नाहीं. या गोष्टी तीच शक्ति करूं जाणे.

तिनें झाडांतहि जाती पाडल्या आहेत. त्या आपल्याला चटकन दिसतात. उंच सरळ जाणारें नारळीचें झाड, आंब्याचें झाड, वडाचें झाड, निरनिराळ्या जातींच्या वेली यांची भेसळ होत नाहीं. त्या जाती स्पष्ट समजूं शकतात.

बैल, घोडा, उंट, शेळी, कुत्रें, मांजर या जाती कोणालाहि सहज हुडकून काढतां येतात.

माणसाच्या जातींत असा भेद दाखवतां येत नाहीं. म्हणून जाती राहणार, पण त्या अशा राहणार.

## माणसाची जात एकच.

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, अस्पृश्य, मुसलमान, जैन, लिंगायत यांच्या जातींत अशी ओळखण्याजोगीं चिन्हें देवानें दिलेलीं कांहीं दिसत नाहींत. एकाच जमखान्यावर या निरनिराळ्या म्हणून समजल्या गेलेल्या जातींचीं लहान मुलें टाकलीं तर त्यांतलें अमक्याच जातीचें म्हणून कुणाला ओळखतां येईल काय? निसर्गाची तशी इच्छा असती तर तशीं चिन्हें स्पष्ट दिसलीं असतीं. ब्राह्मणाचें मूल जानव्यासकट, क्षत्रियाचें तरवारीसकट, वैश्याचें ताजवा घेऊन, अस्पृश्याचें अंगाला घाण सुटलेलें, मुसलमानाचें दाढी घेऊन जगांत आलें असतें. असें कांहीं केलें नाहीं. सर्वांना सारखाच आकार दिला आहे. आणि सर्वत्र वास करणारी शक्ति ( तिला वाटल्यास देव म्हणूं ) एकच आहे.

" राम, रहीम, करीम, केशव, अलख नाम एक साचा है ॥
जिसकू तुम बिसमिल्ला कहते । विष्णु हमारा सांई है ॥
बह्मन हो कर जनवा पेने । बह्मनिकूं क्या पेहनारे ।
कहत कबीरा सुनो नर अंधे । हरी हजरत दो एक है ॥

पण धर्माच्या नांवाखालीं एकीऐवजीं बेकी वाढत आहे. या औपचारिक सोंगांची हजिरी सर्व सुधारकांनीं घेतलीच आहे. मनुष्य जात येथून तेथून सारखीच आहे. जात म्हणून त्यांच्या रक्तांत फरक नाहीं. प्रभु गौतम बुद्ध म्हणतात.

"There is no cast in blood which runneth of one hue; neither comes a man to birth with Tilka mark stamped on the brow, nor sacred thread on neck". -Light of Asia, Arnold.

हे विचार म्हणजे जणू कबीरजींच्या विचारांचें भाषांतरच नाहीं काय? 'गंधाचा टिकला किंवा जानवें घेऊन कोणी जन्माला येत नाहीं.' 'जन्मना जायते शूद्रः संस्कारात् द्विज उच्यते' जन्मतः सर्व शूद्र असून जे संस्कार मनुष्यावर घडत असतील त्या मानानें तो त्या वर्गांत जाऊ शकतो हें तत्व कुणालाही मान्य होण्याजोगें आहे. जात जन्मावर अवलंबून असणें हें मात्र सारासार विचाराला सुटून आहे. संस्कार याचा अर्थ मात्र उपनयन, जानवें घालणें, सुंता, मुंडन, बाप्तिस्मा असा मात्र नव्हे. संस्कार म्हणजे शिक्षण होय. लहानपणापासून ज्या संस्कृतींत मूल वाढेल ते संस्कार त्याचेवर होत असतात. " मुद्रा लावितो कोरुनी, मान व्हावयास जनीं ॥ तुका म्हणे ऐसे किती, नरका गेले पुढे जाती ॥ " म्हणून मुंज म्हणजे ब्राह्मणपद नव्हे, तसेंच सुंता म्हणजे मुसलमान नव्हे. हे औपचारिक सोंग आहे. यांचा आणि धर्माचा संबंध नाहीं.

यानें ईश्वर सांपडत नाहीं. " तुका म्हणे अवघे सोंग। तेथें कैचा पांडुरंग ॥ "

## संस्कृतीची सबब.

संस्कृतीची सबब म्हणावी तर तीही पहा. लहान मुलें अरण्यांत टाका, त्यांना कसलेंहि शिक्षण देऊं नका. मग ब्राह्मणाचा मुलगा आपोआप गायत्रीमंत्र बडबडतो आहे, मुसलमान कुराणांतलीं वाक्यें बोलतो आहे, अस्पृश्य सारखा शिव्या देत सुटला आहे, असें होईल काय? याच वर्गांत संत रायदास, चोखामेळा, नंद वगैरे साधुवर्य झाले. याच वर्गांतील एका संत स्त्रीची रामानुजाचार्यांनीं देवालयांत स्थापना केली आहे.

मग कोणत्याहि आक्षेपाला जातिभेद व अस्पृश्यता टिकत नाहीं. हा भेद उगाच आम्ही पाडून परस्परांत वैमनस्य उत्पन्न केलें आहे. साप साप म्हणून उगाच परस्परांस बडवत सुटलों आहोंत. पूर्वीचा स्वार्थ टाकून आतां तरी यापुढें आपण सर्व समसमान भांवडें आहोंत हें जाणून, हे जातिभेदाचे भेद गाडून टाकून, ईश्वराघरचीं लेकरें म्हणून प्रेमानें भेटूंया. नीच कोठोनी जन्मला। पंचभूतांवेगळा झाला। तया नाहीं का जनन। सर्वेचि होत पतन ॥" तेव्हां आपण सर्वच बंधू आहोंत व "विश्वचि माझें घर" हें जाणून सर्व द्वैताला गाडूंया! तुकोबा म्हणतात "तुम्ही नका करूं गर्व। उंच याती मिळुनी सर्व॥ शुक्र शोणिताच्या खाणी। तुम्हा आम्हा एकच योनी॥ रक्त मांस चर्म हाडें। सर्वांठायीं सम पाडे॥ तुका म्हणे हेंचि खरें। नाहीं देवासी दुसरें॥

## त्यांचे ठिकाणीं जा आणि विचार करा!

भाई हो! थोडा वेळ तुम्ही, मनानें त्यांचे ठिकाणीं जा आणि



महात्मा जोतीराव फुले.

त्यांच्या परिस्थितीचा विचार करा. म्हणजे ते किती हालांत आहेत, आपण त्यांना किती अन्यायानें वागवत आहोंत याची कल्पना येईल. रूढीनें गंजलेली बुद्धि साफ करून, माणुसकीच्या दृष्टीनें पहा. “भंगी महार इत्यादि जाति आज पशूंच्या पंक्तीला येऊन बसल्या आहेत. पण हें पशुत्व त्यांच्यावर कोणी लादलें? त्यांच्यासंबंधीं आमची वागणूक अत्यंत निर्दयपणाची आहे. माणसांशीं वागतांनासुद्धां इतका भयंकर निर्दयपणा दाखवून पुनः ‘सर्वं खल्विदं ब्रह्म’ असा उच्च घोष करण्यास आम्ही तयारच. महारामांगासमोर अशीं अद्वैत तत्वें बोलून दाखवणें म्हणजे त्यांना जखम करून तींत मिठाचें पाणी ओतणेंच नव्हे काय?” (विवेकानंद.)

“क्रियाहीनश्च मूर्खश्च सर्वधर्मविवर्जितः ।
निर्दयः सर्वभूतेषु विप्रश्चांडाल उच्यते ॥

यावरून हेंच स्पष्ट होत नाहीं काय? कीं ब्राह्मण म्हणून घेणारा क्रियाहीन, मूर्ख; कर्तव्यच्युत, भूतदयाविरहित असल्यास तोच चांडाल जातीचा होय! अस्पृश्याचे बाबतींत, वरील बहुतेक सर्व उच्चवर्णीयांनीं, भूतदयेला हाकून दिल्यामुळें-तेच चांडाळ ठरत नाहींत काय? पण याच तुकोबाच्या टाळकऱ्यांत आज जातिभेद, शिवाशिव भरपूर आहे!! इकडे तुकोबाचे अभंग तोंडानें म्हणत असतां त्याच तोंडानें त्याचवेळीं ‘शिवाल शिवाल’ हीं वाक्यें बाहेर येतात!! जिकडे पहावें तिकडे भजनाची पोपटपंचीच चाललेली! मन निर्मळ नाहीं आणि उगाच भजन तरी कशाला करावें. हीं तुकोबाचीच चेष्टा नव्हे काय? तुकोबाच म्हणतात—

काय बा करिसी सोवळें ओवळें । मन नाहीं निर्मळ वावुगेंचि ॥

या शिवाशिवीनें साधी माणुसकी आमच्यांत राहिली नाहीं. एक गोष्ट वाचलेली आठवते:—

"गांवाबाहेर आंब्याचे वनांत कांहीं मुलें खेळत होतीं. तेथें बरेच वानर होते. मुलांनीं कळ काढतांच त्यांतला एक मोठा वानर खालीं उतरला व त्यानें त्यांतील एका ब्राह्मणाचे मुलास पकडून मारण्यास सुरवात केली. हें पहातांच त्या मुलांतलि एक धाडशी अस्पृश्य मुलगा पुढें झाला. त्यानें ब्राह्मण मुलास वानराचे पकडींतून सोडवलें. पाणी आणून त्याच्या जखमा पुसल्या. इतर मुलें गांवांत पळून गेलीं होतीं. त्यांनीं त्या मुलाचे घरीं हकीकत कळवितांच मुलासाठीं त्या ब्राह्मणमुलाच्या घरची मंडळी धांवत आली. त्यांनीं–ज्या एका मुलानें आपल्या मुलाचा जीव बचावला आहे, तो त्याची शश्रूषा करीत आहे हें पाहिलें. त्यांचा जीव खालीं पडला. थोड्या वेळांत जवळ बसलेला मुलगा अस्पृश्य समजतांच, शिवाशिवीच्या धाडसाबद्दल त्या अस्पृश्य मुलावर लाखोली वाहण्यास सुरवात केली. त्याला मारही मिळाला. त्याला घरीं रडत जावें लागलें."

केलेल्या उपकाराबद्दल हें प्रायश्चित त्याला मिळालें!!! या अस्पृश्यतेमुळें आमच्यांतील साधी माणुसकीही नष्ट झाली आहे. खेडोखेडीं हे प्रकार दिसून येतील. याचवेळीं पुरुषार्थ मासिक हातांत पडलें; त्यांत बाळूभाई मेहता यांचें पत्र छापलें आहे तें सारांशानें देत आहें.

"खादीविक्रीसाठीं आम्ही ता. ५-१०-३१ रोजीं शिरपुरास गेलों. तेथें जें दृश्य आमच्या नजरेस आलें तें पुढें सादर करीत आहें. धर्मशाळेच्या नजीकच गांवविहरीवर गेलों. मातीच्या घागरी डोक्यावर घेऊन आलेल्या महार आणि भिल्ल, बायकांचा घोळका उभा असलेला दिसून आला. आपण असें उभे कां असें

विचारतां " आम्हाला विहरींतून पाणी काढण्याची मनाई आहे. आमच्याकरितां विहिरीच्या डाव्या आणि उजव्या बाजूला दोन हाळ बांधले असून त्यांतून जेव्हां कोणी उच्चवर्णीय हिंदू पाणी टाकील तेव्हां तें आम्हांस मिळतें आम्हाला हाळाला शिवण्याची देखील मनाई आहे " हा अनुभव प्रत्येक प्रचारकाला मिळत आहे. लेखकाला मिळाला आहे गांवचे लोक सभेपुरते माना डोलवतील पण कृतींत उपदेश उतरत नाहीं.

## एक हृदयद्रावक गोष्ट

एक मोठी हृदयद्रावक गोष्ट आठवते. " एक अस्पृश्य स्त्री अशीच एका विहिरीवर पाण्यासाठीं वाट पहात दिवसभर बसली. सबंध दिवसांत कोणी लोटकेंभर पाणीहि तिला घातलें नाहीं. रात्र झाली पोरें रडूं लागलीं म्हणून तिनें घागर विहरींत सोडली. आंत घागरीच्या बुडबुडण्याचा आवाज झाला. तो ऐकून कोणी चोर आला या कल्पनेनें घरचीं माणसें बाहेर आलीं. अस्पृश्य स्त्री घाबरून दडून बसली होती. पण माणसें धुंडूं लागतांच तिचा आकार दिसला. चोर चोर म्हणून तिला सर्वांनीं बेदम मारलें. प्राणांतिक किंकाळ्या फोडून ती बेशुद्ध पडली. दिवा आणून पाहतांच ती ओळखीची अस्पृश्य स्त्री असलेली आढळली. मग तर लोकसमुदाय फारच खवळला. त्यांनीं तिला कुंपणाबाहेर फेकून घरच्या सर्व मंडळीवर ताव काढला. गांवपंच जमून त्या घरच्या पुढाऱ्याला शासन केलें. ब्राह्मण आणून दुसरें दिवशीं ती विहीर शुद्ध करून घेतली." खरोखरीच आग लागो या शुद्धत्वाला—

' दीनपणाला गर्वें छळतें। अज्ञानाला भिउनी पळतें। त्या वर
घ्याया नच जें वळतें। उच्चत्वाला त्या लावा आग। ( गडकरी. )

ही स्थिति पाहिली म्हणजे आपण ज्या परक्यांच्या बुटांच्या लाथा खातों हा ईश्वरी न्याय नव्हे काय?

समुद्रावर कोणाचा हक्क नाहीं, तो परमेश्वराचा आहे, त्यावर कर बसवणें अन्याय आहे हें म्हणत असतांना, तळी विहरीवर पाणी भरण्याकरितां आलेल्या तळ्यावर डोकीं फुटतात हा कुठला न्याय?

अस्पृश्यतेचा डाग काढून टाकावा म्हणून हिंदुस्थानांत शेंकडों वर्षांपासून प्रयत्न चालला आहे. संत महात्म्यांनीं समतेची शिकवण कांहीं नव्यानेंच दिली नाहीं. महात्मा फुल्यांपासून ते आजतागायत महात्मा गांधीजींपर्यंत सारखे प्रयत्न होत आहेत. पण अद्याप कांहीं बूड हालत नाहीं. कॉंग्रेसचा ठराव होतो, पण त्याचा परिणाम कृतींत उतरत नाहीं. मोठमोठीं व्याख्यानें होतात, पण कृतींच्या वेळीं ती कळकळ दिसून येत नाहीं. अस्पृश्यता जावी याबद्दल मतजागृति भरपूर झाली आहे. पण मतांत व कृतींत माल नेहमीं विसंगतपणा दिसून येतो. तोही इतर जनांत नव्हे, तर प्रचारकांत दिसून येतो हें आश्चर्य आहे. कांहीं लोकशिक्षणानें सर्व गोष्टी होणारच आहेत. घाईनें कांहीं होणार नाहीं, हें पालुपद गातात! पण हीच सबब करून स्वराज्य पुढें ढकलणाऱ्या इंग्रजांचा निषेध करतात. पुढाऱ्यांची सुद्धां दोन्हीकडे सारखी वागणूक नसते. सहभोजन ही एकदम उडी वाटते. स्वातंत्र्य मात्र एकदम उडी वाटत नाहीं.

आपल्याच बांधवांबरोबर अशी फसवणूक करून आपणांस चालेल काय?

महात्मा फुले, राजर्षि शाहू महाराज, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे व महात्मा गांधी यांची अस्पृश्यनिवारणा निवळ तोंडची

नव्हती. स्वतः महारवाड्यांत जाऊन त्यांच्याशीं मिळूनमिसळून त्यांच्यावरोबर जेवून, ते आपल्या बरोबरचे आहेत, हें त्यांनीं कृतीनें दाखविलें. अस्पृश्य आहांत ही जाणीव न देतांच, त्यांचा उद्धार करण्याचा प्रयत्न वरील महात्म्यांनीं केला आहे. शाहूमहाराजांनीं मानाच्या अंबारीवर महाराची नेमणूक केली. दौऱ्यावर अस्पृश्यांना घेऊन हिंडूं लागले. त्यांच्याशीं सहपान सहभोजन उघडपणें करण्यास सुरवात केली. ही कृतीच हजारों व्याख्यानापेक्षां अधिक आहे.

## शुद्धि.

खरें अस्पृश्यतानिवारण ते अस्पृश्य आहेत, हें विसरून इतर वर्गांप्रमाणें त्यांच्यांत मिसळण्यानें होणार आहे. खरा उपाय सहभोजन आहे. शुद्धीचा उपाय लेखकाला प्रामाणिकपणें मान्य नाहीं. शुद्धि करून घेण्यांत अस्पृश्य हीन आहेत, ही भावना आहे. तसेंच एका मनुष्यानें दुसऱ्या मनुष्यास पावन करून घेणें, यांतही आपण माणुसकीचा अपमान केल्यासारखें होणार नाहीं काय? माणसास पावन करून घेणें, याचा अर्थ काय? हा श्रेष्ठपणा एखाद्या समाजाच्या किंवा एका विशिष्ट व्यक्तीचे अंगीं कसा येतो? अस्पृश्य हे अस्पृश्य नाहींत व असें समजून त्यांच्यावरोबर वागण्यास सुरवात करण्यानेंच अस्पृश्यता लवकर नष्ट होणार आहे. जे गुन्हेगार आहेत, जे पापी आहेत, जे पतित आहेत त्यांचें परावर्तन व्हावयाचें असतें. हजारों वर्षें आपल्या बांधवांना पायाखालीं चिरडून त्यांची सर्वस्वी अवनति करून त्यांच्यावरोबर पशुतुल्य वागणूक करून, पुनः उलट त्यांचीच शुद्धि करणें याचा अर्थ काय? पतित कोण? गुन्हेगारानेंच न्यायाधीश होऊन फिर्यादीला मोकळें सोडण्याचा उदारपणा दाखवणें हा चोमडेपणा नव्हे काय? खरो-

स्वर स्पृश्य हाच पतित पापी वर्ग आहे. त्याचीच शुद्धि व्हायला पाहिजे आणि ती अस्पृश्याकरवींच व्हायला पाहिजे. तथापि हा न्याय्य मार्ग टाकून रंगाढंगानें अस्पृश्यता निवारणेचा फार्स यशस्वी होत असेल तर तोही वाटल्यास करा!

दोऱ्याचें भेंडोळें गळ्यांत अडकवून, किंवा गोमूत्र शिंपडून अस्पृश्यता जात असेल, इतर वर्ग त्यांना स्पृश्यांप्रमाणें, अशा "छाछू" मंत्रानें, वागवतो, असें होत असेल तर तोही उपाय करण्यास हरकत नाहीं; पण यानंतर तरी सहभोजन घडवून आणावें; सहभोजन सहभोजन यांत काय आहे, असें म्हणणाऱ्या वावदुकांना लेखक ठासून सांगूं शकतों कीं, यांतच सर्व आहे. खरी परीक्षा यांतच आहे. वरपांगीं अस्पृश्यता काढून टाकणाऱ्या, सभेंत प्रसंगाला हात वरती करणाऱ्यांची कसोटी येथेंच आहे.

अस्पृश्यता एकदम चुटकीसरशीं जाणार नाहीं. हें तर खरेंच आहे. पण सुशिक्षितांनीं व सरकारनें मनापासून ही गोष्ट हातीं घेतली तर फारच लवकरच ती जाऊं शकेल. ज्या ज्या लोकांना अस्पृश्यता जायला पाहिजे असें वाटतें त्यांनीं आपल्यापुरती तरी कृति करण्यास पुढें झालें पाहिजे.

सर्व समाज एकदम जागा होईपर्यंत वाट पाहूं लागल्यास, अस्पृश्यता जाणें अशक्य कोटींतील गोष्ट होईल. कारण अस्पृश्य जसे रूढीचे गुलाम आहेत, तसे इतर जातींतील लोकही रुढीचे गुलाम आहेत. पिढीजात पुजाऱ्यांनीं सोंवळ्याचा हट्ट ठेवला, तर त्याला दोष देण्याचें कारण नाहीं. पण विश्वविद्यालयांचे पदवीधर होऊनही जर पुनः रूढीलाच चिकटून राहिला तर मात्र जगाचें पाऊल केव्हांही पुढें जाणार नाहीं. क्रांतिकारक हे प्रथम थोडेच

असतात, पण पुढें त्यांचाच समाज बनतो; कारितां सुशिक्षितांनी तरी पुढें होऊन, या कामीं मनापासून पडावें व घरच्या 'काकी मामीची' सबब पुढें करून पळवाट काढूं नये. एक बायको जिवंत असतांही तिच्या मनाविरुद्ध आणखी चार बायकांबरोबर लग्नें लावतांना स्त्रीच्या मनाची कुणी पर्वा केली नाहीं. मग याचवेळीं एवढा पत्नीभक्तीचा उमाळा कां ?

महात्माजींना ५।५० सच्चे सत्याग्रही पुरे झाले. त्यांनीं अखिल भारत हलवून टाकलें. सामाजिक क्रांतिकारक पुढारी सुद्धां थोडेच पुरे आहेत. त्यांचाच पुढें समाज बनणार आहे.

सरकारनेंही लोककल्याणाचें ध्येय समोर ठेवून, लोकविरोधाला न जुमानतां चांगल्या गोष्टी धडाडीनें केल्या पाहिजेत. जनतेच्या एकमताची वाट पाहूं लागल्यास कल्पांतापर्यंत एकही सुधारणा पदरांत पडणार नाहीं. सतीची चाल सरकारनें फटकाऱ्यासरशीं काढली नसती, तर अद्यापही ती गेली नसती. शाहूमहाराजांनीं सार्वजनिक जागेवरची अस्पृश्यता हुकमानें काढली नसती तर जनतेनें ही गोष्ट कांहीं आपणहून लवकर केली नसती.

केमालपाशानें ज्या गोष्टी एका झटक्यासरशीं केल्या त्या जनतेवर विसंबून ठेवल्या असत्या तर तुर्कस्थान १०० वर्षें मागेंच रेंगाळला असता. तेव्हां हिंदी सरकारनें व सर्व संस्थानिकांनीं एकजुटीनें पुढें होऊन, हा जड धोंडा फेंकून दिला पाहिजे व पुढाऱ्यांनीं आपआपल्यापरी त्यांतून मोकळें व्हावयाला पाहिजे.

कांहीं लोक, अस्पृश्यांना उच्चवर्णीयांच्या देवालयांत बंदी आहे म्हणून नवीं देवालयें बांधावींत म्हणतात. हिंदुसमाजाचें, आहेत या देवालयांनीं काय कमी वाटोळें केलें आहे म्हणून त्यांच्या डोक्यावर

नव्या देवालयांचे दगड रचायचे! दुष्काळग्रस्त हिंदुस्थानावर हा आणखी बोजा घालून त्याची कंबर कां मोडायची? सरकारी फाळ्यानें व सावकाराच्या ओझ्यानें गरीब जनता गळ्यापर्यंत अगोदरच बुडलेली आहे. देवळाच्या पैशानें त्याचा आतां तरी अंत्य संस्कारच करावा लागेल! नव्या देवळानें अस्पृश्यता जाणार तर नाहींच पण देवांपैकीं मात्र एक नवा महारदेव आपण उत्पन्न करणार आहोंत! मंदिरेंच मुळीं नको आहेत. कारण आज त्याच आश्रयावर हजारों पुंड पोसले जात आहेत. तथापि तीं नामशेष करण्यापूर्वीं त्यांच्या-करवीं होत असलेला अपमान नाहींसा करायचा म्हणजे मंदिर सत्याग्रह हाच त्याला परिणामकारय उपाय आहे. मंदिराची शुद्धि व्हायची ती अस्पृश्यांच्याच हातून होणार आहे.

हिंदुसमाजांत ऐक्य उत्पन्न व्हावें अशी सरकारची मनापासून इच्छा असती तर वाईट रूढी मोडण्यासाठीं, लोकरोष पतकरूनही त्यांना पुष्कळ गोष्टी करतां आल्या असत्या. अस्पृश्यांना देवालय-प्रवेशाला वरच्या वर्गांकडून मनाई होते. ती मनाई सरकारला दूर करतां आली असती. अस्पृश्याच्या हक्काआड स्पृश्याप्रमाणें सरकारही उभें रहातें. देव भ्रष्ट होतो ही कल्पना मान्य करून त्यांनीं त्या कृत्याला गुन्हा ठरवला आहे. इंडियन पिनल कोड कलम २९५ हें अस्पृश्यांच्या हक्काविरुद्ध आहे. मूर्ति (destroy, damage or defile) जो कोणी फोडील, इजा करील, किंवा (defile) अपवित्र करील त्यास २ वर्षांची शिक्षा किंवा दंड कायद्यानें ठरवला आहे. defile 'अपवित्र' या शब्दाचा अर्थ 'राजद्रोह' या शब्दाइतकाच व्यापक असल्यामुळें या शब्दाची वाटेल तशी ओढाताण करतां येते. जज्जाचा कल जिकडे असेल तिकडे तो अर्थ फिरवील. अखे-रचा शब्द काढून तरी टाकला पाहिजे किंवा त्याचा अर्थ तरी

कायम केला पाहिजे. समाजसुधारणावादी सरकार असें अस्त्र स्पृश्य वर्गाचे हातीं केव्हांच देणार नाहीं.

" अस्पृश्यता हा हिंदुधर्मावरील एक कलंक आहे म्हणून सध्याच्या बहिष्कृत मानल्या गेलेल्या वर्गाला हिंदुसमाजांत मानाचा व समतेचा दर्जा प्राप्त करून देण्यास हिंदुसभा सत्याग्रहासही संमति देईल." असा हिंदुसभेचा ठराव झाला असला, तरी सत्याग्रहाची सर्व जबाबदारी सर्वस्वी अस्पृश्यांवरच पडणार आहे. ज्याचा अपमान होतो त्यालाच ती निकड लागणार आहे. अस्पृश्यतेचा डाग काढून टाकण्याची जबाबदारी जरी वरच्या वर्गावर असली तरी ही गोष्ट ते आपखुषीनें करतील असें वाटत नाहीं. या बाबतींत अस्पृश्यांना ब्राह्मण व ब्राह्मणेतर बहुधा एकाच मापानें मोजावे लागतील. या बाबतींत लेखकाला असा बरेच वेळ अनुभव आला आहे. नात्यागोत्याच्या मंडळींनीं त्यालाही भीति दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि जाणत्या ब्राह्मणांचा विरोध येतो, त्यावेळीं मात्र फार वाईट वाटतें. ' कोल्हापूर , येथील जगदंबेच्या देवालयांत जाण्यास अस्पृश्यास असलेली कायद्याची आडकाठी काढून टाकल्यास आमची हरकत नाहीं. ' अशा अर्थाच्या अर्जास सुशिक्षित ब्राह्मणांचीही सहानुभूति मिळाली नाहीं, अपेक्षा केलेले ब्राह्मणेतरही माघार घेऊं लागले! ब्राह्मण हा सर्वांत सुशिक्षितवर्ग आहे. जातिभेदाला इतर वर्णांपेक्षां त्यालाच जास्त जबाबदार धरावें लागेल. अस्पृश्यांच्यांत पोटजाती आहेत, त्या त्यांनीं अगोदर मोडाव्यात मग आमच्याकडे यावें, ही सबब ब्राह्मणवर्गाला पुढें करतां येणार नाहीं. उतरंडीवरच्या भांड्यांतील घाण खालीं वहात आली आहे. त्याला कारण वरचें भांडें आहे. तेंच शुद्ध झालें पाहिजे. अस्पृश्योद्धाराच्या बाबतींत अत्मशुद्धिसाठीं तरी ब्राह्मणांनींच पुढाकार घेतला पाहिजे,

म्हणजे, त्यांच्याबद्दल ब्राह्मणेतरांत असलेला अनादर लगेच नाहींसा होईल. "ब्राह्मणांना माझी विनंति आहे कीं, या महारमांगांत जाऊन काम करतांना आम्ही त्यांचे कल्याणकर्ते म्हणून न मिरवितां, त्यांचे खरे स्नेही म्हणून काम करा" ( महात्मा गांधी ).

"खालच्या जातीनें कितीही प्रयत्न केला तरी हें काम त्यांच्या हातून व्हावयाचें नाहीं. प्राचीन काळापासून वंशपरंपरेनें उपभोगित असलेले हक्क वरिष्ठ जातींनींच सोडले पाहिजेत. असल्या पवित्र आत्मयज्ञानेंच त्यांचें उदाहरण उपयोगी होईल"–( शाहू महाराज ).

नेहमीं अस्पृश्यांवर ते स्वराज्यद्रोही आहेत राष्ट्रीय स्वातंत्र्याला खीळ घालणारे आहेत असा आरोप वरचा वर्ग बहुधा त्यांच्यावर करीत असतो. पण त्यांच्यामध्यें विश्वास उत्पन्न होईल त्यांना देशधर्माबद्दल अभिमान वाटेल, अशी वागणूक मात्र आपण करत नसतो. परधर्मांत गेल्याबद्दल धर्मद्रोहाचा आरोप करतों पण त्यांना हिंदुधर्माबद्दल अभिमान उत्पन्न होईल अशी परिस्थिति मात्र निर्माण करीत नाहीं. त्यांना मदतीचा हात पुढें करीत नाहीं.

देशासाठीं झटणारे राष्ट्रीय पुढारी महारवाड्यांत जाऊन त्यांना उपदेश करणारे, व्याख्यान देणारे व तेथें राहून त्यांची सुधारणा करणारे किती आहेत? ख्रिश्चन लोक कोणत्याहि कां हेतूनें असेना, पण तेथें जातात, त्यांच्या शिक्षणाची सोय करतात. पाण्याची सोय करतात. पाण्याची सोय नसल्यास विहिरी बांधून देतात. नोकरीसाठीं खटपट करतात. आपण शुद्धीचें सोंग करून पुन: त्यांचेकडे फिरकत नाहीं. इंग्रज सरकारच्या वचनावर जसा आमचा विश्वास बसत नाहीं, तसाच अस्पृश्यांचा आमचे आश्वासनावर विश्वास बसत नाहीं. याबद्दल त्यांच्यावर रागावून काय

उपयोग? ज्या ज्या खेड्यावर व्याख्यानाला जावें त्या त्या खेड्यावर अस्पृश्यांचा प्रश्न फारसा घेऊं नका असा लेखकाला आग्रह झाला आहे. यावरून, आमची मनाची पालट स्वराज्यांत होईल असें अस्पृश्यांनीं कसें मानावें?

## तरुणांनो, पुढें व्हा.

अस्पृश्यता व जातिभेद मोडून टाकण्याला नव्या दमाच्या तरुणांनींच पुढें यायला पाहिजे. आणि ते या गोष्टी करूं शकतील. कालावर या गोष्टी टाकून तरुणाला स्वस्थ बसतां येणार नाहीं. इतिहास बनवणारे तुम्ही आहांत. गेल्या पिढीच्या पापांत पुनः पाऊल न टाकतां, दुसऱ्या कोणाची वाट न पाहतां, समाज काय म्हणेल याची पर्वा न करतां निर्भयतेनें सत्याची कास धरणारा हा नव्या पिढीचा तरुणच होणार आहे.

मीच एकट्यानें करून काय होणार आहे, ही नामर्दाची भाषा, टाकून, मीच जगाला हलवणार आहे अशा बेदरकारवृत्तीनें सत्यासाठीं पुढें या. कोणी निंदतील, कोणी स्तुति करतील, दोघांनाहि खाकेंत मारून पुढें चला. सत्य हें ध्येय ठरल्यानंतर राजकारणांत एक वृत्ति, धर्मकारणांत एक वृत्ति, अर्थकारणांत एक वृत्ति असे डावपंच खेळावेसें तुम्हाला वाटणार नाहीं. सत्य हाच खरा मुत्सद्दीपणा वाटेल. सत्यापुढें चाणक्यनीति सहज लटपटूं लागेल.

बा तरुणा, तूं कोणच्याहि नांवाचा ऐस, ब्राह्मण ऐस, क्षत्रिय ऐस, वैश्य, शूद्र किंवा कोणीहि ऐस, या जातिभेदाला, या विषमतेला, ठार मारून टाक. विश्वाच्या प्रेमगंगेंत गरळ ओकणाऱ्या या कालिया सर्पाला पाताळांत गाडून टाक! आणि समतेच्या व मानवतेच्या भावनेनें विश्वाशीं हस्तांदोलन कर! आणि या पवित्र उन्मा-

दानें बेहोष होऊन जगभर प्रेमाचा, सत्याचा, समतेचा हुतूतू घाल! जग प्रेममय कर!



कर्मवीर शिंदे.

अस्पृश्यता निवारणेबद्दल ज्या कर्मवीरांनीं आपलें आयुष्य खर्चलें त्यांचा स्फूर्तिदायी संदेश मनन करण्याजोगा आहे. कर्मवीर शिंदे म्हणतात "जो मनुष्य काळाची पर्वा न करतां सुधारणा करूं इच्छितो त्यानें कोणाची वाट न पहातां आपल्याच बळावर सुधारणा केली पाहिजे. म्हणजे त्याला काळ म्हणजे कःपदार्थ आहे असें कळून येईल. या कामीं मदत करण्यास तरी कोणी नसतातच, पण उलट त्याच्या मार्गामध्यें विघ्नें उत्पन्न करणारे बरेच असतात. काळावर नजर देऊन स्वस्थ न बसतां काळ म्हणजे कःपदार्थ आहे हें श्रीकृष्णांनीं कालियाचें म्हणजे काळाचें मर्दन करून स्पष्टपणें लोकांचे निदर्शनास आणून दिलें आहे." तेव्हां भारताच्या पवित्र प्रेमगंगेंत गरल ओकणाऱ्या जातिविषमतेच्या कालियासर्पाला पायांखालीं चिरडण्याकरतां हजारों श्रीकृष्ण निर्माण झाले पाहिजेत. आणि ते नव्या पिढींतूनच आतां निर्माण होणार आहेत.

अखेर हेंच सांगावेसें वाटतें कीं, मराठा वर्गाला, ब्राह्मण वर्णाला कितीही आपल्या कर्तव्याची जाणीव करून दिली तरी लेखकाचें, आलेल्या अनुभवानें ठाम मत झालें आहे कीं, हिंदुधर्माचा उद्धार जर कोणच्या वर्गाच्या हातून होणार असेल, तर तो अस्पृश्यांचेच

हातून होणार आहे. अत्यंत पीडितवर्गाचे हातूनच क्रांति होत असते. ज्यांना आंच लागली आहे तोच त्या आगींतून बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत असतो. अस्पृश्यता निवारण करतांना वरचा ब्राह्मण तसा मराठा वर्गही उपकारबुद्धीनें व अस्पृश्यावर मेहेरबानी समजूनच हें कार्य करीत असतो. अस्पृश्यता-निवारणेचें सोंग करणारा ढोंगी सुधारक "आधीं भेटी-व्यवहार होऊं द्या मग पुढें पाऊल टाकतां येईल" असें मोठ्या व्यवहारी आढ्यतेनें म्हणत असतो. अशा भुलथापीनें अस्पृश्यता जात नसते. नुसत्या भेटीसाठीं अस्पृश्य हापापले नाहींत. रोटी-बंदी बेटीबंदी मोडण्यानेंच खरी अस्पृश्यता नष्ट होऊन जातिभेदाची घाणही नाहींशी होणार आहे. "भेट" हे ध्येय नाहीं व माग-णीही असूं शकणार नाहीं. परधर्मात गेल्याबरोबर सहज भेटी-बंदी जाते. त्या उपकाराचें आमिष अस्पृश्यांपुढें ठेवणें फसवेगिरीचें आहे. रोटीबंदी मोडणें हाच आज पहिला खरा उपाय आहे.

रशियाचा शेतकरी झारशाहीनें बुडवला म्हणून शेतकरी गुलाम-गिरींतून मुक्त झाला, फ्रान्सच्या लुईनें प्रजा म्हणजे आपल्या सुखासाठीं निर्माण झाली आहे असें समजून त्यांचेबरोबर वागण्यास सुरवात केली म्हणून "स्वातंत्र्य, समता व विश्वबंधुता" या पवित्र तत्वांनीं डोकें वर काढलें. अमृतसरला हिंदी हृदय चिरडलें गेलें म्हणून हिंदी अभिमान जागा झाला.

हिंदुधर्मात अस्पृश्यांचा भयंकर अपमान होत आहे. राजसत्ता, धर्मसत्ता व लोकसत्ता या त्रयींनीं अस्पृश्य गांजून गेला आहे; म्हणून या तीन्ही कारणांची शुद्धता अस्पृश्यांकरवींच होणार आहे, असा लेखकाचा विश्वास आहे. म्हणून या भावी मनोमय जयाद्दल लेखक आजच अस्पृश्यबंधूंचा जयजयकार करीत आहे.

# प्रकरण ४ थें.

## देवालयें.



स्त्रियांच्या गुलामगिरींत अर्थिक प्रश्न कसा आहे, व त्याची वाढ होत होत कुठल्या थराला गेली आहे, हें प्रथम दाखवलें आहे. नंतर आर्थिक हेतूंतूनच जातिभेदाची कल्पना कशी प्रसवली तें दाखवलें. • जातिभेदांतून अस्पृश्यता जन्माला आली, स्त्रियाच्या गुलामगिरींत व जातिभेदांत मूळ आर्थिक हेतू आहे, तोच देवालयांतही आहे. भक्तीपेक्षां स्वार्थाचाच संबंध जास्त आहे.

संशोधकाच्या दृष्टीनें देवालयाचे उगमाकडे या वेळीं पाहण्याचें फारसें कारण नाहीं. आज आहे त्या गोष्टी पाहिल्या तरी पुरे आहे. दगडाचे देव हे भक्तीपेक्षां भीतीमुळेंच निर्माण झाले. कष्ट करूनही शेतकऱ्याला निसर्गावरच अवलंबून रहावें लागत असल्यामुळें, संकटनिवारणाकरितां देवाचा धांवा करण्याची मनोवृत्ति उत्पन्न झाली. त्या सहजासहजीं आकलन न करतां येण्याजोग्या शक्तीला हातीं आणण्याचा प्रयत्न म्हणूनही दगडांचे देव केले असावेत. असा सोईस्कर देव केल्यामुळें त्याला कौल लावणें, नवस करणें, प्रसन्न करणें या कल्पनांचा प्रादुर्भाव साहजिक झाला या कल्पनांचा

फायदा बुद्धिमान् वर्गानें स्वतःच्या स्वार्थाकडे करून घेऊन, त्याचा उपयोग स्वतःचा चारितार्थ चालविण्याकडे करून घेतला. या धंद्याला कायम स्वरूप यावें, स्वतःची, आपल्या पोराबाळांची व आपल्या वर्गाची सोय व्हावी म्हणून पुराणें रचलीं. अनुकूल धर्मग्रंथ लिहिले गेले. निरनिराळें विधि घालून देऊन, निरनिराळ्या प्रसंगीं पैसे मिळावेत अशी व्यवस्था करून ठेवली. व मोठमोठीं खंबीर देवालयें बांधून या विचारांचीं कायमची स्थायिक संस्था स्थापन केली.

## मूर्तिपूजा.

"जेव्हां आकारपूजेचें अधःपतन केवळ मूर्तिपूजेंत होऊन ती ज्यावेळीं असत्य मतांनीं व अंधश्रद्धेनीं पछाडली जाईल त्यावेळीं एक सामाजिक आपत्ति समजूनच तिला विरोध केला पाहिजे." (महात्मा गांधी.)

मूर्तिपूजा असावी कीं नसावी? मूर्तिपूजा मनुष्याच्या उन्नतीस कारण होईल कीं अवनतीस कारण होईल? या प्रश्नाचा निकाल, बहुसंख्यजनतेचें कल्याण, मूर्तिपूजेनें होईल काय, याचा विचार करूनच दिला पाहिजे. अपवादादाखल असलेल्या उदाहरणावरून, ठोकळ अनुमान काढणें बरें होणार नाहीं. अज्ञजनतेवर त्याचा काय परिणाम होत आहे व झाला आहे, हें पाहूनच या विषयाकडे पाहिलें पाहिजे. संतमहात्मे बहुतेक सर्व, प्रथम मूर्तिपूजक होते. पण ज्यावेळीं त्यांची मूर्तिपूजा व्यापक स्वरूपाची झाली, त्याच-वेळीं ते संतकोटींत जाऊन बसले. जेव्हां त्यांचा विठ्ठल सर्वव्यापी झाला, त्याच वेळीं ते लोकादरास प्राप्त झाले.

आकार तितका नसे । निराकार विठ्ठल दिसे ।<br>
ऐसे गुण ठायींचे ठायीं । चोखा म्हणे लागा पायीं ॥

अशा विश्वरूपी झालेल्या विठ्ठलाची पूजा कुणाची अधोगती करील? अशी सर्वांभूती देव पाहण्याची वृत्ति, त्या मूर्तिपूजेंतून निर्माण झालीं तर मूर्तिपूजा ही जरूर रहावी. पण पाषाणाचा देव केला । एके दिवशी भंगोन गेला । तेणें भक्त दुखावला । रडे पडे आक्रंदें । देव हारपला घरीं । एक देव नेला चोरीं । [रामदास]. अशी ही आमच्या देवांची आजची स्थिति झाली आहे.

"आकाराची निराकार कल्पना प्रथम असल्याशिवाय आकार दृश्यतेला येत नाही" –[ विवेकानंद. ] आकार पूजेनें म्हणजे निव्वळ दगड–पूजेनें कुणाचा उद्धार झालेला नाहीं व केव्हांहि होणार नाहीं. "दगडाची नांव आधींच तें जड, ते काय दगड तारूं जाणे ॥" (तुकाराम.)

बहुसंख्य जनता अशिक्षित आहे. ती रूढीची गुलाम आहे. ही अंधजनता निव्वळ दगडाचीच पूजा करीत असते. त्यांतील खरा हेतू त्यांचे ध्यानीं मनीं नसतो. वस्तुपाठाचा धडा या दृष्टीनें मूर्तिपूजा उपयोगी होईल खरें, पण खालचा वर्ग 'श्रीगणेशा' पुढें जातच नाहीं. धुळाक्षराच्या मातींतच त्याला धूळ खात बसावी लागते. पुढचें शिक्षण त्याला मिळत नाहीं. मूर्तिपूजेचा खरा हेतू त्याला कोणी समजावून देत नाहीं. यामुळें दगडाची पूजाअर्चा, नैवेद्य यांतच त्याला देवपूजा दिसते. श्रीमंताच्या घरीं देवपूजेचें कंत्राट ब्राह्मणाकडेच सोंपवून पदरीं पुण्याई पाडून घेणारे श्रीमंत, लेखकानें अनेक पाहिले आहेत. ही काय मूर्तिपूजा? घरच्या फर्निचरमध्येंच जर देव व देव्हारे मोडूं लागले तर असल्या देव-देव्हाऱ्याचें उच्चाटनच होणें योग्य नाहीं काय? धातु पाषाण मृत्तिका । चित्रलेप काष्ठ देखा । तेथ देव कैचा मूर्खा । भ्रांति पडली ॥ ( रामदास. )

स्त्री प्रेमांतून जगामधील अणुरेणूंना गोवणारा प्रेमधागा सांपडला नाहीं, तर तें विषयी प्रेम मनुष्याच्या प्रगतीस आड येतें.

'परमेश्वर म्हणजे सारे आकार ओतण्याचा साचा' ही गोष्ट कळली नाहीं. मूर्तिपूजेनें चराचर वस्तूंत व जनतेंत जर देवाचें स्वरूप दिसलें नाहीं, तर ती दगडाचीच पूजा झाली. अशा पूजेनें, मनुष्यहि पण बेअकली बथ्थड डोक्याचा दगडच बनतो. मूर्तिपूजा हा निव्वळ भावनेचा खेळ आहे दगडाला देव हा आम्हीच बनवत असतों. मानला तर देव, नाहीं तर तो दगडच. साकार मूर्तींतून निराकाराचें आकलन होऊं शकतें पण तें थोड्यांचेंच.

साकार पूजिता निराकार झाले ।
शून्यीं बुडाले बाई येवो ॥ चांगदेव.

अशा जाणत्या भावानें मूर्तिपूजा करणाऱ्याची अधोगति होणार नाहीं. लेखकाचे वडील हे अशाच प्रकारचे कट्टे मूर्तिपूजक होते. पण बहुसंख्य जनता अशी जाणती नाहीं. अज्ञ जनता दिवसेंदिवस मूर्तिपूजेंतील खऱ्या तत्वाला सुटून आकाराचेच सोहाळे माजवूं लागली आहे. त्या दगडाच्या देवावर मनुष्यस्वभावांतील सर्व गुणदोषांचा आरोप करून त्या मूर्तिपूजेची विटंबना होत आहे. आपल्या सर्व उपाधी देवामागें लावून त्या देवाच्या मूर्तीची अधोगती आम्हीच केली आहे. कबीर म्हणतात—

जगभयें उफराटे । झुटेकू साहेब कैसा भेटे ।
फत्तर उपर शेंदूर डारे । मुरख कहे ये देव मोठे ।

आपल्या जातिभेदाच्या कल्पनाहि देवाला आम्हीच चिकटवल्या आहेत. सर्वांना पावन करणाऱ्या शक्तीमागें ही स्पृश्यास्पृश्यता चिकटवली आहे!

आपल्या खाण्याच्या आवडीनिवडीसुद्धां देवावर लादून एका देवाला शाकाहारी तर दुसऱ्याला मांसाहारी बनवलें आहे एकाला रेडा आवडतो, तर दुसऱ्याला बकरें लागतें, तिसऱ्याला कोंबडें पचतें, आजच्या ब्राह्मणमान्य देवांना शाकाहारी जिन्नसच लागतात. अगदीं 'लेटेस्ट' अवताराला म्हणजे सत्यनारायणाला शिरा आवडतो. असे हे देवांच्या जिभेचे चोचले वाढवून, त्यांच्या नांवावर आपल्याला पाहिजे असतील तीं पक्वान्नें झोडण्यास मात्र आम्हीं सुरवात केली आहे. दगडाच्या देवानें ताटें फस्त करायला सुरवात केली असती तर मग हीं नवसें व नैवेद्य बंद पडले असते. कबीरजींनीं हें ढोंग स्पष्ट भाषेंत बाहेर आणलें आहे. ते म्हणतात—

लडकाजी खातर नवस किये, देवकू नारळ फुटे ।
देवके आगे डारे कटोरे, आपण खायगे गोट ।
सजीव बकरा निर्जीव देवके आगे काटे ।
मिलगये आलम खागये बकरा देवके हातमे झाटे ॥

या मूर्तिपूजेची व या ढोंगीपणाची हजिरी आणखी किती स्पष्ट भाषेंत घ्यायची उरली आहे? प्रत्येक प्राणीच ईशरूप असतां त्याला मारून दगडाची शांति करावयाची याचा अर्थ काय? त्यानेंच उत्पन्न केलेल्या प्राण्यांची हिंसा त्याचेचसाठीं होत असलेली त्याला आवडेल काय? जीव उत्पन्न करणाऱ्यालाच जीव घेण्याचा अधिकार येऊं शकेल. मग ही भलती आपल्या अधिकाराबाहेरची गोष्ट आपण करीत नाहीं काय? आणि तीहि देवासाठीं हें आश्चर्य आहे!

विश्वाचा विश्वास विश्वरूपाधीश ।
सर्वत्र एकरूप महेश ॥ (निवृत्ति)

ही वृत्ती मूर्तिपूजेनें अज्ञ जनतेंत उत्पन्न होईल असें कांहीं वाटत नाहीं. तसें झालें असतें तर, जनता आपोआप या मूर्तिपूजेंतून बाहेर पडली असती. पण प्रकार उलटाच होत आहे. हा अनुभव आल्यानंतरच संतांनीं आकारपूजा टाकून दिली आहे. मुक्ताई म्हणते—सर्वरूपीं निर्गुण संचलें पै सर्वदा । आकार संपदा नाहीं तया ।। हा संतांचा अनुभव आहे.

अनुभवाचा फायदा घेऊनच शास्त्रज्ञ पुढें जात असतात, वाफेचा शोध लागून यांत्रिक सुधारणा इतकी पुढें गेल्यानंतर पुनः त्या 'किटली' च्या वाफेंतच कुणी गुरफटून बसला नाहीं. पाण्याच्या उकळत्या किटलीच्या पासून लागलेल्या शोधानें आज जग इतकें पुढें गेलें आहे. म्हणून त्या किटलीलाच धरून बसल्यास सुधारणेचें पाऊल पुढें पडणार नाहीं. संत प्रथम मूर्तिपूजक होते, म्हणून आपणहि मूर्तिपूजक राहिलें पाहिजे असें म्हणणें म्हणजे, त्यांचा अनुभव टाकून पुनः पाठीमागें जाण्यासारखें आहे.

## देवाचे मेहुणे.

या मूर्तिच्या आधारावर अनेक बांडगुळें उत्पन्न झाली आहेत. अनेक दलाल निर्माण होऊन यांनीं धर्माचें व देशाचें वाटोळें केलें आहे.

"बैरागडे, जोगडे, योगी, संन्याशी आणि कांहीं ब्राह्मण यांनीं आमच्या देशाची कशी दुर्दशा करून सोडली आहे? यांचें मन सदोदित चोरींत दंग. सदोदित दुष्ट विचारांनीं भरलेलें आणि हेच आमचे धर्मावतार!!" (विवेकानंद.)

या स्वार्थी लोकांनीं या मूर्तिपूजेचा फायदा पोटासाठीं करून घेऊन अज्ञ जनतेला अधिकच अंधःकारांत लोटलें आहे. देव हा मुक्तीचा मार्ग बनण्याऐवजीं पोटाचा धंदा बनला आहे. देवाचे

मालक म्हणजे हे भट, बडवे, पुजारी !! या देवांना बोटावर नाचवत असतात. देवाच्या मंदिरांत प्रवेशाचा पास देणें या दलालांच्या हातीं असतें व हे आपआपल्या देवांच्या जाहिराती पुराणांच्या भाकडकथांनीं अज्ञजनतेंत पसरवून आपलें गिऱ्हाईक वाढवत असतात. यासाठीं ते नाना तऱ्हा करतात.

## दव यांच्या अंगांत संचारतो.

तो नाचूं बागडूं लागतो, एक भुभुःकार करतो, तर दुसऱ्याला पिसें भरतें, तिसरा अंगाला आळे पिळे देत सुटतो. ज्यायोगें लोकांच्या मनांत भीति उत्पन्न होईल व पैसे उपटणें सोपें जाईल, असे सर्व उपाय, सर्व हावभाव हे भोंदू लोंक करीत असतात. बायका अगोदरच देवभोळ्या. त्या यांच्या जाळ्यांत सहज सांपडतात "या बैराग्यांच्या एक एक माळेगणिक लग्नाची किमानपक्षीं हजार हजार तरी माळ तुटत असेल ! स्वतःच्या अंगाला भस्म चोपडून दुसऱ्याच्या संसाराचें भस्म करण्याचा यांनीं चंग बांधलेला असतो" ( पुण्यप्रभाव ).

त्यांच्या तडाक्यांतून भोळे पुरुष निसटत नाहींत व नजरेंतून भोळ्या बायका सुटत नाहींत. देवाच्या नांवावर दरोडे घालणाऱ्या या चोर गोसाव्यांच्या मोहनीनें कित्येक सुखी कुटुंबें ओस पडलीं आहेत ! सुशिल पतिव्रता भ्रष्ट झाल्या आहेत ! कित्येक कुमारिकांचें जन्माचें वाटोळें झालें आहे व किती अल्लड पोरी बेपत्ता झाल्या आहेत !! कित्येक मूर्ख नवऱ्यांनीं स्वखुषीनें आपल्या स्त्रीच्या पातिव्रत्यभंगास प्रोत्साहन दिलें आहे. आपल्या घरीं तांटापाटावर नाचवून काया वाहाविली आहे. मूर्तिपूजेच्या अंधभावनेंमुळेंच अशा लोकांचें फावतें. बायका या जात्याच भाविक, त्या सहजीं बळी पडतात. नवरा

चांगला वागावा व आपल्याला मूल व्हावें म्हणून या गोसाव्यांची सेवा करतां करतां कायमचाच नवरा मुकण्याची व अब्रू जाण्याची पाळी, हे देवाचे लाडके लोक स्त्रियांवर आणीत असतात. मूर्तिपूजा हाच या लोकांचा आधार आहे. मंदिराची कोंदट हवा व अंधार यांच्या कृष्णकृत्याची राखण करतो. अविवाहित गोसाव्यांच्या बेवारसी मुलांनां येथें आसरा मिळतो. गांवांतील चुकली प्रणयी जोडपी येथें सांपडतात. 'देवालयाच्या पटांगणांत बायका देवाभोंवतीं आणि हे पाजी लोक बायकाभोंवतीं घिरट्या घालीत असतात.' ( पुण्यप्रभाव. )

## विषमतेचीं गटारें देवालयांत

जगांतील नदी, नाले, ओढे अखेर ज्याप्रमाणें समुद्राला मिळतात त्याचप्रमाणें, हिंदु धर्मांतील उच्चनीचपणाच्या कल्पनेचीं, विषमतेचीं, स्पृश्य-अस्पृश्य भावनेचीं सर्व गटारें देवालयांत येऊन मिळतात. हिंदुधर्म म्हणजे स्पृश्यास्पृश्य विचार आणि देवाचें देऊळ म्हणजे या विचारांचें व प्रत्यक्ष भेदाभेदांचें कोठार आज तरी झालें आहे. सर्वांना पावन करणारा देव अस्पृश्याच्या स्पर्शानें भ्रष्ट होतो. देवांना भ्रष्ट करण्याची ज्याचे अंगीं ताकत आहे तेच मग श्रेष्ठ ठरतात. अशा भ्रष्ट झालेल्या देवाचें शुद्धिकरण माणसाकरवीं करून पुनः त्याला देवपणा देण्यांत येतो. देवाचे सेवक जे पुजारी, त्यांचे हातून ही शुद्धि होते, हेंही एक आश्चर्यच आहे.

निसर्गाच्या खुल्या मंडपांत बरोबरच्या नात्यानें वागणाऱ्या भावंडांना ही, दगडी देवाची दगडी देवालयें समान हक्काचीं नाहींत. येथे समान दर्जा नाहीं. हा ब्राह्मण, हा मराठा, हा अस्पृश्य हेच भेद येथें दाखविले जातात. सर्वांचें पालनपोषण करणारी, सर्वांना

एकत्र गोवणारी ही एकच शक्ति आहे आणि त्या देवीची आपण सर्व भावंडें आहोंत ही कल्पना दृढतर होऊन आम्हांमध्यें ऐक्यभाव उत्पन्न होण्याऐवजीं हीं देवालयें व हे देव आम्हांमध्यें फाटाफूट करतात. या देवालयांत ब्राह्मणांकरवीं ब्राह्मणेतरांचा अपमान होतो. ब्राह्मणेतरांकडून अस्पृश्यांचा अपमान होतो व परधर्मीय आपल्यापासून दुरावतात. ही संघटना कीं विघटना?

देवांची देवालयें हीं जातिभेद रक्षण करणारे आज अभेद्य किल्ले होऊन बसले आहेत. उच्चनीच कल्पनानीं या चिरेबंदी तटांची सांध जोडली आहे. 'शिवाल, शिवाल' या शब्दाचा घंटारव सारखा कानीं आळदत असल्यामुळें विषमतेचें वातावरण येथें तयार होत आहे. अस्पृश्यतेचा काळसर्प याच देवालयाच्या भोंगिऱ्याखालीं पुष्ट होऊन फूत्कार टाकीत आहे.

## पूजाऱ्याचें पैशाचें पेव.

भट पुजाऱ्यांची फलटण पोटापायींच या किल्ल्याची तटबंदी मजबूत राखीत असते. देवाचा भाव नव्हे, तर पोटाची हाव म्हणून देवाला रात्रंदिवस आळवणें चाललें असतें. पैशाचा प्रवाह सारखा सुरू रहावा म्हणून, सकाळच्या काकड आरतीपासून ते रात्रींच्या शेजारतीपर्यंत, दक्षिणेपायीं घंटेची गोंव चाललेली असते. हा घंटानाद म्हणजे भिक्षुकांच्या पोटाची हांक आहे. स्वतः च्या गरजा असतील नसतील त्या देवावर लादून अन्नवस्त्रापासून ते अंगवस्त्रापर्यंतची सोय या देवाच्या वारसदारांनीं करून घेतली आहे. पोटाची भरगच्च सोय करून घेण्याकरितां देवाच्या नावावर स्वतः च्या बायकांना व रखेल्यांना सजविण्याकरितां देवाचे अलंकार, देवीचा चंद्रहार, त्यांचे ऊंची ऊंची कपडे मच्छरदाण्या व छप्परपलंग

देवाच्या पुजाऱ्यांनीं करून घेतले आहेत. त्या लेखकानें स्वतः डोळ्यांनीं पाहिल्या आहेत. या अनेक पुजाऱ्यांचीं कृष्णकृत्येंही सूर्यप्रकाशांत आलीं आहेत. हे देवाचे पुजारी पुष्कळ वेळा पगारी लोक ठेवून अमावास्या पौर्णिमेला त्यांचे अंगात देवाचें सोंग आणवून त्या त्या देवाचें महत्व वाढवतात. असा प्रकार एका क्षेत्रावर उघडकीस आलेला लेखकानें पाहिला आहे. अज्ञजनतेला फसवण्याच्या मार्गांपैकीं हा एक खात्रीचा मार्ग आहे.

चांगले शहाणेसुरते लोकसुद्धां यांच्या मंतरतंतराला जर फसतात व यांच्या नादीं लागतात तर बहुसंख्य अज्ञजनतेचा हे किती फायदा घेत असतील? लेखकहि एकदां या अंगांत येणाऱ्या देवाच्या हावभावामुळें संशयाच्या बुचकळ्यांत पडला होता.

व्याख्यानाच्या दौऱ्यावर लेखक गेला होता. बरोबर ९–१० मंडळी होती. चांदण्या रात्रीं नदीचे घाटावर जेवण करून परत निघालों. वाटेंत काळभैरवाचें देऊळ लागलें. आंत जाऊं लागलों. तोंच आमच्याच स्नेही मंडळींतील एकाला घंटानादाबरोबर धुंदी चढली. चेहरा अगदीं ( Mysterious ) विचित्र झाला. स्नेही नेहमींच्या घसटींतला; अगदीं मूर्तिपूजेउलट. आम्ही सर्व थक्क होऊन पहात बसलों. इतक्यांत मोठमोठ्या उड्या घेत, बेफाम होऊन तो देवालयाच्या गाभाऱ्यांत फरशीवर भयंकर जोरानें आपटला! आम्ही तर हादरून गेलों. थोडें चुकतें तर तेथेंच कपाळमोक्ष व्हायचा! गुरव धांवून आला. देव बोलूं लागला. कांहीं वेळानें धुंदी उतरली. गाभाऱ्यांतून तो बाहेर आला. ढोपर फुटलें आहे, रक्त वहात आहे, अंगाचीं जेथें तेथें सालपटें निघालीं आहेत, झोंपेंतून उठल्यासारखा चेहरा झाला आहे. लेखक तरी

हडबडून गेला. त्याला कांहीं सुचेना, उलगडा होईना. दिङ्मूढ होऊन बसला. हें सर्व खरेंच असेल काय? बेभरंवसा तरी कसा ठेवावा? असें म्हणून लेखक थोडा वेळ तरी अगदीं दगडासारखाच शुंभ झाला. इतक्यांत ३।४ माणसें मोठमोठ्यानें खदखदां हंसूं लागलीं. अंगांत आलेला स्नेहीहि हंसूं लागला. अगोदर ठरवूनच हा प्रयोग करण्यांत आल्याचें नंतर समजलें!

लेखकाचा मूर्तिपूजेवर विश्वास नसतांहि तो इतका गडबडला, तर अंधश्रद्धाळु लोकांची किती फसवणूक होत असेल याची वाचकांनींच कल्पना करावी. मागाहून समजलें कीं, इतकें बेमालूम ॲक्टिंग होण्याचें कारण, त्यांनीं हा अभ्यासच केला होता. तेव्हां अज्ञजनतेला अधिक अंधकारांत टाकणारी व जिवंत देवाचा अपमान करणारीं ही मूर्तिपूजा टाकून द्या.

" आतां यां दगडी देवाचें पूजन राहूं द्या. जिवंत देवाचें पूजन करण्याचा उपदेश करीत सर्वत्र फिरा. खेडोखेडीं आणि दारोदार भटकून ही जिवंत देवाची उपासना तुम्ही रूढ केली, तर एक महत्कार्य केल्यासारखें होईल. " ( विवेकानंद. )

या देवाचा विसर पाडणारी, जनतेची विवेचकवुद्धि नष्ट करणारी देव व भोंदू लफंग्या नटांना व अनेक नीच कृत्यांना आसरा देणारीं मंदिरें पाडून टाकावींत व देवांना बाहेर फेकून द्यावें असेंच समाजक्रांतिकारक प्रतिपादन करणार नाहीं काय? देवाच्या नांवावर चाललेले फसवेगिरीचे धंदे हे असें चालले असतात व त्याला आणखीहि फांटे फुटले आहेत.

## आणि तुमचं चांगलं ऽ हुईल ऽऽऽ

याच दगडाच्या बुडांतून म्हणजेच मूर्तिपूजेच्या मूळांतून विन-

बुडाचा भविष्यवाद उत्पन्न झाला आहे. यानें आळशी व कर्तृत्वहीन लोकांना मोठा आधार दिला आहे, आणि त्याचवेळीं रिकामटेकड्या लोकांना एक पोटाचा धंदा सांपडला आहे. देवाच्या भोंगिऱ्यांतून भोळ्या बायाबापड्यांना फसविणारी, भविष्य सांगणाऱ्या चिडबुडे जोशी व ज्योतिषी यांची वीण बाहेर पडली आहे. त्यांनीं मागासलेल्या वर्गाच्या मेंदूंत भविष्यवादाचें गरल ओकून, नशीबावर हवाला ठेवण्याची मनोवृत्ति उत्पन्न केली आहे. सकाळीं दार उघडतात न उघडतात इतक्यांत ' आणि तुमचं चांगलं हुईल ' दुसरा ' बायशाप ' तुम्हाला 'दत्त प्रसन्न होईल' असे आशीर्वाद देत घरोघरीं 'पायधूळ' झाडीत हे लोक प्रत्येक घराचा बेअकली गोठा बनवत असतात. एकाद्या घराची प्रथम छडान् छडा माहिती गोळा करून, मग भूतकालच्या अचूक गोष्टीचा मारा करीत भविष्याची फेंक सुरू होते. हा कवडीचुंबक कुडबुड्या जोशी संपत्तीची, धनधान्याची, मुलाबाळांची, व्यापारी बरकत व नोकऱ्यांच्या बढतीची खैरात करीत सुटतो. झोळींत पैसा पडेल त्याप्रमाणें देणाऱ्याचें नशीब उघडतें! सुशिक्षित पुरुषानें यांना थारा दिला नाहीं तर घरच्या मालकाचें पाऊल दाराबाहेर पडायची फुरसत कीं, मुंगीच्या पावलानें यांनीं शिरकाव केलाच. हे आंत शिरतांच गोपांतल्या बायका आपला हात मी तूं करून यांचे हातांत देण्यास स्वखुषीनें तयार होतात. तर एखादी मुलाच्या आशेनें ज्योतिष्याच्या हाताला धरूनहि घराबाहेर पडते. आपण दिलेला मुलांचा आशीर्वाद चुकूं नये म्हणून, यजमानणीकडून व्रतसंकल्प पार पाडण्याकरितां यांचा मुक्कामहि केव्हां केव्हां कांहीं महिने तेथें पडतो. व्रतसंकल्पाचीं गुप्त कृत्यें कदाचित बाहेर पडलीं तर मुलासकट यजमानणीला बाहेर पडण्याची पाळी येते! अज्ञजनतेच्या मेंदूवर पोसणाऱ्या या टोळांचें—भट, बडवे, ज्योतिषी, देव-

ऋषी व जोशी, गारुडी, गोंधळी, गोपाळ, गोसावी, डोंबारी, फकीर, पुजारी, जंगम, कैकाडी, पुराणिक, जपीतपी, या मालिकेचें पोषण व रक्षण करणारे बालेकिल्ले म्हणजे देवांचीं मंदिरें होत. असे "जेथें पंचवीस तीस लाख लोक साधू म्हणून दुसऱ्यांवर फुकट चरतात आणि जेथें मी 'ब्राह्मण' म्हणून लक्षावधि लोक गरीबांचें रक्त शोषतात त्या देशाला देश म्हणावें कीं नरक म्हणावें ?" विवेकानंद.

## गुलामगिरीचा पायाच उखडून टाका.

या उच्चनीच भेद रक्षण करणाऱ्या भिक्षुकी फलटणीनें व भेदमूलक देवालयांनीं पवित्र धर्माची घाण केली आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र व अस्पृश्य या सर्वांना या वृत्तीचे गुलाम केलें आहे. या वृत्तीला, या भेदाला उपटून काढायचें तर ही संस्थाच नामशेष केली पाहिजे. हिंदू भाईहो " उठा मर्द बना, प्रगतीच्या मार्गांत आडवे पडणाऱ्या भिक्षुक वर्गास ठोकर मारून उडवून द्या. प्रथमतः भिक्षुकशाहीचा नायनाट करा " — विवेकानंद.

ब्राह्मण भटाला मारण्याकरितां दुसरा रावभट निर्माण करून किंवा ब्राह्मण जगद्गुरुचें महत्त्व नाहींसें करण्याकरितां क्षात्र-जगद्गुरु संस्था निर्माण करून हें वीष समाजांतून समूळ नाहींसें होणार नाहीं. हा तात्पुरता उपाय म्हणून योजला असला तरी याचेंही तसेंच अधःपतन होणार नाहीं कशावरून ? ब्राह्मणेतरांतील इतर पोटजातीपासून त्याच मार्गानें रावभट त्रास देणार नाहीं कशावरून ? हेतू ठीक आहे, पण तो तसाच कडेला जाणार नाहीं. मिळालेले हक्क व मान कुणाला लवकर सोडावासा वाटत नसतो हा मनुष्यस्वभाव आहे. इतिहास त्याला पुरावा आहे. म्हणून ही गुलामगिरी पायांतूनच उखडून टाकली पाहिजे.

ही विशिष्ट वर्गाकडे जाणारी गंगाजळी आटूं लागली, ही दक्षिणेची टांकसाळ बंद पडली तर पुजारी—बडव्यांपैकीं एकही वारस या देवालयाच्या वाऱ्याला उभा राहणार नाहीं.

दुसऱ्याच्या जिवावर पोसणाऱ्या या वर्गाचा मलिदा बंद केला म्हणजे भिक्षुकवर्ग आपोआपच उपयुक्त धंदा करून देशाच्या उन्नतीस तो पोषक होईल. तो जात्याच हुषार वर्ग आहे. त्याच्या बुद्धिमत्तेचा फायदा त्यांना तर होईलच, पण पर्यायानें देशाचाही होईल. हा वर्ग नष्ट झाला म्हणजे इतर वर्ग बौद्धिक गुलामगिरींतून लवकर मोकळे होतील.

परान्नपुष्ट भिक्षुक वर्गाकडे जाणारा हा देवालयाचा पैसा बंद केला. हीं देवालयांचीं उत्पन्नें खालसा करून त्यांचा शिक्षणाकडे खर्च केला तर दारूच्या उत्पन्नावर जगणारीं विद्यालयें या पैशांवर उत्तम चालतील आणि सहजासहजीं दारूबंदी अमलांत आणतां येईल.

# प्रकरण ५ वें

आपल्या हिंदुसमाजांत हा देवधर्म किंवा देवावरील अंधश्रद्धेचा प्रकार इतका खोल रुजला आहे कीं, कित्येक पदवीधरही अजून या देव-देवऋषी वगैरेच्या भीतीपासून मुक्त झालेले नाहींत. दगडाच्या देवाच्या अंगीं ' चांगलें वाईट ' करण्याची शक्ति आपणच लादून त्याचे रागापासून सुटका करून घेण्याकरितां, देवाचा दलाल नाचवील त्याप्रमाणें आपण नाचत असतों. लेखकाची या ' दगडाच्या आकारावर ' मुळींच भक्ति नाहीं, पण हें लिहित असतांना त्याच्याच घरीं त्याच्या मर्जीविरुद्ध, एकाचें संकट निवारण्याकरितां म्हणून एकाला ' कोंबडें ' सोडलें आहे. एकानें ताईबाईला प्रसन्न करण्याकरितां घरीं बकरें आणून त्याचा नैवेद्य त्या देवीला दिला व तिसऱ्यानें आजारांतून उठला म्हणून सत्यनारायण प्रसन्न करण्याकरितां दोनशें एक माणसांचें जेवण घातलें. तेव्हां राजकीय पारतंत्र्यांतून हिंदुस्थान सुटला तरी, या देवांच्या म्हणजे दगडाच्या बोजाखालून तो लवकर सुटेल असें कांहीं वाटत नाहीं.

ते देव, त्यांचे ते खास प्रधान, ते जगद्गुरु, त्या भट पुजाऱ्यांची ती फलटण, भोंदू देवऋषी, लफंग्यांचा तो तांडा व त्यांचे प्रचारक यांच्या कचाट्यांतून बिचारा अडाणी शेतकरी वर डोकें केव्हां काढील कोण जाणे! हें त्यांचें अज्ञान दूर करण्याकरितां जर एखादा प्रचारक देवाचें गौडबंगाल उघडें करूं लागला, तर त्याची समजूत पटण्याऐवजीं त्याचा खरपूस समाचार मात्र घेतला जाईल. त्याच्यावर, हा बाटगा आहे, मुसलमानाचा हस्तक

आहे, वगैरे आरोप त्याचेवर लादून त्याची गांवाबाहेर रवानगी झाल्याखेरीज राहणार नाहीं.

भांडवलशाहींचें बूड स्थिर राहण्यालाही देवाची भावना भरपूर मदत करीत आहे. फार काय श्रीमंतावरूनही देवाची कल्पना बसवली गेली असावी असें विधान करणें चुकीचें होईल असें वाटत नाहीं. श्रीमंतांना श्रम करावे लागत नाहींत. त्यांच्या इच्छेला येईल त्या वस्तु त्यांना मिळणें सोपें असतें. त्यांची सत्ता गरीबांवर चालते. याच श्रीमंतीचा अतिरेक–म्हणजे स्वर्गसुख, तेथें काय नाहीं ? इच्छित वस्तु इच्छा केल्या-बरोबर हजर ! अप्सरांचें सुख, विपुल संपत्ति—ही स्वर्गसुखाची कल्पना समाजांत प्रचलित आहे—धर्मगुरु, राजे, सरदार व श्रीमंत देवाचे लाडके, पूर्वजन्मींच्या पुण्याईनें सुखी झालेले अशीच ठाम समजूत असल्यामुळें गरीब मजूर वर्ग नाडलेला आहे त्या स्थितीं-तच राहण्यास तो कबूल असतो. समाजाची घडी बदलून ती आप-ल्याला अनुकूल करून घेण्याचा तो प्रयत्न करीत नाहीं. ही विषमता व गरीबी निर्माण होण्याला विशिष्ट वर्गाची नीतिच कारणीभूत आहे, व मनांत आणल्यास हें पारडें सर्वस्वी आप-ल्याला बदलतां येईल, ही खात्री तो दैववादाचा गुलाम झाल्यानें पटत नाहीं. यामुळें देवाचा दगड त्याच्या डोक्यावर दडपण घालतो, तसा पोटावरही आदळतो. गरीबी ही पूर्वकर्मानुसार आपल्या भागाला आली आहे असें समजून " नित्य नवें जें देईल माधव, भक्षुं तेचि घरिं " अशी कर्तृत्वशून्य शिकवणही अनेक संतांच्या तोंडून निघाली आहे. त्या त्या समाजघडीचा परिणाम संतांनाही टाकून देतां आला नाहीं ! या जन्मीं भोगलेल्या कष्टाची भरपाई दुसऱ्या जन्मीं देव देईल. अन्यायी, स्वार्थी, दुष्ट लोकांना

ईश्वरच शासन करील, अशी परावलंबी वृत्ति स्वीकारल्यामुळें खालचा कष्टाळू अज्ञानी वर्ग वरतीं येणें दुरापास्त झालें आहे.

अनंत प्राणी रोज आपल्या पायाखालीं चिरडत आहेत. प्रत्येक पावलागणिक जाणून न जाणून हिंसा होत आहे. निसर्ग या रोज घडणाऱ्या गोष्टींपासून अलिप्त आहे. आपल्या हालाबद्दल व स्थितीबद्दल देवावर अवलंबून राहून पुढच्या जन्मींच्या सुखाची आशा केल्यानें जगांत समता, शांति व सुख नांदणार नाहीं. भांडवलशाही आपली नीति सुधारणार नाहीं, तर ती सुधारणें आपले हातीं आहे. समता स्थापन करणें समाजाचे हातीं आहे संपत्तीचा, सुखाचा, श्रमाचा वाटा सर्वांना सारखा उपभोगतां येईल, अशी परिस्थिति निर्माण करणें समाजाच्या हातीं आहे. विशिष्ट जातीची, वर्गाची किंवा राष्ट्राची गुलामगिरी फेंकून सर्व मानवजात विश्वबंधुत्वाच्या सहकार्यानें एक होणें शक्य आहे. 'एकमेकां साह्य करूं। अवघे धरू सुपंथ। पण ही परिस्थिति निर्माण होण्याला हा 'दगडाचा देवबापा' आड येतो. ही गुलामगिरी टाकून जनता हीच परमेश्वर आहे. कर्तुमकर्तुम् समर्थ असा तोच आहे. पृथ्वीचा स्वर्ग बनवणें तिच्याच हातीं आहे. अशी खात्री पटली म्हणजे हा जागा झालेला परमेश्वर स्वर्गातील कल्पनामय समता पृथ्वीवर आणूं शकेल. दुष्टाचें निर्दाळण करूं शकेल. जो वेदांत निव्वळ पुराणांतच वास करतो, जें विश्वबंधुत्व निव्वळ कीर्तनांतच वास करतें, जीं गोड तत्वें निव्वळ काथ्याकूट करण्यांतच खर्च होतात त्याचा जगास प्रत्यक्ष उपयोग काय? तेव्हां देव दगडांत नाहीं. तो जनतेंतच आहे व जगाची उलथापालथ करण्यासही तोच समर्थ आहे. धार्मिक गुलामगिरी, आर्थिक गुलामगिरी व राजकीय गुलामगिरी या सर्वांला अज्ञानानें उभा केलेला दगडाचा देवच कारणीभूत आहे.

ध्यानांत निमग्न होऊन किंवा सृष्टीशीं तन्मय होऊन पुढें आपली संकुचित स्वार्थवृत्ति टाकून दिली नाहीं व माळ ओढीत एकाद्या मठींत जन्म काढला काय किंवा पैसा ओढीत तिजोरीचीं तोंडें भरलीं काय, जगाला त्याचा काय फायदा? एक स्वार्थी, मुक्तीच्या इच्छेनें संन्यास पत्करणारा, तर दुसरा स्वार्थी, महत्वाकांक्षेनें संपत्ति सांठवून दुसऱ्यांना संन्यास घ्यावयास भाग पाडणारा. हे लोक पृथ्वीच्या उत्पादनांत भर न घालतां व्यर्थ जनतेच्या श्रमावर जग-णारे टोळच होत. जनतारूपी जनार्दनाची सेवा करण्याकडे जर आत्मविकासाची वाढ होत नसेल तर तो पोकळ निरर्थक वेदांत काय कामाचा! म्हणून खऱ्या भक्तानें ब्रह्मरूप जनार्दनाला आपल्या सेवेनें जागा केला पाहिजे. म्हणजे जागा झालेला विराट पुरुष दुष्टांचें शासन करूं शकणार आहे. आकाशाकडे हात करून देवाचा धांवा केल्यानें पाप्यांना शासन मिळत नाहीं. ज्या ज्या वेळीं हा विराट-पुरुष-हा जनता जनार्दन जागा झाला त्यावेळीं त्यानें उन्मत्त साम्राज्य-शाहीला, तैमूरलंगी बादशाहीला, सैतानी झारशाहीला, संपत्तींत लोळणाऱ्या रोमशाहीला फ्रान्सच्या कामांध लुईला धुळीला मिळविलें आहे. न्यायाचा निवाडा करण्याला अधिक बलवान जगांत दुसरा कोणी नाहीं. रशियन अस्वलाप्रमाणें तो केव्हां भयानक स्वरूप धारण करील किंवा गांधीच्या स्वरूपांत तो महापुरुष, प्रेमळ अहिंसा देवीचें गोड स्वरूप धारण करून आपल्या मोहिनीनें दिव्यदृष्टि देऊन जगांत प्रेमाचें साम्राज्य पसरवील; पण हा जनता जनार्दनरूप जागा झाला पाहिजे, बलवान् झाला पाहिजे, सत्ताधीश झाला पाहिजे. म्हणजेच पृथ्वीवर न्यायाचें राज्य सुरूं होईल. बहुसंख्य जनता सुखी होईल-दगडाच्या देवांत नव्हे, तर जिवंत देवांच्या सेवेंत स्वतःचें व दुस-ऱ्याचें कल्याण आहे.

## देवांवर भार आपण मोकळे.

या देवालयांनीं आम्हाला कर्तृत्वशून्य केलें आहे. स्वतःच्या हिंमतीवर व मनगटांवर अवलंबून राहण्याऐवजीं देवावर भरंवसा टाकून हात हालवीत बसण्याची वृत्ति या देवालयांनीं व त्यावर पोसले जाणाऱ्या वर्गानें अज्ञ जनतेमध्यें पेरली आहे. ' देव ठेवील त्या स्थितींत रहावें ' या कल्पनेनें भांडवलशाहीचें आसन स्थिर झालें आहे. अन्याय होत असतांही प्रतिकाराची वृत्ति, ' सर्व कांहीं दैवाधीन आहे या कल्पनेनें ' नष्ट झाली आहे. संकटाशीं टक्कर देऊन ' नर का नारायण ' होण्याचा आत्मविश्वास नाहींसा झाला आहे. जगाच्या धक्काधक्कींत हिंदुस्थान जो निव्वळ धक्केच खात बसला आहे. त्याला पुष्कळसें कारण हा दैववाद आहे. देवाची इच्छा म्हणून अमके आमच्यावर राज्य करतात! देवाची इच्छा म्हणून आज आमची अशी स्थिति आहे! कर्ता करविता तो आहे! आम्ही पामरांनीं हात उचलून काय होणार आहे, असें म्हणून कित्येक विद्यार्थीसुद्धां नशीबावर हवाला टाकून कर्तव्य न करतां स्वस्थ बसत असतात.

असा निव्वळ नशीबावर हवाला टाकून देवाचा धावा करणारा टाळकुट्या पंथ निर्माण झाला आहे. हे लोक स्वतःच्या पोटालाहि मिळवत नाहींत; दुसऱ्याच्या श्रमावर जगणारे हे परान्नपुष्ट वर्ग खरोखरी भूमिभार तर आहेतच, पण इतरांच्या मनांतहि अशी देवावर हवाला ठेवून बसण्याची वृत्ति उत्पन्न करतात, म्हणून हे लोक देशविघातक झाले आहेत.

न करवे धंदा । आइता तोंडीं पडे लोंदा ॥
उठिते ते कुटिते टाळ । अवघा मांडिला कोल्हाळ ॥

(तुकाराम.)

हे स्वतः तर आळशी असतातच. पण दुसऱ्यांसहि बनवत असतात. अहर्निश कर्तव्यरत असलेल्या देवाला असे लोक कसे आवडतील? निर्बुद्ध जनावरांना सुद्धां तो बसल्या जागीं पोसत नाहीं, मग अशा म्हैंदांना कसा पोशील?

कष्ट करतो त्यालाच देव पोसतो. तोच देवाचा लाडका असतो. शेतकरी स्वस्थ देवावर हवाला टाकून बसला, तर त्याची नांगरण, पेरणी करून, धान्याची गाडी देव घरीं आणून पोचवत नाहीं. देवाला कौल लावला आणि इकडचें पान तिकडें पडलें म्हणजे जगाची कांहीं उलटापालट होत नाहीं.

दैवात्तमिति मन्यन्ते ये हतस्ते कुबद्धयः ॥ –(योगवासिष्ठ.)

" कोणतीहि गोष्ट दैवानें घडून येते, अशी ज्यांची भावना असते ते मनुष्य दुष्टबुद्धीचे असून त्यांचा अखेरीस नाश होतो. "

आतांपर्यंत वर्णिलेल्या जातिभेदाला, विषमतेला, स्पर्शास्पर्शतेला, भोंदू गोसाव्यांना व अनेक उठाठेवी करणाऱ्या लोकांना आधार देणारे, हिंदुधर्माच्या ऐक्यभावनेचा विघात करणारे, अज्ञजनतेला अधिक अंधःकारांत लोटणारे देव–देवालयें मूर्तिपूजा, हीं देशोद्धारक आहे काय याचा वाचकांनींच विचार करावा.

जाणती मूर्तिपूजा नको असें लेखक म्हणत नाहीं. देवालयें मूर्ति व क्षेत्रें हीं सर्रहा वाईटच आहेत, यांत चांगल्या गोष्टी कांहींच नाहींत असें लेखक मुळींच म्हणत नाहीं. पण सरासरी काढली तर अनिष्ट परिणामच जास्त दिसून येत आहेत. प्रथमच सांगितल्याप्रमाणें बहुसंख्य जनतेचा विचार करून या प्रश्नाकडे पहायचें आहे. अपवादावरून सर्रहा नियम बांधणें योग्य होणार नाहीं; ते अपवादच आहेत.

लेखक, मूर्तिभंजक व मंदिरविध्वंसक नाहीं. लेखक स्वतः थोडा-बहुत चित्रकार व शिल्पकार असल्यामुळें शिल्पकलेचें विध्वंसन झालेलें त्याला पहावणार नाहीं. जगाला थक्क करणारी चित्रकला व शिल्पकला या देवालयांत व मंदिरांत आजहि शाबूत आहे. उच्च प्रतीची चित्रकला व शिल्पकला पाहून इतरांना जें कौतुक वाटेल, त्यापेक्षां लेखकाला त्या कलेबद्दल आदर व अभिमान वाटणार आहे. पण या सर्वांचा जनतेवर होणारा समुच्चयपरिणाम पाहिला म्हणजे हीं देवालयें ठेवावींत, पण त्यांतील देव बाहेर काढावेत, देव ठेवावेत, पण त्यांच्यामागें लावलेल्या अंधकल्पना काढून टाकाव्यात–याकरितां उपाय म्हणून मंदिरांचीं,– धान्यांचीं किंवा शस्त्रास्त्रांचीं कोठारें बनवावींत. हवेशीर करतां आल्यास तेथें शाळा काढाव्यात व देवांची स्थापना, शिल्पकलेचीं गोड कामें म्हणून संग्रहालयांत किंवा त्यांची पूजा होत नसेल तर त्यांना रस्त्याच्या नाक्यावर पुतळ्यांच्याऐवजीं ठेवावे. अशीच सूचना करणें नाइलाजास्तव भाग आहे. देवालयें म्हणजे रूढीला पोसणारे व आश्रय देणारे किल्ले आहेत. हा

" रूढीचा गड खालीं उतरा । पाकोळ्या घुबडांना उडवा । "

—( गडकरी. )

म्हणजे वातावरण स्वच्छ होईल. मूर्तिपूजा नको म्हणणें, अशीं मतें प्रतिपादन करणें हिंदुधर्माला सुटून आहे असेंही मानण्याचें कारण नाहीं. प्राचीन काळीं ती हिंदुधर्मांत [illegible] व्हती ती मागाहूनच घुसटलेली आहे म्हणून मूर्तिपूजा नाहाशी झाली म्हणजे हिंदुधर्म बुडा । असें मानण्याचें कांहीं कारण नाहीं.

हे देव [illegible] ीं मंदिरें नष्ट झालीं म्हणजे सर्वत्र नांदणारा देव पाहण्याची [illegible] जनतेंत येऊं शकेल. मंदिराच्या कोंदट हवेंतून,

त्या पाकोळ्यांच्या दुर्गंधींतून बाहेर पडल्यानंतर उघड्या नीलांबरीं प्रकाशत असणाऱ्या जागृत देवतेकडे सहजीच दृष्टि जाईल.

सब घट राम पछानोरे। मेरा कहना मानोरे। कबीर.

सृष्टीशीं तादात्म्य झाल्यानंतर प्रकृतिमाताच अनंतरूपांनीं नटलेली दिसूं लागेल.

सगुणरूपाखेरीज देवाचें आकलनच करतां येणार नाहीं, त्याशिवाय ध्यान लागणार नाहीं, असें म्हणणाऱ्यांनीं सृष्टिसौंदर्याकडे थोडे डोळे उघडून पहावें.

देवाच्या मागें लागलेलें विषमतेचें वारें बदललें. स्वार्थ हेतु नष्ट झाला म्हणजे देवाकडे पाहण्याची वृत्तिही सात्विक होईल. अणुरेणूंमध्यें असलेल्या परमेश्वराला भिंतीच्या तुरुंगांत टाकावेसें वाटणार नाहीं. खुल्या पवित्र वातावरणांत तो तुम्हाला दिसूं लागेल. निसर्गाशीं तुम्ही तन्मय व्हाल, निसर्गाशीं एक होण्यानें जसे तुम्ही त्या शक्तीजवळ जाल, तसे दगड–धोंड्याच्या भक्तीनें तुम्ही जाणार नाहीं. संत महात्म्यांची मूर्तिपूजा ज्यावेळीं व्यापक झाली, त्या मूर्तिपूजेनें ज्यावेळीं ते यच्चावत् वस्तूशीं आपलेपणानें पाहूं लागले, त्याचवेळीं ते मुक्तीला पोहोंचले.

या देवाधर्माच्या परस्परविरोधी भांडणांतून मार्ग काढण्याला महात्माजींनीं केलेली व्याख्या सर्वांना ग्राह्य होण्याजोगी आहे. ते म्हणतात—

"जगांत जितके प्राणी आहेत तितके देव आहेत, असें म्हणणें सत्याला धरून आहे. त्याला अनेक आकार आहेत, म्हणून त्याला आपण निराकार म्हणतों. तो प्रत्येक भाषेंतून बोलतो म्हणून त्याला भाषातीत म्हणतो. पण माझ्या खोल अंतर्यामीं देव म्हणजे सत्य हेंच मी म्हणत असतों....सत्याबद्दल मतभेद होत

नाहीं. हें तत्व अबाधित आहे. नास्तिक लोक देवावर विश्वास ठेवित नाहींत. पण सत्य हें सर्वांना प्रिय आहे ''

कारण अबाधित तत्वाबद्दल मतभेद होत नसतो.

' रूप नही रंग नही । नही बरन छाया । निराकार निर्गुनही । तूंचि रघुराया ।

हा रघुराय म्हणजे अबाधित तत्व होय. असतील नसतील त्या गुणांचा आरोप करून मूर्तिपूजेंत दंग होण्यापेक्षां, निसर्गामध्यें असलेल्या अबाधित तत्वांचा शोध करण्यांत व्यक्तीचा तसाच जगाचा फायदा होतो. प्रगतीला मदत होत असते.

कल्पनेचा पसारा मांडण्यापेक्षां समोरील पसाऱ्याकडे संशोधक बुद्धीनें पाहूत अबाधित तत्वाचा शोध करणें चांगलें नव्हे काय ?

जगांतील प्रत्येक गोष्ट ईश्वरच आहे असें मानल्यास मूर्तीवरही ईश्वराचा आरोप करतां येईल, पण कालांतरानें मूर्तींतून विश्वव्यापी तत्वाकडे जाण्याऐवजीं मूर्तीलाच अज्ञ जनता ईश्वर मानूं लागते. मूर्तीलाच देव मानणारा अंधश्रद्धाळू इतरत्र ईश्वराचें अस्तित्व पाहण्यास समर्थ होत नाहीं. अंधश्रधाळू चौकस बुद्धीचा नसतो. तो दुसऱ्याचे हातून पाणी पिणारा असतो. असा मूर्तिपूजक आपल्या मूर्तीखेरीज दुसऱ्या मूर्तीस मानत नाहीं. दुसऱ्या मूर्ती खोट्या मानतो. त्यांची निंदा करतो. हे भक्त आपल्या देवाखेरीज इतर देवांची नालस्ती करतात. आणि एका देवाचे भक्त तरी सलोख्यानें कुठं वागतात ? मोठमोठ्या क्षेत्रांतील देव हे सार्वजनिक असले तर दक्षिणेपायीं ते पुजारी–बडव्यांच्या खास मालकीचे होतात. त्यांच्या मालकीच्या हक्कासाठीं कोर्टाचा मार्ग पतकरण्यासही भक्तांना दिक्कत वाटत नाहीं. वाडीचा दत्त खासगी मालकीचा, पर्वताचें मंदिर खासगी मालकीचें समजून इतर भक्तांना बंदी होत

आहे. एकत्र कुटुंबांतील देव्हाऱ्यावरचे देव सोन्यारुप्याचे असल्यास त्या देवापायीं मारामाऱ्या होतात. सख्ख्या भावांत वितुष्ट येतें विश्वबंधुत्व पटण्याऐवजीं या मूर्ती पाठच्या भावांतही पुष्कळ वेळां भेद पाडतात!!

निसर्गाबद्दल असा भेद होत नाहीं. निसर्ग सर्व लोकांना वंदनीय आहे. सर्वांना समजण्यासारखा आहे, तें एक अबाधित तत्व आहे.

ईश्वराचें सर्वव्यापी स्वरूप जसें मंदिराबाहेर नीलांबरीं दिसूं शकेल तसें कोंदट मंदिरांत दिसूं शकणार नाहीं. तुमची बुद्धि व्यापक होणार नाहीं. देव म्हणजे अबाधित तत्व आहे. हा देव मूर्तींत आहेच पण तो अत्यंत अल्प प्रमाणांत व अपरिपक्व स्थितींत आहे.

'पंचतत्वके दरगा माने' —( कमाल ).

कोळशांतील द्रव्यें हिऱ्यांतही आहेत, पण त्यांतील प्रमाण भिन्न आहे. भूमींतून वनस्पति निर्माण होते. कारण भूमींत कांहीं अधिक गोष्टींचें मिश्रण झाल्यानें तिला तें स्वरूप येतें. अन्न कांहीं काल तसेंच राहिलें, व त्यास विशिष्ट परिस्थिति अनुकूल मिळाली म्हणजे त्यांत प्राण उत्पन्न होतो. म्हणजे कांहीं रासायनिक मिश्रणाचा व प्राणवायूचा संयोग झाला म्हणजे तें हालचाल करूं लागतें. अंड्यांस ऊब लागली तरच त्यांत जीव येतो. या सर्व प्राण्यांत मनुष्य हें एक अत्यंत नाजुक असें मिश्रण होय. मन, बुद्धि, आत्मा ही त्या मिश्रणांतून निघालेले विशेष आहे. बुद्धीस मेंदू असावा लागतो. मेंदु हा देहांतलाच एक भाग आहे. देह जडसृष्टीशींच संलग्न आहे. यावरून विचार हेही जडसृष्टीशीं संलग्न असल्याचें ठरतें. जगांतील प्रत्येक वस्तू म्हणजे पंचमहा-भूतांचें मिश्रण आहे. त्यांचें प्रमाण भिन्न आहे इतकेंच. संशोधकांचें पाऊल रोज पुढें पडत आहे. पूर्वीं अगम्य वाटणाऱ्या गोष्टी प्रयो-

गद्दारां लोकांना पटवून देतां येऊं लागल्या आहेत. नाजुक मिश्रणांचा शोध लागूं लागला आहे. कांहीं प्रयोगानें आयुष्यही वाढवतां येऊं शकतें म्हणतात. आज जी शक्ति अगम्य म्हणून आपल्यास वाटत आहे. प्राण म्हणजे काय मिश्रण आहे हें जें आपल्यास समजत नाहीं तें पुढें समजणार नाहीं असें कांहीं म्हणतां येणार नाहीं. पण प्रत्येक गोष्ट पंचमहाभूतांपासून निर्माण झाली आहे हें सिद्ध झालें आहे. यावरून विश्वबंधुत्व हें तत्व नैसर्गिकच ठरतें. मनुष्याची धांव या मिश्रणाच्या परिणत स्थितीकडे जाण्याची असली पाहिजे. दगडाची पूजा अगदीं प्रथमावस्थेकडे म्हणजे मागें नेते. हे प्रगतीला धरून नाहीं. जनीं जनार्दन पाहणें म्हणजे त्या उच्चतम तत्वाकडे जाण्याची धांव होय.

पॉवर हौसपासून अनेक वस्तूंना शक्तीचा पुरवठा मिळतो. त्यानें किटली उकळते, इस्त्री तापते, पंखा सुरू होतो, दिवे प्रकाशतात. एक दिवा हजारों जणांना प्रकाश देतो तर दुसरा आपलें अस्तित्व फक्त 'मिणमिण' प्रकाशानें दाखवतो. या सर्व वस्तूंचे आचार निराळे, उपयोग निराळे, आकार निराळे असले तरी सर्व वस्तूंत ती शक्ति वावरत आहे. तिचें प्रमाण निराळें आहे इतकेंच.

जडसृष्टि, वनस्पतिसृष्टि व मनुष्यकोटि या सर्व अवस्था पंचमहाभूतांच्या मिश्रणावर अवलंबून आहेत. हें तत्व समजल्यानंतर दगडच उराशीं घेऊन कोणीं बसणार नाहीं. दगड हें निसर्गाचें कनिष्ठ स्वरूप आहे, निसर्ग हें विराट् स्वरूप आहे. या व्यापक तत्वाकडे जाणें, त्याशीं तादात्म्य होणें म्हणजे आपपर भाव विसरणें होय. हा ज्या मानानें जाईल त्या मानानें तो जनतेच्या सेवेस प्रवृत्त होत असतो.

देवालयाच्या या खुराड्यांतून, या छपरी मंडपांतून बाहेर पडा. म्हणजे क्षणोक्षणीं बदलणाऱ्या त्या आकाशांत सकाळीं उमललेल्या

गुलाबकळींत, सायंकाळच्या गुलालफेकींत, काळ्काभिन्न अमावास्येच्या काळोखांतील रत्नांच्या धूळफेकींत, प्रशांत जलाशयांत स्मितहास्य करणाऱ्या तारकांत, वृक्षलतांच्या कर्णोपकर्णी गुंगणाऱ्या मंजुळ गानरवांत, झुळझुळ वाहणाऱ्या निर्झरांच्या गुजगोष्टींत, मैनेच्या बासरींत किंवा मोराच्या रुबाबी नाचांत तुम्हांला ईश्वर दिसूं लागेल. तुमच्याबरोबर तो बोलूं लागेल. व या जादूच्या किल्लीनें इतका काल झाकलेलें हृदयकपाट खोलून त्यांत तो विश्वप्रेमाचा ठेवा ठेवील.

ब्रह्मांड गोलकीं । पवनाच्या पालकीं
अवधूत कवतुकीं । पहुडलासे ॥—चांगदेव.

रम्य ठिकाणीं विश्वव्यापी आत्मा निद्रिस्त असलेल्या शक्तींना जागें करीत असतो. ज्ञानज्योतीनें त्यांच्या हृदमंदिरांचीं दालनें खुलीं होतात. मंदिरांतून बाहेर पडा म्हणजे ईश्वराचा कधींहि न संपणारा ठेवा तुमच्या हातीं येईल ' तो नानाविध यत्नांनीं तुमचें रंजन करीत आहे. नभोमंडलाच्या रंगपटावर अनादिकालापासून तो तुम्हांला निरनिराळे देखावे दाखवत आहे. आकाशांतील ढग चित्रविचित्र स्वरूपें घेऊन ईश्वराचीं अनंतरूपें, त्याचें विराटस्वरूप दाखवत आहे. कोणत्याहि रूपवतीच्या गुलाबी गालाला लाजवणारें, कोणत्याहि कोहिनूर हिऱ्याला फिकें पाडणारें, टर्नरसारख्या चित्रकाराच्या भपकेदार रंगाला पिकें पाडणारें हें ईश्वराचें स्वरूप डोळे उघडून तरी पहा! थकलेल्या पांथस्थाला भग्नहृदयी दुःखिताला, एकलकोंड्या जीवाला, मांडीवर घेऊन खेळवणाऱ्या या जगन्मातेला टाकून दगडाला कवटाळावें असें तुम्हाला वाटतें काय?

सान्या त्रिभुवनीं भरला आनंद । नृत्य ताल छंद चालतसे ॥
ऐशा या आनंदीं एकतानतेनें । समरस होणें असाध्य कां ॥

गीतांजली.

अशा जगाशीं समरस झालेल्याला सर्वत्र नारायण दिसेल. जातिभेद, पंथभेद हे सर्व भेदाभेद जातील. जनतेमध्यें त्याला जिवंत देव दिसूं लागेल. त्यांच्यासाठीं तो आत्माहुतीहि द्यायला तयार होईल.

मी माझी कल्पना पळाली वासना ।
जनीं जनार्दना सेवी तुझें ॥ —सोपान

ब्रह्मज्ञान तें हेंच. देवाच्या भक्तीचें अखेर तें हेंच. मनुष्याची मुक्ति ती हीच. साकार पूजा व निराकारपूजा अखेर इकडेच आली पाहिजे. जर कुणाला मूर्तिपूजेखेरीज हा मार्ग सांपडत नसेल तर मूर्तिपूजा बेलाशक करावी. पण त्यानें हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, यांतून सुटून आपल्याला पुढें जायचें आहे.

चराचरीं सर्व ब्रह्म ओळखावें ।
ईश्वरां पहावें ठायीं ठायीं ॥ ( गीतांजली. )

अशी व्यापक दृष्टि झाल्यानंतर हा ब्राह्मण तो ब्राह्मणेतर, हा हिंदु तो मुसलमान, हा स्पृश्य तो अस्पृश्य, मी हिंदुस्थानचा तो इंग्लंडचा, हा आर्य तो अनार्य, अशा प्रकारचे सर्व भेदाभेद जाऊन, हा श्रीमंत तो गरीब हा भेदही नाहीसा होऊन "अहिंसा समता व विश्वबंधुता" या पवित्र तत्वानें जग हेंच एक कुटुंब होईल. परकेपणा नष्ट झाला म्हणजे लढाया साहजिकच बंद पडतील. सर्वच देश आपले, सर्व लोक आपले बंधू, असें वाटल्यानंतर जिंकायचें कुणाला?

---

# नव्या पिढीचें राजकारण

**ज्ञानप्रकाश, पुणें**—समाजसत्तावादी पंथाच्या कार्यक्रमाचें विवेचन मराठींत इतक्या सुबोध रीतीनें दिलेलें आमच्या तरी पाहण्यांत नाहीं.

**नवाकाळ, मुंबई**—नव्या सत्यशोधनाच्या या इषाऱ्याचें 'नामधारी सत्य-शोधकांनीं' व भांडकुदळांनीं अनेकवार मनन करावें आणि त्यांतील 'अहिंसा, शांति व समता' इत्यादि विश्वबंधुत्वाचीं उच्च व उदार तत्वें आपल्या हृदयपटलांत कोरून ठेवून त्याप्रमाणें आपले विचार, उच्चार व आचार यांना वळण लाव-ण्याचा प्रयत्न करावा म्हणजे देशाच्या भाग्योदयास कालावधि लागणार नाहीं.

**चित्रमय जगत्, पुणें**—इषारा अंतर्भेदी आहे व राजकारण सखोल व विचारप्रवर्तक आहे. उतारे वेचक, मार्मिक व स्थलानुरूप असल्यानें लेखकाच्या बहुश्रुततेचा प्रत्यय येतो. पुस्तक नवविचारलिप्सु तरुणांना मार्गदर्शक होईल.

**हुतात्मा श्रद्धानंद**—हिंदुसंघटनेच्या यच्चयावत् अभिमान्यांसहि पुस्त-कांतील प्रकरणें वाचनीय व विवेचनीय झालीं आहेत. विचार, पक्षपातानें बहुधा अलिप्त असून एकंदरींत फार उदात्त आणि हितप्रद आहेत. कामकऱ्या शेतकऱ्यापासून तो अस्पृश्यवर्गापर्यंत सर्वांच्या चिरतन कल्याणाची कळकळ पानापानांतून प्रकटत आहे.

**तरुण भारत, बेळगांव**—पुस्तक सुंदर आहे. सोपें आहे. ठिक-ठिकाणीं विखुरलेलीं सुंदर अवतरणें पाहून हा छोटा ज्ञानकोशच आहे असें वाटूं लागतें. विवेचन प्रायः निर्दोष आहे. कांहीं प्रकरणें इतकीं सुंदर आहेत कीं तीं पुनः पुनः वाचावीं असा मोह वाचकाला होतो.

**जागृति, बडोदा**—प्रस्तुत परिस्थितींत हें पुस्तक म्हणजे सत्यशोधकांची गीता होण्यास पात्र आहे.

**दीनबंधु, पुणें**—माधवरावांची ओजस्वी भाषासरणी व अंतःकरणांतील कळकळ पुस्तकांतून ओतप्रोत ओथंबलेली दिसते. यांतून प्रत्येक व्यक्तीस कांहीं तरी नवीन सांपडेल.

**कर्मयोगी, सोलापूर**—भाषा सहज व अनलंकृत पण जोरदार, मांडणी तर्कशुद्ध व साधार व पाल्हाळरहित अशी आहे. एकंदरींत ग्रंथ अत्यंत मन-नीय झाला आहे. म्हणून या ग्रंथाबद्दल अभिनंदन करावें तेवढें थोडेंच आहे.

**महाराष्ट्र, नागपूर**—चर्चा मार्मिक आणि सणसणीत असून सत्य-शोधक समाजाची सुधारणा व्हावयाला पुस्तकानें चांगली मदत होईल.

**दीनमित्र, अहमदनगर**—लेखकाची एक प्रकारची लोकहितविषयक तळमळ क्षणोक्षणीं दृग्गोचर झाल्यावांचून रहात नाहीं.

**चिकित्सक, बेळगांव**—पुस्तकानें समाजाच्या वाङ्मयांत बहुमूल्य भर घातली आहे एवढेंच नव्हे, तर बहुजनसमाजास उलगडण्यास गहन अशीं अर्थशास्त्रांतील कोडीं सहज आणि साध्या भाषेत सुंदर रीतीनें सोडवून त्याचा राज व समाजकारणाशीं किती अन्योन्य संबंध आहे हें सप्रमाण दाखवलें आहे.

**विजयी मराठा, पुणें**—सत्यशोधक समाजाच्या तत्वाचें राजकीय, सामाजिक व आर्थिक दृष्टीनें विवेचन करणारें सोशियालिझमचे ( समाजसत्तावादाचें ) विवरण करणारें, सत्यशोधकांना तशी दृष्टि देणारें असें हें क्रांतिकारक पुस्तक आहे.

**जनता, नागपूर**—लेखक स्वतः सत्यशोधक समाजाचे पुरस्कर्ते असूनही त्यांनीं त्या समाजास इषारा दिला आहे. यावरून ते क्रांतिकारक कटु असले तरी सत्य आहेत व त्यांनीं सत्यशोधकांना खऱ्याकर्तव्याची जाणीव करून दिली आहे.

**ऐक्य, सातारा**—तत्वविवेचन या दृष्टीनें हे लेख खरोखरी वाचनीय असून सत्यशोधक समाजाचें ध्येय व्यापक असल्याची जाणीव करून देण्याचा हा प्रयत्न निःसंशय स्तुत्य आहे.

**वसुंधरा, मुंबई**—पुस्तक केवळ सत्यशोधकासाठीं नसून राजकीय घडामोडींत ज्या शेतकऱ्याचें स्वराज्य स्थापन करण्यांचें कांग्रेसचें ध्येय आहे. त्या ध्येयाला पोषक अशा हेतूनेंच सर्वसामान्य वाचकांसाठीं लिहिलें आहे.

**विजयी भारत, इसलामपूर**—पुस्तक वाचून झाल्यावर श्री. बागल यांनीं सत्यशोधकाच्या विचारसृष्टींवर अभिनव विचाराचें नवीन मन्वंतर सुरू केलें आहे असें वाटल्याचून रहात नाहीं.

**पुरुषार्थ, औंध**—नव्या पिढीच्या व नव्या वळणाच्या राजकारणांत काम करण्यासाठीं आपली तयारी कशी करावी तें स्पष्ट व जोरदार शब्दांनीं सांगितलें आहे.

**प्रगति आणि जिनविजय**—खऱ्या सत्यशोधकांना आपल्या कार्याची भरीव दिशा ठरवण्यास पुस्तक मार्गदर्शक होईल.

**परीक्षक, बेळगांव**—प्रदर्शित केलेले विचार सर्वांना मान्य होण्यासारखे नसले तरी ते सर्वांनींच विचार करण्यासारखे आहेत. पण आपल्या देशाच्या परिस्थितीकडे लक्ष देऊन बोल्शेव्हिझमचें भूत कोणीही अज्ञ बहु-

जन समाजांत सोडून देणें योग्य नव्हे, असा इषारा देणें आम्हास योग्य वाटतें.

**प्रगति, मुंबई**—समाजसत्तावादाचीं बहुतेक तत्त्वें ग्रंथकारांनीं स्वीकारलीं आहेत. फक्त बोलशेव्हिकाप्रमाणें वर्गकलहाचें तत्त्व त्यांना इष्ट दिसत नाहीं किंवा सर्व समाजाची उलथापालथ करण्याची त्यांची तयारी नाहीं.

**केसरी, पुणें**—समतेच्या तत्वाचा पुरस्कार केव्हांही तारतम्यानेंच करावा लागतो. नाहींपेक्षां विद्वानाविरुद्ध अविद्वानास, श्रीमंताविरुद्ध गरीबास, सावकाराविरुद्ध शेतकऱ्यास चिथावणी दिल्याप्रमाणें होऊन सर्वच जोड्या खड्डयांत पडतील हा इषारा आम्हांस द्यावासा वाटतो.

**सुबोधपत्रिका, मुंबई**—सत्यशोधन करणारा मग तो कोणत्याही जातीचा किंवा धर्माचा असो त्याला सदरहू पुस्तकांत नमूद केलेली विचारसरणी पसंत पडल्याशिवाय राहणार नाहीं. समाजसत्तावादाचीं तत्त्वें लेखकाला मान्य आहेत, पण वर्गकलहाची ते तरफदारी करीत नाहींत.

**उदय, नागपूर**—हैदोस धुल्लाची तरफदारी या पुस्तकांत केलेली असावी असा पुस्तकाच्या नांवावरून ग्रह होतो; तो वाचनानंतर नाहींसा झाल्याशिवाय रहात नाहीं. भाषा चटकदार पण प्रकरणें सोपी सुटसुटींत असून वाचतांना मुळींच कंटाळवाणें वाटत नाहीं.

**महादेवशास्त्री दिवेकर व प्रभाकर हरि खाडिलकर**—सत्यशोधक व ब्राह्मणेतर या नांवाशीं गेल्या दहा बारा वर्षांत ब्राह्मणद्वेषाचा अविभाज्य वाटला जाणारा संबंध जोडला गेला होता, तसा तो नाहीं असा विश्वास या पुस्तकाच्या वाचनानें झाला आहे. यज्ज मताच्या भूमिकेचा पुरस्कार या पुस्तकांत केला आहे त्या मताच्या भूमिकेची सर्वांनाच आवश्यकता आहे.

**दक्षिण महाराष्ट्र, सांगली**—नव्या पिढीचे गळीं असलें क्रांतिकारक राजकारण उतरविण्याचा प्रयत्न लेखकानें केला नसता तर बरें......तरुण भावनाप्रधान वाचकांची मात्र या पुस्तकानें दिशाभूल होणार आहे. हल्लींच्या परिस्थितींत पुस्तकांतील वेदांत यत्किंचितही उपकारक होईल असें वाटत नाहीं.

**बलवंत, रत्नागिरी**—लोकसेवेचें कंकण हातीं बांधून कार्य करणाऱ्या कोणाही पुढाऱ्याला आपल्या चळवळीच्या ध्येयाचें सुकाणू सोशियालिझमकडे वळवणें भाग पडतें. या दृष्टीनें पुस्तक विशेषतः नवीन पिढीला अवश्य वाचनीय आहे. पुस्तकाची भाषा रचना आणि विवेचनपद्धति व्यवस्थित आहे.

**भारतमाता, इसलामपूर**—माधवराव बागल यांची ओळख आमच्या या प्रांतांत पुष्कळ असून, त्यांनीं गेल्या वर्षांतील व्याख्यानें याच विचार-सरणीनें दिलीं होतीं. स्वातंत्र्याच्या विचारसरणीचा उपदेश करणारे ब्राह्मणे-तरांत व सत्यशोधकांत तरी बागल हेच पहिले देशभक्त होत असें म्हट-ल्यास गैर होणार नाहीं. हा इषारा एकट्या सत्यशोधकास नसून सर्व हिंदी जनतेस आहे.

**संस्थानी स्वराज्य, पुणें**—लेखनपद्धति उच्च दर्जाची असून भाषा साधी पण आकर्षक आहे. नव्या पिढीचें राजकारण कोणच्या तऱ्हेचें असावयास पाहिजे याचें उत्तम प्रकारें दिग्दर्शन केलें आहे.

**प्रो. शंकरराव जावडेकर**—यांतील विचार सत्यशोधक समाज, ब्राह्म-णेतर जनता व एकंदर महाराष्ट्र यानें ग्रहण केल्यास महाराष्ट्राच्या कर्तृत्वास योग्य दिशा लागून त्याच्या चालू इतिहासास नवें वळण लागेल. विशेषतः गांधींचा अहिंसावाद व कम्युनिझम् यांची जी जोड या पुस्तकांत दृष्टीस पडते. ती माझ्या मतें फार महत्वाची आहे.

**शंकरराव देव ( सं. स्वराज्य–पुणें )**—आपण प्रगट केलेले उदात्त सात्विक व खोल विचार यांनीं आम्हां सर्वांना आपणाला फार निकट बन-वलें आहे. हे विचार आचारांत उतरविण्यासाठीं कांहीं संघटनात्मक कार्य महाराष्ट्रांत व्हावें अशी आमची सर्वांची मनापासून इच्छा आहे.

**दिवाणबहादुर प्रो. लठ्ठे**—देशांतील सामान्य जनतेच्या स्थितीचें वर्णन निरनिराळ्या दृष्टीनें आपण चांगलें केलें आहे. दुर्दैवानें आपल्या इतक्या कळकळीनें सर्व बाजूनें या प्रश्नाचा विचार करणारीं माणसें सत्य-शोधक समाजांत फार थोडीं आहेत. ज्या प्रगल्भ विचारांनीं प्रेरित होऊन आपण हें पुस्तक लिहिलें आहे, ते विचार संघटित सत्यशोधक समाजाच्या द्वारानें कृतींत आणणें आपणास शक्य व्हावें अशी इच्छा प्रदर्शित करतों.

**कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे**—( प्रस्तावनेंत )—माधवराव हे कला-भिज्ञ चित्रकार असल्यानें आपल्या या वाङ्मयीन कृतींतही त्यांना आपली सौंदर्याभिरुचि प्रगट केल्याविना राहवलें नाहीं. त्यांच्या एकंदर विवेचनांत अर्थकारणाची जी नवी घडी आजकाल बसत चालली आहे तिचाच प्रभाव अधिक दिसत आहे. खऱ्या सत्यशोधकास अंतःकरणांत न पटेल असें कोणतेंच विधान या इषाऱ्यांत कोठेंहि नाहीं.

**आर. बी. जाधव**—( सेक्रेटरी–अखिल भारतीय सत्यशोधक समाज ) —पुस्तक वाचणाऱ्यास आपण धर्म, समाज व राजकारणांतील सत्यशोधनाचें कार्य निःपक्षपातपणानें व पूर्ण धैर्यानें करीत आहांत असें वाटल्याचांचून रहात नाहीं.

**मासिक मनोरंजन**—सत्यशोधक समाजाचे सभासद, खादीप्रचारक आणि राजकीय स्वातंत्र्याखेरीज इतर गोष्टी करणें अशक्य या मताचे तरुण व तडफदार लेखक माधव खंडेराव बागल यांच्या या पुस्तकामध्यें पाश्चात्य विशेष झांक असून कितीतरी विचार त्रोटक रीतीनें मांडलेले दिसतात.

**रत्नाकर**—खरा सत्यशोधक असतो कसा किंवा असावा कसा याचें आरंभीं काढलेलें चित्र अत्यंत मोहक असून कोणालाही पसंत होण्यासारखें आहे. शेतकरी, मजूर व त्यांचें महत्व, त्यांची होत असलेली अनास्था त्यांची हल्लींची केविलवाणी स्थिति यांच हृदयंगम वर्णन केलें आहे, भाषा निर्दोष व असंदिग्ध आहे. विषय–प्रतिपादन मूर्तिमंत कळकळीचें आहे. आपल्या म्हणण्याच्या समर्थनार्थ जागजागीं पाश्चात्य व पौर्वात्य थोर पुरुषांचीं वचनें विखुरलीं आहेत. ह्यावरून बागलांचा व्यासंग व बहुश्रुतपणा याचा प्रत्यय येतो.

---

## लग्नबंधन कीं तुरुंगवास.

**ज्ञानप्रकाश, पुणें**—हें वाचनीय व विचारप्रवर्तक पुस्तक रा. मा खं. बागल यांनीं लिहिलें आहे. यांत लग्न या संस्थेची पूर्वपीठिका थोडक्यांत दिली असून या संस्थेस हल्लींच स्वरूप कसें प्राप्त झालें, याचेंही दिग्दर्शन केलें आहे. स्त्री ही पुरुषाच्या मालमत्तेचीच एक वस्तू आहे, ही कल्पना प्रथम कशी उद्भव पावली व समाजाच्या वाढीबरोबर तिचा उत्कर्ष होत जाऊन स्त्रियांच्या गळ्यांत गुलामगिरीची धोंड कायमची कशी अडकविली गेली, याचें विवेचन यांत समर्पक रीतीनें करण्यांत आलें आहे, या कल्पनेला धर्माचेंही पाठबळ देण्यांत आल्यामुळें खुद्द स्त्रियांच्याही ती कशी अंगवळणीं पडत गेली, हीही वस्तुस्थिति यांत यथार्थ रीतीनें निदर्शित करण्यांत आली आहे. इतर मालकीच्या वस्तुसंग्रहांत किती ठेवाव्या याला जशी परिमिति नसते, त्याप्रमाणेंच एका पुरुषानें किती स्त्रियांचा संग्रह करावा यालाही ताळतंत्र उरला नाहीं! यासंबंधानें दुसऱ्या प्रकरणांत जी वस्तुस्थिति दिलेली

आहे, ती पाहून कोणासही पराकाष्ठेचा विस्मय व विषाद वाटेल. लग्नाच्या कल्पनेशीं नीतिअनीतीचा संबंध लावण्यांत येतो. पण या नीतिअनीतीच्या कल्पनाही देशकालपरिस्थित्यनुरूप बदलणाऱ्या कशा असतात, याबद्दलही ऐतिहासिक दृष्टीनें विवेचन करण्यांत आलें आहे, आणि या सर्व विवेचनास अधिकारी व्यक्तींच्या वचनाचा ठिकठिकाणींही आधारही देण्यांत आला आहे. लग्नसंस्थेची घडी सर्वस्वी स्वतःला अनुकूल व्हावी अशीच पुरुषांकडून कशी सिद्धता करण्यांत आली आहे, हीही गोष्ट पुस्तकांत निवेदन करण्यांत आली आहे. लौकिक व्यवहारांत पुरुषांचें प्राबल्य, कायदे करण्याचा अधिकार पुरुषांच्याच हातीं, त्या कायद्यांच्या अनुरोधानें न्यायदान करण्याची मुखत्यारीही त्यांच्याचकडे, अशी स्थिति असल्यामुळें गुलामगिरीच्या पाशांत स्त्रिया उत्तरोत्तर अधिक अधिक प्रमाणांत कशा जखडल्या गेल्या याचें चित्र पुस्तकांत चांगल्या रीतीनें रेखाटण्यांत आलें आहे. गोषा पद्धतीची अनिष्टताही योग्य प्रकारें निदर्शित करण्यांत आली आहे. त्याचप्रमाणें गतभर्तृकांच्या दुस्थितीचेंही वस्तुस्थितीस अनुरूप असें यांत निदर्शन करण्यांत आलें आहे. स्त्रिया या जन्मतःच अविवेकी व अनिष्टाचरणी असतात, असा त्यांच्यावर कायमचाच छाप मारण्यांत आला असला तरी स्त्रिया या एकट्याच दुर्वृत्त निघणें शक्य नसतें. त्याला पुरुषाचीही जोड जरूर असते ही गोष्ट ध्यानांत ठेवली म्हणजे स्त्रियांवरील हा आरोप सर्वस्वी कसा अन्यायमूलक आहे हें लक्ष्यांत आल्यावांचून राहात नाहीं. 'लग्नबंधन ही मनुष्याला बंधनांतून मुक्त करण्याची शाळा आहे. विचारी मनुष्यानें या दृष्टीनेंच या संस्थेकडे पाहिलें पाहिजे व या दृष्टीनें तिचा उपयोग करून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे' हा रा. बागल यांचा उपदेश कोणाही समंजस माणसास मान्य होण्यासारखा आहे. स्त्रियांच्या दुःस्थितीबद्दल, विशेषतः त्याना प्रायः गुलामगिरींतच काळ कंठावा लागतो. व याबद्दल आजपर्यंत अनेकांनीं लिहिलें आहे, पण हें दुखणं फार जुनें आहे; तें अल्प प्रयत्नानें बरें होणें दुर्घट आहे. त्यासंबंधांत समाजाची वारंवार जागृति करीत राहिलें पाहिजे. हें लक्ष्यांत ठेवतां रा. बागल यांच्या प्रस्तुत प्रयत्नाची समर्थनीयता कोणासही पटण्यासारखी आहे.

**Mr. G K DEVDHAR**, M.A C I E., President S I Society —'.........It is a thought provoking book and its reading is educative and instructive. You have tried your best to

advocate vigorously therein equality of treatment to women. The history of woman's position given by you culled from several sources in English is a very instructive one to the average reader in Marathi and the arguments that you have marshelled in it bringing home to the readers the need for equal treatment are very convincing.

**दिवाणबहादुर प्रो. लठ्ठे,** M. A LL B.— " आपलें पुस्तक वाचलें. शेवटच्या प्रकरणांत आपल्या पुस्तकाचें सार दिलें आहे. त्यांत आपल्या सर्व लेखांतील सांगितलेला उद्देश सफल होणें हिंदुसमाजाच्या उन्नतीस अवश्य आहे. आपलें प्रतिपादन एकंदरींत अंतःकरणाच्या उमाळ्याचें असल्यामुळें त्याचा वाचकांच्या मनावर चांगला परिणाम होईल. "

**प्रो. माधवराव पटवर्धन** M A (माधव ज्युलियन)—स्त्रियांच्या कायदेशीर दास्यदुर्दशेकडे लक्ष्य वेधणारें आपलें पुस्तक वाचून आनंद झाला. तो पत्रीं लिहितां पुरवत नाहीं. स्त्रियांची गुलामगिरी आज आहे व ती पुरुषजातीला लांछनास्पद आहे व मनुष्यजातीस अपायकारक आहे याविषयीं शंका नाहीं. ही गोष्ट आपण कळकळीनें व परिणामकारक रीतीनें दाखविली आहे.

**ज्ञानकोशकार डॉ. केतकर**—आपल्या पुस्तकांत अनेक प्रकारची माहिती एकत्रित केली आहे. आपल्या पुस्तकासारखीं पुस्तकें वाचकांची दृष्टि व्यापक करण्यासाठीं उपयोगी पडतील.

**र. धों. कर्वे,** M. A.–' आपल्या पुस्तकांतील बराच भाग विचारार्ह आहे.

**S. K KELEOKAR** Bar-at-Law:—One cannot but admire the courage of Madhavarao Bagal in taking this most vital yet delicate social question the relations man to woman in a frank and outspoken way to the average Indian brought up in the orthodoxy of tradition and religion. The angle of vision brought to bear on the subject by the author will come as a surprise and many of the views exposed may cause a shock, yet a little thought will soon convince him that we in this country must learn at last to view life not in the narrow conservative specified way laid down for us by our progenators thousands of years ago, but we must bring to bear on all problems a broader outlook more consonant with the state of our present day knowledge and more in accordance with natural principles of justice and love.

**वा. द. तोफखाने संस्थापक विद्यापीठ, कोल्हापूर**—आपलें लग्नबंधन कीं तुरुंगवास हें पुस्तक अत्यंत काळजीपूर्वक वाचून पाहिलें. त्यांतील विचार आपल्या नेहमीच्या वृत्तीला अनुसरून अगदीं सडेतोडपणानें व निर्भीडपणें मांडले गेलेले असले तरी त्यांत कोठेंही सदभिरुचि थोडी देखील सुटलेली नसल्यामुळें व जागजागीं सदसद्विवेकबुद्धीनें पूर्ण अशी स्त्रीजातिविषयक आपली कळकळ अगदीं ओथंबलेली असल्याकारणानें आपल्या या लिखाणाचा कोणत्याही विचारी माणसाला सहानुभूतीनेंच विचार करणें भाग झालें आहे. "वाटेल तो अनाचार करण्याला मोकळीक म्हणजे स्वातंत्र्य नव्हे," या वाक्यानें केलेलें आपल्या स्वातंत्र्यविषयक कल्पनांचें स्पष्टीकरण तसेंच परस्परांतील गुणदोषांकडे न पाहतां केवळ वरून दिसणाऱ्या रूपालाच भुलून लग्नाला उभें राहणाऱ्यांची "पण यौवनाचा भर ओसरल्यावर, प्रेमाच्या वस्तूचा उपभोग घेतल्यानंतर तसें प्रेम, तेंच अगत्य रहात नसतें, या सूचक शब्दांनीं जी कानउघाडणी आपण केली आहे, त्यापेक्षां अगदीं जुन्या वळणाच्या पण अर्थात् विचारवान् माणसाचीं तरी दुसरी कोणती अपेक्षा असणार?

"आर्थिक स्वातंत्र्य म्हणजे स्त्रियांनींही नोकरी करावी, निराळे पैसे मिळवावेत, आपलें हित नवऱ्यापासून निराळें करावें असेंच कांहीं नव्हे" या आपल्या वाक्यांतून ग्रथित झालेली कल्पना कोणालाही आवडावी अशीच आहे. आपत्कालींही स्त्रियांनीं स्वतःच्या पायावर उभें राहण्यास समर्थ नसावें असें इच्छिणारांची केव्हांही कोणाला कींवच येईल.

आपल्या मताअन्वयें 'मातृत्वाचें पवित्र मंदिर अभेद्य करण्यासाठीं' असो, अगर सामान्य जनतेला परिचित असें कौटुंबिक स्वास्थ्य टिकविण्यासाठीं असो; पण लग्नबंधनाबाबत आपण दिलेल्या अंतिम निर्णयामुळें आपण झाडून सर्वांचें प्रियच साधलें आहे. विशेषतः हें बंधन टिकविण्याच्या आड शंकापिशाच्च व सहिष्णुतेचा अभाव ही जोडी कशी येते हें सोदाहरण सांगतांना, ग्रीक लोकांत असलेल्या चालीचा आपण केलेला उल्लेख निखालस हृदयंगम आहे. पुरुषवर्ग इतक्या थोरपणानें जर वागूं लागेल, तर त्याची तितकीच थोर प्रतिक्रिया स्त्रियांवरही झाल्याविना राहणार नाहीं.

४६१ ७

REFBK-0004617